ऑक्टोबर
१९६८

# अर्थ

दिवाळी
अंक

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र





दिवाळी व नूतन वर्ष आमच्या ग्राहकांस व
हितचिंतकांस सुखसमृद्धीचे व आनंदाचे जावो.

किर्लोस्कर

दर्जेदार डिझेल एंजिनांचे भारतातील अग्रेसर उत्पादक
किर्लोस्कर ऑईल एंजिन्स लिमिटेड
रजि. ऑफिस : लक्ष्मणराव किर्लोस्कर रोड, खडकी, पुणे-३ (भारत)

*WITH COMPLIMENTS FROM:—*

# HINDUSTAN ANTIBIOTICS LIMITED

( A Government of India Undertaking )

PIMPRI : POONA — 18

Makers of Quality Antibiotics

## HAMYCIN

AN ANTIFUNGAL ANTIBIOTIC

is

OUR RESEARCH PRODUCT

# THE SIRDAR CARBONIC GAS CO., LTD.

Regd Office : SIR VITHALDAS CHAMBERS
16, Apollo Street, BOMBAY-1

*Manufacturers of :*

- **SODA-WATER MACHINES,**
- **DRY ICE & $CO_2$ GAS**

**99,8%** pure odourless, colourless, strong liquid $CO_2$
filled to the presssure of 1250 lbs.

**Sold in Bombay at** Sirdar's Factories :

(1) 20, Connaught Road., Bombay 33, D. D.
(2) Cadell Road, Bombay 28
and AUTHORISED DISTRIBUTORS:
(3) AKBARALLI MOHOMEDALLY & CO.,
316, Abdul Rehman St., Bombay 3.
(4) ODHAWJI LAWJI & CO.,
144, Princess Street, Bombay 2.

**Other Factories at :**

- **Delhi,** • **Howrah,** • **Kamptee,** • **Vijayawada.**

# I am rich today!

I saved only a small amount every month with UCOBANK under their Recurring Deposit Scheme and today this lump sum is mine.

*Minimum monthly instalment of deposit Rs. 10/-, Maximum Rs. 450/- Recurring Deposit Account may be opened singly or jointly.*

YOU CAN SAVE—
**UCOBANK**
CAN HELP YOU

THE UNITED COMMERCIAL BANK LIMITED

HEAD OFFICE : CALCUTTA




---

स्वस्तिक

दीपावली शुभेच्छा

## दिवाळीचे आनंदात भर घालण्यासाठीं नवीन डिझाईन्स




**स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि., पुणे 3.**

Parkerson / SRP / 68 17

दीपावली व नूतन वर्ष आमच्या असंख्य ग्राहकांना सुखाचे व भरभराटीचे जावो !

**सेवा – सहकार – सचोटी**

हे आमच्या बँकेचे आधारस्तंभ होत.

# दि बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

हेड ऑफिस : १५० भांदुर गल्ली, बेळगाव.

## प्र ग ती चे पा ऊ ल

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ८१,००,००० | | ठेवी | रु. ४,१२,८५,७४१ |
| वसूल झालेले | रु. ५८,४१,९०० | | खेळते भांडवल | रु. ६,७९,६३,७४६ |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. २०,०७,१०५ | | दिलेले कर्ज | रु. ५,१०,९०,९८५ |

ही बँक शहरी व ग्रामीण जीवन सुधारणेच्या कामी, त्याचप्रमाणे अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेसाठी शेतकऱ्यांना कमी व्याजाच्या दराने कर्जे देऊन सर्वतोपरी साहाय्य करीत आहे. तसेच, त्यांच्या मालास योग्य किंमत येऊन त्यांचा धंदा किफायतशीर व्हावा यासाठी सेल सोसायट्या व विविधोद्देश संस्थांमार्फत विक्री करून देण्याच्या कामी त्यांना मदत करीत आहे.

या बँकेच्या सर्व शाखांमध्ये चालू व सेव्हिंज बँक ठेवी, एक महिन्यापासून पाच वर्षांवरील मुदती ठेवी व तसेच रिकरिंग ठेवी स्वीकारण्यात येतात. तसेच सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहारही केले जातात.

बेळगाव बझार, बैलहोंगल व सौंदत्ती येथील शाखांमध्ये मौल्यवान जिनसांच्या सुरक्षिततेसाठी सेफ डिपॉझिट लॉकर्सची व्यवस्था आहे. जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये आमच्या २५ शाखा आहेत.

**जी. व्ही. घोडगेरी,**
व्हाईस प्रेसिडेंट.

**विशेष माहिती बँकेचे ऑफिसमध्ये मिळेल.**

**एम्. एस्. होसमनी,**
प्रेसिडेंट.

"शेतकरी बंधूंना ही दिवाळी सुखाची व समृद्धीची जावो."

# कोल्हापूर जिल्हा सहकारी भू-विकास बँक, मर्यादित

— कोल्हापूर —

शेतकरी जीवनात आमूलाग्र क्रांती घडविण्यासाठी आमची बँक खालील अनेकविध शेतीच्या कारणांसाठी भांडवलपुरवठा करून शेती उत्पादन वाढविण्यास सज्ज आहे.

नवी विहीर खोदणे, जुनी विहीर दुरुस्त करणे, ऑईल इंजिन व इलेक्ट्रिकमोटार खरेदी, पाणी-पुरवठा योजना, ट्रॅक्टर खरेदी, सिमेंट पाईप्स खरेदी, जुनी कर्जफेड, जमीन खरेदी करणे, शेतघर बांधणे, जमीनसुधारणा करणे, चरक खरेदी, शेतास कुंपण घालणे, इत्यादी अनेक कारणे.

**भू-विकास बँकच का ? —**

(१) आमच्या बँकेकडील कर्ज १० ते १२ वर्षे मुदतीने मिळते व कर्जाची परतफेड शेतकऱ्यास परवडते.
(२) बँकेकडून तगाईसाठी कर्ज घेणाऱ्या गरीब शेतकऱ्यांना सबसिडी मिळते.
(३) गरीब शेतकऱ्यांना विशेष सवलती मिळतात.
(४) सहकारी साखर कारखान्याचे विभागात ट्रॅक्टरसाठी खास सवलती.

कर्जासाठी व अधिक माहितीसाठी बँकेच्या मुख्य कचेरीत अगर शाखांतून चौकशी करावी.

शिवाजीराव जाधव
व्यवस्थापक

ग. शं. भोगावकर
अध्यक्ष

# ☆ अर्थ ☆

दिवाळी अंक

बुधवार, १६ ऑक्टोबर १९६८



संस्थापक :

प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

## ही दिवाळी व नवे वर्ष आमच्या सर्व हितचिंतकांना व वाचकांना सुखाचे जावो !

## अ नु क्र म णि का


१ जसा व्याप, तसे वैभव ( समर्थ वचने ) ८

२ सुखसमृद्धीचा मूलमंत्रः वाटावा ( संपादकीय ) ९

३ मालक आणि कामगार ह्यांचे तादात्म्य शक्य आहे. ( विजय मर्चंट ) ११

४ निर्यात कशी करावी ? ( वसंतराव वैद्य ) १५

५ मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचे भवितव्य १९

६ परदेशांची कर्जफेड वस्त्रफेडीने होणार काय ? ( वि. म. दांडेकर ) २१

७ सहकारी बँकांच्या काही समस्या ३५

८ सहकारी संस्थांतील व्यवस्थापकांचे हात बळकट होणार ? ४१

९ रिझर्व्ह बँकचा १९६७-६८ चा प्रचंड नफा ४३

१० ग्रामीण भागांतील बचत आणि व्यापारी बँका ४५

११ महाराष्ट्रातील ऊसपिकाची चिंतनीय परिस्थिती ४८

१२ पीक विमायोजना व्यवहार्य आहे काय ? ४९

१३ गिऱ्हाइकाचे महत्त्व ५३

१४ व्यापारी बँका व शेतीला कर्जपुरवठा ५५

१५ शास्त्रीय विषयांच्या नियतकालिकांची अल्प संख्या ५९





सुरक्षितता! आणि वाढ!

| मुदत | व्याज |
| --- | --- |
| ९१ दिवस | ५·२५ |
| ६ महिने | ५·७५ |
| १ वर्ष | ६·२५ |
| २ वर्षे | ६·५० |
| ३ वर्षे | ६·७५ |
| ५ वर्षे | ७·२५ |
| ७ वर्षे | ७·५० |
| ९ वर्षे | ७·६२ |

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

प्रमुख कचेरी-चिरमुले निकेतन, राजपथ सातारा
स्थापना १९३६
महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा


## जसा व्याप, तसे वैभव

### श्रीरामदास स्वामींचे व्यावहारिक मार्गदर्शन

सावधपणाने वागले असता दैव अनुकूल करून घेता येते; जे काम पुढे येईल ते लहान म्हणू नये, मोठे म्हणू नये, झपाटून टाकावे. जे येईल ते करावे, असा दंडक ठेवल्याशिवाय हातून काही होत नाही. आपण काय करतो याकडे सावध चित्ताने पाहात असावे. ते केले नाही, तर यत्नाला बळकटी येत नाही आणि सुखसंतोषाची वार्ताही कानी पडणार नाही. म्हणून, पहिली गोष्ट म्हणजे आळस सोडावा आणि नीट धोरणाने कामास लागावे. मनास आलेला उदासपणा धैर्य धरून झाडून टाकावा.

सगळे लोक बघावे तर एक संपन्न असतो, एक दुर्बळ असतो. कित्येक वैभवात नांदतात, कित्येक दारिद्र्य भोगतात. याचे उत्तर असे, की ही सर्व गती गुणामुळे प्राप्त होते. विद्या नाही, बुद्धी नाही, विवेक नाही, साक्षेप नाही, कुशलता नाही, व्याप नाही, असा प्राणी करंटाच असणार. हे सारे गुण जेथे असतात, तेथे वैभवाला काही उणे नसते. जसा व्याप असेल तसे वैभव मिळते.

जे व्याप करतात, आटोप दाखवितात, धक्केचपेटे सोसतात, तेच प्राणी सदैव होतात आणि भाग्यवंत ठरतात. हे आपल्या डोळ्यादेखत घडून येते. मूर्ख लोकांना मात्र ते कळत नाही. जो लौकिकात आपले हित करून घेत नाही, तो आत्मघातकी समजला पाहिजे.

प्रपंच सोडला आणि परमार्थ केला, तर खायला अन्नसुद्धा मिळणार नाही! आणि ज्या करंट्याला अन्नसुद्धा मिळत नाही, तो परमार्थ कसला करणार? जो प्रपंचात अप्रामाणिक आहे, तो परमार्थातही दांभिक ठरेल. प्रपंच हवा आणि तो सुखाचा व्हावा म्हणून 'सुवर्ण' म्हणजे धन मिळविले पाहिजे.

अरबी घोडा फिरविणारा माणूस स्वत: सुद्धा चपळच असला पाहिजे. जगातील धकाधकीची कामेही बुद्धी तीक्ष्ण असली तरच साधतात. भोळे, भावार्थी आणि भ्रांत यांना ती साधावयाची नाहीत. शेत केले पण मशागत करीना, तर काय उपयोग आहे?

लोकांचा स्वभाव मोठा लोभाळू असतो. आरंभालाच 'देव' – 'देव' म्हणू लागतात. याचा अर्थ, मला काही दे, मला काही दे अशी त्यांची वासना असते. वास्तविक, कष्टावाचून फळ नाही, कष्टावाचून राज्य नाही आणि केल्यावाचून इहलोकी काहीही साध्य होत नाही. जे आधी कष्टांचे दुःख सोसतात, ते पुढे सुखाचे फळ भोगतात. काही साठविले नाही, तर सारे व्यर्थ होते. चांगले संचित न करता जो आपल्याला वाचवीत नाही, तो स्वतःचीच हत्या करतो. इहलोक काय किंवा परलोक काय, दोहोकडे एकच विचार लागू पडतो.

# सुखसमृद्धीचा मूलमंत्र : वाढावा

## अधिकस्याधिकं फलम्

बँकेची बहुसंख्य कर्जे बुडीत झाली, सर्व कर्जे तोट्यात चालल्या, तर तिचा ताळेबंद तूटच दाखविणार. मग जिथे बँकच बंद पडण्याचा संभव, तिथे कुठले डिव्हिडंड आणि कुठले बोनस !

प्रत्येकाने सेवनापेक्षा उत्पादन अधिक करून उत्पन्न वाढविले, तरच व्यक्तींचा, कुटुंबांचा, आणि देशाचा उत्कर्ष होऊ शकतो.

व्यक्तींच्या श्रमानेच राष्ट्रीय ताळेबंदात वाढावा निर्माण होईल. त्यांनीच निराश बघ्याची भूमिका सोडून चैतन्यमूर्ती व्हायला हवे. त्यामुळे त्यांचा स्वतःचा सर्वांगीण उत्कर्ष साधून देशहितही घडून येईल. त्याचा त्यांना आणि त्यांच्या पुढील पिढ्यांना फायदा होईल. त्यांच्या जीवनाला अर्थ प्राप्त होईल.

आपल्या देशाची निर्यातीपेक्षा आयातच जास्त आहे; म्हणजे आपण इतर देशांना जेवढे देतो, त्याच्यापेक्षा त्यांच्याकडून जास्त घेतो. त्यामुळे दरसाल परराष्ट्रीय व्यापारात तूट येते आणि भारताचा परदेशातील कर्जबाजारीपणा वाढत जातो. ही परिस्थिती फार काळ टिकणारी नाही; सध्या आपल्याला मिळणारी मदत कमीकमी होत जाईल आणि दिवाळखोरीची पाळी येईल. आपले सावकार देश आपल्या देशाला कर्जफेडीसाठीही नवी कर्जे देऊन आणि कर्जाच्या अटी सौम्य करून, वेळप्रसंगी कर्जाची माफी देऊनही सांभाळून घेत आहेत. भिक्षेकऱ्याला हाकून न देता सांभाळून घेणे, म्हणजे एकपरी त्याला अप्रत्यक्षरीत्या दास करून घेणे होय. तो पुनः पुनः येत राहतो आणि लाचारीची त्याला सवयच जडते, ती भिक्षा घालणाऱ्या देशांना अधिक फायद्याची वाटते.


भारताला आपली गेलेली अब्रू परत मिळवायची असेल, तर कर्जफेड त्याने वेळेवर केली पाहिजे; नवी कर्जे घेण्याचे टाळले पाहिजे; हे केव्हा शक्य होईल ? आयात कमी कमी करून आणि निर्गत जास्त जास्त करून; आयात-निर्गत व्यापारात भरपूर वाढावा उरवून. ह्याचा अर्थ, काही आवश्यक जिनसांचाही वापर टाळून आणि अधिक कष्ट करून, अधिक कार्यक्षमतेने उत्कृष्ट दर्जाचा माल स्वस्तात स्वस्त किंमतीत उत्पादन करून आणि त्याचा जागतिक बाजारपेठांतून स्पर्धेला तोंड देऊनही खप वाढवून. जो देश आयातीपेक्षा जास्त निर्गत करतो, त्यालाच परदेशातून गरजेच्या जिनसा हक्काने मिळविता येतात; कुणाची मनधरणी करावी लागत नाही किंवा स्वत्व सोडावे लागत नाही.

आपल्या कौटुंबिक जीवनातही काय आढळते ? जे लोक नेहमी उधार-उसनवार जिन्नस आणू लागतात, त्यांना किंमत उरत नाही; ठरल्याप्रमाणे देण्याचे हप्ते जे देत नाहीत त्यांना दुकानदार दारातही उभे करीत नाही. शेजारीपाजारीही उसने घेणाऱ्यांचा अपमानच करतात. ह्या उलट, ज्यांचा व्यवहार रोखीचा असतो त्यांना किंमतीत सवलत मिळते. ज्यांच्या घरी आवश्यक जिनसांची तरतूद केलेली असते, त्यांना इतरांकडून उपेक्षा सहन करावी लागत नाही, मानाने जगता येते आणि इतरांच्या उपयोगी पडून भलेपणाही मिळविता येतो. काही लोकांनी कापड गिरण्यांचे भाग खरेदी केलेले असतात. म्हणजे, त्यांनी आधी बचत करून ती त्यां भागात गुंतविलेली असते. त्यांना त्या गिरणीचे कापड स्वस्त दरात मिळते. ह्याचा अर्थ, मिळकत ही खर्चापेक्षा सतत अधिक राखली आणि तिचा योग्य वापर केला तर जिनसा स्वस्त मिळू शकतात; इतरांना न परवडणाऱ्या जिनसाही घेता येतात.

ह्याचा अर्थ असा की, आपण जास्त माल किंवा श्रम देऊन आणि खर्च कमी करून संपत्तीची पुंजी निर्माण केली पाहिजे आणि नेहमी घेणेकरी बनले पाहिजे; देणेकरी नव्हे. तरच बाजारात काय किंवा समाजात काय, किंमत उरते. ज्याची नेहमीच ओढगस्तपणाची परिस्थिती असते, त्याला पैशाच्या नाहीतर अब्रूच्या तरी स्वरूपात भरमसाठ किंमत देणे भागच पडते.

आपल्याजवळ आपले भागून देण्याजोगे असणे, म्हणजे आर्थिकदृष्ट्या स्वावलंबनच नव्हे तर समृद्धी असणे, ह्या व्यावहारिक जगात अत्यावश्यक ठरते. ज्याच्याजवळ खर्चाला पैसा आहे, तोच उपकार करू शकतो, मदत करू शकतो, उपकारांची फेड करू शकतो, कृतज्ञता दाखवू शकतो. आजारी माणसाच्या समाचाराला रिक्त हस्ताने जाऊन त्याच्यावरच चहापाण्याचा भुर्दंड पाडणाऱ्यापेक्षा त्याला लागणारी फळे बरोबर घेऊन जाणारे आजाऱ्याला पुनः यावेसे वाटतात; हा व्यवहार आहे. सिनेमाला नेणाऱ्या मित्राला मध्यंतरात निदान एखादे पेय तरी द्यावे लागते; तरच तो पुनः सिनेमाला घेऊन जाण्यास प्रवृत्त होणार. सर्व काही फुकटात पाहू पाहणारांच्या पदरी पुढे काहीच पडेनासे होते. घेण्यापेक्षा जास्त देत राहण्याने जे आर्थिक पुण्य संपादन होते, ते पुढे उपयोगी पडते.

जी गोष्ट आर्थिक संपन्नतेची, तीच शरीरसंपदेची. जो स्वतःच नेहमी आजारी असतो, तो दुसऱ्यासाठी जाग्रणे कशी करू शकणार ? ज्याला पोहता येत नाही, तो बुडणाऱ्याला कसा वाचविणार ? ज्याला चालताना धाप लागते, तो दुसऱ्याला




कसा खांद्यावर घेणार? जो स्वतःच अशक्त आहे, तो स्वतःचे रक्षण कसे करणार आणि दुसऱ्याला कसे वाचविणार? धक्काबुक्कीच्या जगात त्याला नेहमीच मागे पडावे लागणार आणि भीक मागायची वेळ आली तरी तो मागे ढकलला जाऊन सशक्त भिकारीच गबर होणार. नोकरी करायला आणि टिकवायला काही किमान शारीरिक शक्ती आणि चिवटपणा आवश्यकच असतो. जो नेहमी दमलेला, थकलेला, मरगळलेला असतो त्याला पगार तरी कोण आणि का देणार?

जी गोष्ट आर्थिक आणि शारीरिक सामर्थ्याची तीच मानसिक सामर्थ्याची. जो स्वतः मनाचा दुर्बल आहे, तो इतरांना काय आधार देणार? त्यांच्यात काय आत्मविश्वास निर्माण करणार? भित्रा मनुष्य दुसऱ्याला काय शौर्याचे धडे देणार? जो स्वतः आघात सोसू शकतो, तोच खंबीर मनुष्य इतरांच्या आघाताची तीव्रता कमी करू शकणार!

अशा रीतीने आर्थिक, शारीरिक व मानसिकदृष्ट्या स्वावलंबीच नव्हे, तर संपन्न माणसे स्वतःचे जीवन समृद्ध करू शकतात; इतरांच्या जीवनाच्या समृद्धीस हातभार लावून त्याचा परोक्ष फायदाही मिळवितात. अशांच्यामुळे त्यांची कुटुंबे ऊर्जितावस्थेत येतात आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडू शकतात. अशा कुटुंबांमुळेच राष्ट्र ऊर्जितावस्थेत येते आणि परराष्ट्रांकडे आपली पुंजी पेरून त्यांचेकडून स्वतःला आवश्यक पण दुर्मिळ अशा जिनसा व साधने मिळवून स्वतःची संपन्नता वाढवू शकते. ह्या सर्वांच्या मुळाशी स्वावलंबन आणि वाढाव्याची निर्मिती ही आवश्यक आहेत. आपण जेवढा उपभोग घेतो, त्याच्या काही पट तरी प्रत्येकाने निर्मिती करायला हवी, म्हणजे गरज भागून वाढावा उरतो. आर्थिक संपदा शारीरिक व मानसिक संपदेस हातभार लावू शकते; तद्वतच शारीरिक व मानसिक संपदा, आर्थिक संपदा निर्माण करू शकते. ही सर्व परस्परांना पोषक आहेत. त्यापैकी एकाद्याचा तुटवडा दुसऱ्यांच्या वाढाव्यातून भरून काढता येतो. व्यवहारी जगात पैशाला म्हणजे "अर्था"ला विशेष महत्त्व असल्याकारणाने पैशाची खऱ्या अर्थाने सुबत्ता, म्हणजे त्याच्या विनिमयात मिळणाऱ्या जिनसांची सुबत्ता प्राप्त करून घेणे, हे आपले व्यावहारिक ध्येय असावयास हवे. त्याखेरीज काशीयात्राच नव्हे तर आळंदीची यात्राही घडून येत नाही आणि अस्थिही जवळच्या नदीत सोडून द्याव्या लागतात; श्राद्धपक्षही करता येत नाही. 'धर्म'च नव्हे तर 'काम' सुद्धा अर्थावर अवलंबून आहे. तेव्हा लक्ष्मीपूजनाचे महत्त्व ओघाने आलेच. लक्ष्मीचा साक्षात्कार कष्ट आणि प्रयत्नवादी लोकांनाच होणार; पद्धतशीर संघटित श्रम आणि संयम त्याचप्रमाणे अशा प्रकारे झटणाऱ्यांना मदत करणे हीच लक्ष्मीची खरी पूजा आहे.

—श्री. वा. काळे



कामगारांचे कौटुंबिक स्नेहसंमेलनः नटून थटून आलेल्या उत्साही स्त्रिया कामगारांच्या स्वागतासाठी प्रवेशद्वाराबाहेर उभ्या आहेत.

# मालक आणि कामगार ह्यांचे तादात्म्य शक्य आहे.

## हिंदुस्थान मिल्समधील प्रत्यक्ष अनुभव

लेखक : श्री विजय मर्चंट, मुंबई

सध्या जिकडे तिकडे संप, घेराओ आणि बंद ह्यांचे वातावरण आहे. प्रत्येक नवा कामगारविषयक कायदा त्यांना अधिकाधिक हक्क देत आहे. मालकवर्गाविरुद्ध कामगार निदर्शने व मोर्चे काढीत आहेत. अशा वातावरणात मालकांत व कामगारांत तादात्म्य घडवून आणता येईल काय ?


होय, हे शक्य आहे. हिंदुस्थान स्पिनिंग अँड विव्हींग मिल्स लि. ह्या कंपनीत आम्ही आमच्या अल्प कुवतीप्रमाणे असा एकोपा, अल्प प्रमाणात का होईना, घडवून आणला आहे, आणि त्याचे साधन अगदी सोपे आहे. मालकांनी कामगारांना समजून घेतले पाहिजे, त्यांच्या प्रश्नांचा सहानुभूतीने विचार केला पाहिजे आणि त्यांच्याशी वागताना धिमेपणा बाळगून स्वतःचा दृष्टिकोन आमूलाग्र बदलला पाहिजे, अशी ही भूमिका आहे. कामगाराला माणूस म्हणून वागविले पाहिजे; केवळ उत्पादनाचे एक साधन म्हणून नव्हे. कामगार हा आपल्यापेक्षा कोणी निकृष्ट दर्जाचा माणूस नसून तो आपल्यातीलच एक आहे असे मानले पाहिजे. मालकवर्गाबरोबर काम करणारांत अधिकारी, तंत्रज्ञ, कारकून आणि कामगारही असतात. परमेश्वराने मालकांची केलेली भरभराट त्यांनी जर आपल्या ह्या सहकाऱ्यांनाही आपल्या समवेत भोगू दिली नाही तर ती टिकणार नाही, हे त्यांनी विसरता कामा नये. मालकांनी विश्वस्ताची भावना बाळगली पाहिजे. कोणी सांगावे, दैवाचा फासा उलटा पडला असता तर आजचा एखादा कामगार मालकाच्या उच्चासनावर विराजमान झालेला असता आणि आजच्या मालकाला त्याच्या समोर उभे राहावे लागले असते.

हिंदुस्थान कापड गिरणीत ३,३०० कामगार कामावर आहेत. हे सर्व कामगार आणि त्यांची कुटुंबे ह्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि वैद्यकीय गरजांकडे आम्ही स्वतः लक्ष देतो. त्यामुळे कामगार आणि त्यांची कुटुंबीय मंडळी ह्यांना एक प्रकारची सुरक्षितता वाटते. वेळ प्रसंग आला तर आपली व आपल्या हितसंबंधांची दखल घेणारे आपल्या पाठीशी कोणी तरी आहे, असा त्यांना विश्वास वाटतो. कामगार नेहमी पैशाचीच मागणी करीत असतात असे मानणे चूक आहे. पैसा कोणाला नको असतो ? प्रत्येकालाच हवा असतो. ठाकरसी, टाटा, मफतलाल, बिर्ला, सर्वांना तो पाहिजे

असतो. फरक इतकाच की, त्यांना पैसा हवा असतो, तर कामगारांना खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी, किमान पातळीवर राहणीसाठी, पोटभर जेवण्यासाठी आणि मुलांना शिक्षण देण्यासाठी पैशाची नड असते. खरे म्हणजे त्यांना पैशापेक्षासुद्धा समजुतीची, सहानुभूतीची, ममतेची व थोड्याशा प्रेमाची आवश्यकता असते. आम्ही आमच्या कापड गिरणीत ही त्यांची गरज शक्य तितकी भागविण्याचा प्रयत्न करतो.

वर म्हटल्याप्रमाणे त्याचा मार्ग अतिशय सोपा आहे. कामगारांना रोख पैशाच्या स्वरूपांत काहीच देण्यात येत नाही, पण गिरणीच्या आरोग्यकेंद्राकडे येणारी प्रत्येक अडचण कसोशीने हाताळण्यात येते आणि त्याची तड लावण्यात येते. कामगार राज्य विमा योजना चालू आहे तरीही शक्य ती वैद्यकीय मदत कामगारांना देण्यात येते. जरूर पडली तर त्याला इस्पितळात दाखल करण्यात येते आणि तो कामावर परत रुजू झाल्यावर त्याला झेपेल असे हलके काम देण्यात येते. थोडक्यात म्हणजे तो पुन्हा पहिल्यासारखे काम करू लागण्यास समर्थ होईपर्यंत त्याची जबाबदारी आम्ही स्वीकारतो.

कामगारांच्या कुटुंबीयांनाही असेच वागविण्यात येते. पत्नीकडे अगर मुलांकडे लक्ष देणे जरूर असेल तर ते अगत्यपूर्वक पुरविण्यात येते. पत्नी घरकाम सांभाळण्याइतकी बरी होईपर्यंत आणि मुले पुनः शाळेत जाईपर्यंत मदतीचा पाठपुरावा करण्यात येतो. ह्या काळात कुटुंबाच्या पोषणाची व औषधपाण्याची सर्व व्यवस्था केली जाते. इस्पितळात असताना, गिरणीच्या आरोग्याधिकारी व सामाजिक कार्यकर्ते त्यांची पूसतपास करतात,



स्वतःच्या मातुःश्रींच्या निधनाचे दुसरे दिवशी त्यांचेप्रीत्यर्थ कामगारांनी केलेल्या सामुदायिक प्रार्थनेबद्दल विजयभाई कृतज्ञता व्यक्त करीत आहेत.



कामगारांसमवेत सहभोजन. विजयभाईंच्या पंगतीत डाव्या-उजव्या बाजूस मिलसमधील अधिकाऱ्यांप्रमाणे झाडूवाल्यांचाहि समावेश आहे.

त्यांच्याकडे लक्ष दिले जात आहेना, हे पाहतात. ह्या बाबतीत मीही जातीने जनरल वॉर्डात जाऊन चौकशी करून खात्री करून घेतो. रोग्याची चौकशी करणारा त्याचा कोणीतरी पाठीराखा आहे हे समजले की इस्पितळातील नोकर त्याच्याकडे नीट लक्ष देतात, ही काहीशी खेदाची बाब आहे; पण खरी आहे.

कामगारांशी व्यक्तिशः परिचय वाढविण्यासाठी सामाजिक समारंभांचा, सभांचा व इतर मार्गांचा अवलंब करण्यात येतो. मालक स्वतः आपल्या गाठीभेटी घेण्यास उत्सुक आहे असे समजून आल्यावर बहुसंख्य कामगार भरपूर प्रतिसाद देतात. कामगारांच्या गाठीभेटीच्या अगर त्यांना मदत देण्याच्या वेळी उत्पादन, त्याचा दर्जा अगर खराबीचे प्रमाण ह्यांची चर्चा कधीही करण्यात येत नाही. कारण, कामगारांना उजव्या हाताने देत असता डाव्या हाताने ते काढून घेण्याचा इरादा असतो असा त्यांचा चुकीचा समज होता कामा नये. आम्हांला द्यावयाचे होते म्हणून आम्ही दिले आहे, आमच्या कामात सहभागी असणारांच्यासाठी एवढे तरी आम्ही करायलाच हवे, अशी आमची मनोभावना आहे. त्यामुळे आमची कधीही निराशा होत नाही. ज्यांना कामगारांकडून काही मिळवावयाचे असते त्यांचीच निराशा होते.


आम्ही गिरणी कामगारांशी कसे वागतो व त्यांच्या जवळ जाण्यासाठी कसे प्रयत्न करतो ह्याविषयीची ही पाहा काही उदाहरणे :—

आम्ही दरसाल तीन दिवस स्वेच्छेने रक्तदान करण्याची मोहिम करतो. गेल्या वर्षी ६८३ कामगारांनी जे. जे. इस्पितळाच्या रक्तपेढीला रक्ताचे दान केले. पहिल्याच दिवशी संध्याकाळी


एक बुरखा घातलेली मुसलमान बाई गिरणीच्या दाराशी आली आणि म्हणू लागली की तिच्या नवऱ्याने रक्तदान केल्यामुळे त्याला झटके येत आहेत. लगेच आमचा एक सामाजिक कार्यकर्ता त्याच्या घरी पाठविण्यात आला. त्याला असे आढळून आले की ह्या दंपतीची आर्थिक परिस्थिती कमालीची बिकट असल्याने उभयतांना कित्येक दिवसांत नीट जेवणही मिळालेले नव्हते. मग दोघांनाही आरोग्य केंद्रात आणण्यात आले. १५ दिवसापर्यंत त्यांना तेथे राहून घेऊन सकस अन्न देण्यात आले आणि औषधोपचार करण्यात आला. नंतर त्यांना १५ दिवसांचा शिधा देण्यात आला व किरकोळ खर्चासाठी थोडेसे कर्जही देण्यात आले. आता हा कामगार नियमित काम करतो व आरोग्यसंपन्न झाला आहे.

गिरणीतील एक कामगार ४२ वर्षे काम केल्यावर सेवानिवृत्त झाला. त्याला पेन्शन देण्यात येईल असे सांगितल्यावर एक दिवस तो माझ्याकडे आला व म्हणाला 'विजयभाई, मला तुमच्याकडून काही नको आहे. ह्या गिरणीने माझ्या कुटुंबाच्या तीन पिढ्यांना काम दिले आहे. आज माझी नातवंडे गिरणीत काम करीत आहेत. मी तृप्त आहे; मला फक्त आपले आशीर्वाद हवेत. आमच्याकडून कशाचीही अपेक्षा न करणारा हा पहिला माणूस; पण अशी आणखीही माणसे पुढे भेटतील.

चार महिन्यानंतर हा कामगार मरण पावला. त्याची अंत्ययात्रा गिरणीच्या दारावरून जावयाची होती. मी स्वतः २५ अधिकाऱ्यांसह व १५० कामगारांसह त्याची वाट पाहात रस्त्याच्या कडेला उभे राहिलो आणि शव जवळ आल्यावर मी व माझ्या पाठोपाठ बाकी सर्वांनी मृताच्या पायाला हात लावून हिंदू पद्धतीने अभिवादन केले. ह्या कृतीचा कामगारांवर काय परिणाम झाला त्याची कल्पनाच केलेली बरी.



५९ वर्षे वयाचे, ५० वर्षे मिल्समध्ये काम करीत असलेले (त्याकाळी फॅक्टरी ॲक्ट नव्हता) श्री. अबदुल हमिद जान महंमद स्वयंस्फूर्तीने रक्तदान करीत आहेत. डाव्या बाजूस विजयभाई उभे आहेत.



आमच्या मिल्समधील एका अंध कामगाराचा अंध वधूशी विवाह आम्ही साजरा केला. मिल्सच्या हेल्थ ऑफिसर, कु. कुसुम भाटिया, ह्यांच्या मदतीने दांपत्याचा घास देण्याचा कार्यक्रम चालू आहे.

२५ डिसेंबर, १९६६ ह्या दिवशी माझी आई मृत्यू पावली. तेव्हा कामगारांनी गिरणी बंद ठेवण्याची इच्छा दर्शविली. त्यांच्यापैकी सहा कामगारांना मोटारीतून माझ्या घरी आणण्यात आले. आल्यावर शोकमग्न अवस्थेत बसलेल्या माझ्या वडील बंधूंच्या समोर आणखी दोघा गिरणी मालकांच्या बैठकीवर — म्हणजे त्याच चटईवर — त्यांना बसविण्यात आले. नंतर थोड्या वेळाने त्यांना बाजूला घेऊन मी त्यांच्याशी बातचीत केली. "माझ्या आईच्या आत्म्याला तुम्ही काम करीत राहिल्यानेच सुख होईल" हे मी त्यांना समजावून सांगितले. त्याचा परिणाम होऊन ते परत गेले व काम करू लागले. नंतर प्रत्येक पाळी सुरू होण्यापूर्वी सामुदायिक प्रार्थना करण्यात आली. प्रत्येक वेळी मी स्वतः हजर राहिलो. हा एक चांगला पायंडा पाडण्यात आला. पुढे आठ महिन्यांनी गिरणीतील स्पिनिंग मास्टर मरण पावले. तेव्हा गिरणी बंद ठेवण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. कामगार म्हणाले "मातोश्री गेल्या तेव्हा काम बंद ठेवले नाही. मग आता कशाला?"

एके दिवशी संध्याकाळी ५–३० च्या सुमारास मला आमच्या हेल्थ ऑफिसरचा फोन आला. त्या स्वतः एका आसन्नमरण कामगाराकडे जाऊन आल्या होत्या. त्या म्हणाल्या की, कामगाराची इच्छा अशी आहे की ह्या जगाचा निरोप घेण्यापूर्वी सावकाराचे देणे देऊन टाकावे. हेल्थ ऑफिसरचे मतही कामगाराचे सर्व पैसे ताबडतोब देऊन टाकावे असे होते. पण, गिरणीचे संबंधित अधिकारी इतक्या तातडीने सर्व रकमेचा हिशेब करून देणे शक्यच नव्हते. हेल्थ ऑफिसरच्या मताप्रमाणे, अशा वेळी सर्व तांत्रिक अडचणी

बाजूला ठेवून रक्कम अदा करावयास पाहिजे. मग मी स्वतःच फोन करून ७ हजारांची रक्कम हेल्थ ऑफिसरच्या जवळ देवविली व त्यांनी स्वतः ती मृत्युशय्येवर असलेल्या कामगाराला दिली. त्याला अतिशय आनंद झाला. कारण, अशा तऱ्हेने इतक्या त्वरेने सर्व पैसे मिळू शकतील असे त्याला कधीच वाटले नव्हते. दुसऱ्याच दिवशी पहाटे तो निधन पावला. पण त्याच्या मुला-कडून कळलेल्या माहितीप्रमाणे त्याने रात्रीच सर्व घेणेकऱ्यांना बोलावून घेऊन त्यांचे देणे देऊन टाकले होते व तो कर्ज-मुक्तेच्या सुखासमाधानाने मृत्यूच्या आधीन झाला होता. त्याचे दोन घेणेकरी मुंबईबाहेरचे होते, त्यांचे देणे भागविणे राहिले होते. "ते भागविल्याखेरीज घरखर्चासाठी एक रुपयासुद्धा वापरू नका" असे त्यांनी मुलांना बजावले होते. पैसे चुकते करण्याची नेहमीची चाकोरीची पद्धत आम्ही सोडली नसती तर आमच्या सदसद्विवेक बुद्धीला कायमची टोचणी लागली असती.

सुमारे तीन महिन्यांपूर्वी एका कामगाराची पत्नी मरण पावली. मरणापूर्वी तिने नेत्रदान केलेले होते. ही बाई झोपडपट्टीत राहणारी होती. तिच्या मृत्यूची वार्ता कळल्यावर गिरणीचा ट्रक पाठवून शव गिरणीत आणण्यात आले. नंतर बोलावून आणलेल्या डॉक्टरांनी डोळ्यातील कॉर्निया काढून घेतले. मग मृतदेह नव्या स्वच्छ कापडात गुंडाळण्यात आला, शवावर फुले वाहण्यात आली आणि मग अंत्यसंस्कारासाठी शव नाते-वाइकांच्या ताब्यात देण्यात आले.

आमच्या गिरणीतील एका अंध कामगाराचा एका अंध मुलीशीच विवाह करण्यात आला. सर्व खर्च आम्हीच केला. पुढे त्यांना अपत्य झाले. तेव्हा कोणाही डोळस माणसाची मदत न घेता त्याचे संगोपन कसे करावे, हे उभयतांना शिकविण्यात आले. त्यासाठी ह्या जोडप्याला १०० दिवस आरोग्यकेंद्रात मुद्दाम ठेवून घेण्यात आले. दोघेही गिरणीत काम करीत असतात. आता त्यांना दोन मुले आहेत. ते कामावर असतात तेव्हा मुले आरोग्यकेंद्रात ठेवण्यात येतात.

हे आरोग्यकेंद्र कुटुंब नियोजन, रक्तदान, नेत्रदान, इत्यादी कामेही करते. आतापर्यंत ३११ लोकांनी सरकारी डोळ्यांच्या पेढीला मरणोत्तर नेत्रदान केलेले आहे. त्यात मी आणि आमच्या आरोग्याधिकारीही आहेत. गेल्या दोन वर्षात १२ नेत्रदानाच्या देणग्या प्रत्यक्ष कार्यवाहीत आणल्या गेल्या आहेत. नेत्र देणारात आमच्या एका अधिकाऱ्याच्या २२ दिवसांच्या एकुलत्या एक अपत्याचा समावेश आहे.

अशा व तत्सम कार्यामुळे आरोग्यकेंद्र एक मार्गदर्शन केंद्रच झालेले आहे. आता कामगार आणि त्यांची मंडळी आपले खाजगी प्रश्नही केंद्रात घेऊन येतात आणि सहानुभूतीच्या सल्लामसलतीची अपेक्षा करतात. आरोग्याधिकारी आपले म्हणणे सहानुभुतीने ऐकून घेतील आणि शक्य ते मार्गदर्शन व मदत करतील असा त्यांना विश्वास वाटतो. गिरणीतील प्रत्येक अधिकारी "आपण शक्य तेवढे देऊ या" ह्या विचारप्रणालीला हातभार लावणारा झाला आहे. त्याचप्रमाणे नव्याने नोकरीवर येणाऱ्या प्रत्येकाला ह्या जीवनमार्गाची ओळख करून देण्यात आलेली असते.

वरच्यासारखी शेकडो उदाहरणे मला देता येतील. पण स्थलाभावी ते जमणार नाही. माणुसकी ही ज्योत सतत तेवत राखण्याची बाब आहे. कारण, तिच्यापोटी करावयाच्या सेवेला अंत नाही. एका-दुसऱ्या प्रसंगी माणुसकी दाखवून मोकळे होण्याची ती बाबच नाही. कामगार आणि मालक ह्यांना जोपर्यंत एकत्र काम करावयाचे आहे, तोपर्यंत कामगारांशी व्यक्तिगत संबंध जोडण्याची कोशीस सतत करीत राहिले पाहिजे.

हे सर्व कसे सुरू झाले? कामगारांशी निकटचे संबंध जोडण्याची माझी मनीषा तशी बरीच जुनी होती. पण दुर्दैवाने मला योग्य मार्ग सापडत नव्हता. १९६३ साली कु. कुसुम भाटिया, आताच्या आरोग्याधिकारी, ह्या गिरणीत दाखल झाल्या. त्या माझ्या जीवनविषयक दृष्टिकोनाशी सुसंवादी होत्या. पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो प्रत्यक्षात कसा उतरवावा, ह्याचीही त्यांना कल्पना होती; त्याचाच हा परिपाक दिसत आहे. ही सेवा करण्यासाठी किती खर्च येतो म्हणाल, तर दरसाल सुमारे ४५ हजार रुपये. इतका खर्च करणे योग्य आहे काय? ह्याचे उत्तर असे की, ह्या सेवेची किंमत पैशात करताच येणार नाही. कामगारांत उत्पन्न होत असलेली सद्भावना हेच आम्हाला लाभणारे दुर्मिळ फळ आहे. ह्या सेवेमुळे जे मानसिक समाधान आम्हाला लाभते, त्याने आमच्या 'डिव्हिडंड'मध्ये भरच पडते. सेवेची परतफेड होते काय? आम्हाला माहीत नाही आणि माहीत करून घेण्याची आमची इच्छाही नाही. असा 'व्यावहारिक' हिशोब करून पाहू लागलो, तर ह्या सेवेचा सुगंध उडून जाईल.

तरीसुद्धा कोणत्या तरी प्रकाराने व कोठेतरी ह्या सेवेची भरपाई होत असते. कारण, आपण माणसे कधीकधी कृतघ्न असतो. पण परमेश्वर तसा नसतो. आम्हाला मिळणारी परतफेड हिशोबाच्या बुकात कधीच दाखविता येणार नाही. पण जगातल्या मोठ्यातल्या मोठ्या स्कोअरबुकात त्याची नोंद कोठे तरी होत राहणारच. आमच्या बँकेच्या खात्यात त्याची नोंद जमेच्या बाजूला होत नसेल; पण माणुसकीच्या बँक-बुकात ती होतच राहील, आणि माणुकीच्या बँकेचे राष्ट्रीयीकरण प्रत्यक्ष भारत सरकारला सुद्धा करता येणार नाही.

# मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचे भवितव्य

## पैसा गुंतविणारे आणि ग्राहक ह्यांच्या हितास प्राधान्य हवे; निर्णय राजकीय दृष्टिकोणातून नको.

लेखक : श्री. शंतनुराव किर्लोस्कर

पुढे-मागे जे होईल असे मला वाटत होते ते या देशात प्रत्यक्षात घडण्यास सुरुवातही झाली आहे. औद्योगिक वाढीचा वेग इतका मंदावला आहे की, ती आता जवळ जवळ स्थगितच झाली आहे. औद्योगिक विकासामधील एक महत्त्वाचा दुवा मानल्या गेलेल्या मॅनेजिंग एजन्टस या संस्थेला देहान्ताची शिक्षा फर्मावण्यात आलेली आहे. शिक्षेचा हुकूम निघालेला आहे. शासकीय यंत्रणा फाशीची तयारी करीत असून, कायद्याचा भक्कम दोर हातात धरून फाशी देणारा तयारीने उभा आहे. लवकरच तुम्हांला अपराध्याचे शरीर फासावर लटकलेल्या व निष्क्रिय अवस्थेत लोंबकळणाऱ्या स्थितीत दिसू लागेल.

फॅक्टरी चालविण्याचा मला अनुभव आहे; आणि मॅनेजिंग एजन्सीचे काम कसे चालते या गोष्टीचाही मला अनुभव आहे. मॅनेजिंग एजन्सीला देहान्ताची शिक्षा फर्माविण्यात आलेली आहे, हा राजकीय स्वरूपाचा निर्णय आहे. मॅनेजिंग एजन्टना दिलेल्या या राजकीय सजेमुळे देशाच्या आर्थिक ताकदीमध्ये वाढ होणार आहे काय? कारण, मॅनेजिंग एजन्सीचा संबंध फक्त आर्थिक व्यवहाराशीच येत असतो. गेल्या कित्येक पिढ्या मॅनेजिंग एजंट हे व्यापार-व्यवहार क्षेत्रात काम करीत आहेत.

नफा व या देशाबद्दलचे प्रेम या दोन गोष्टींनी प्रेरित होऊन त्यांनी आपापल्या धंद्यांची वाढ केली आणि मालाचे उत्पादन व विक्री करण्यासाठी नव्या कंपन्याही काढल्या. हे सर्व करण्यासाठी त्यांनी नव्या कंपन्या आपल्या सामर्थ्यावर व कर्तृत्वावर उभ्या राहीपर्यंत पैशाची जुळवाजुळव केली, त्याची योग्य प्रकारे गुंतवणूक केली व त्याकरिता स्वतःची संपत्तीही वेळप्रसंगी तारण म्हणून लावली.

या त्यांच्या कार्यामुळेच जादा संख्येने नोकरीधंदा उपलब्ध झाला व अधिक संपत्ती निर्माण झाली. मॅनेजिंग एजंटांच्या कामामधील सातत्य आणि मनुष्यबळ व पैसा यांचा योग्य वापर करण्यामधील त्यांचा अनुभव जमेस धरूनच लोकांनी विश्वासाने त्यांच्या कंपन्यांमध्ये आपला पैसा गुंतविला.

मॅनेजिंग एजन्सीची पद्धत ही एक जुनाट, कालहत पद्धत असून तिचा तावडतोब त्यागच करावयास हवा, असे राजकारणी लोकांना वाटते. व्यापारउद्योगाची एक परंपरा व बैठक निर्माण करावयाची असेल तर त्याला खूपच अवधी लागतो, अनेक पिढ्यांचे परिश्रम कारणी लावावे लागतात, ही गोष्ट त्यांच्या आकलनात येतच नाही. मॅनेजिंग एजंटसनी ही परंपरा निर्माण केली आहे. संचालकांनी चालविलेल्या (डिरेक्टर-ऑपरेटेड) कंपन्या ब्रिटन व अमेरिकेमध्ये यशस्वी झाल्या असून, भारतामध्येही हीच पद्धत यावयास हवी, अशी राजकारणी मंडळींची इच्छा.

संचालकांनी चालविलेल्या कंपन्यांच्या विरुद्ध मला काही म्हणावयाचे नाही. परंतु प्रत्यक्ष अनुभवाने जे काही शिकलो आहे त्याचा मी असा सहज त्याग करावयास तयार नाही. संघटनेच्या स्वरूपावरून काही एखाद्या कंपनीचे यश निश्चित होत नसते. कंपनीच्या हितासाठी विविध प्रकारांच्या अनुभवांचा जेव्हा एके ठिकाणी समन्वय करावा, तेव्हाच यश प्राप्त होत असते.

अशा तऱ्हेच्या अनुभवाबरोबरच कर्तृत्व, सारासार विचार, निष्ठा, दूरदर्शित्व व इतर अनेक गुणांनी मंडित असलेल्या व्यक्तींची कंपनीच्या यशासाठी जरूरी असते—मग ते मॅनेजिंग एजन्टस् असोत वा डिरेक्टर्स असोत.

एखादी व्यक्ती मॅनेजिंग एजंट बनली म्हणजे ती अकार्यक्षम मॅनेजर बनणारच असा काही त्याचा अर्थ होऊ शकत नाही. ज्या कंपन्या मॅनेजिंग एजंटांच्या देखरेखीखाली वाढल्या, त्यांपैकी पुष्कळच कार्यक्षम कारभारामुळे आपापल्या धंद्यांत यशस्वी झाल्या आहेत. कंपन्या यशस्वी झाल्या म्हणून लोकांनी या कंपन्यांमध्ये आपले पैसे गुंतविले आणि या कंपन्यांच्या यशामुळेच मॅनेजिंग एजंटांनी ज्या दुसऱ्या कंपन्या काढल्या त्यांतही लोकांनी आपला पैसा विश्वासाने गुंतविला. पैसा गुंतविणारा माणूस हा व्यवहारी असतो व आपल्या गुंतविलेल्या पैशाबद्दल वाजवी मोबदला मिळणार नसेल तर अशा कंपनीमध्ये तो आपला पैसा गुंतवीत नाही.

सध्याच्या धोरणामुळे या परिस्थितीत काही बदल पडणार आहे काय, असा प्रश्न साहजिकच माझ्या मनात येतो. "मॅनेजिंग एजंटांऐवजी संचालक मंडळ कारभार पाहणार आहे, म्हणून मी या नव्या कंपनीत माझा पैसा गुंतविणार आहे" असा विचार पैसे गुंतविणारा कोणी माणूस करणार आहे काय? का पूर्वीचीच कसोटी तो या नव्या कंपनीला लावणार आहे? अनुभव आणि नवी कंपनी चालविणाऱ्या लोकांचा पूर्वेतिहास तो लक्षात घेणार आहे?

कोटलाही उद्योग यशस्वीरीत्या चालविण्यासंबंधीच्या काही मूलभूत गोष्टींत फरक का पडणार आहे? मालाचे उत्पादन व विक्री या बाबतीत जे प्रश्न मॅनेजिंग एजन्सीला सोडवावे लागत

असत तेच प्रश्न संचालकांनी चालविलेल्या कंपन्यांना सोडवावे लागणार आहेत. परंतु सामूहिक अनुभव व शहाणपण, तसेच त्यांना उपलब्ध असलेली इतर साधन-सामग्री ज्या प्रमाणात मॅनेजिंग एजन्सी वापरू शकेल, त्या प्रमाणात ती मॅनेजिंग डिरेक्टरला उपलब्ध असेल व तिचा तो वापर करू शकेल अशी खात्री बाळगता येणार नाही.

वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करून, आपण सांगाडा कसा असावा (फॉर्म) या विचारानेच भारावून गेल्यासारखे दिसत आहोत आपल्या अर्थविषयक विचारावर व व्यवहारावर राजकारणी लोकांचा पगडा बसला आहे. राजकीय सत्ता हीच सर्वव्यापी व सर्वंकष असू शकते व तशी असली पाहिजे या विचाराने ज्यांची मने ग्रस्त झालेली आहेत अशी एक नवी पिढी आता तयार केली जात आहे.

राजकारणी लोकांना नव्या शब्दांचा वा परिभाषेचा छंद लागलेला दिसतो व जे त्यांना हवे असते ते त्यांना मिळाले म्हणजे त्यांना जुन्याचा त्याग करण्याची घाई होते.

आणि या गर्दीत ते एखाद्या पद्धतीचे उपयुक्ततेच्या दृष्टीने मूल्यमापन करण्याचे विसरून जातात. मॅनेजिंग एजन्सीची पद्धत उपयुक्ततेच्या दृष्टीने कुचकामी झाली असेल तर पैसा गुंतविणारे लोक अथवा ग्राहक त्याबद्दलची आपली नापसंती मॅनेजिंग एजन्सीचा कारभार असलेल्या कंपनीत आपला पैसा न गुंतवून किंवा या कंपनीचा माल विकत न घेऊन आपली नापसंती व्यक्त करू शकतील.

एखाद्या पद्धतीला कायद्याने बंदी घालणे हा कालाचा व सार्वजनिक पैशाचा अपव्यय आहे असेच मला नेहमी वाटते. राजकीय दृष्टिकोणातून अकरणात्मक कायदे करण्याकडे आपली प्रवृत्ती झुकू लागली आहे असे दिसते. गेल्या १८ वर्षांत आपल्या अर्थव्यवहारावर वरचष्मा गाजविणारे किती तरी राजकीय निर्णय आपण घेतले आहेत.

या सर्वांचा या क्षणी आढावा घेतला तर त्यांपैकी पुष्कळसे निर्णय अकरणात्मकच होते असे मला वाटते. आपण निर्माण केलेल्या गोष्टींपेक्षा किती तरी अधिक गोष्टी आपण संपुष्टात आणल्या आहेत. आपण सुरू केलेल्या पद्धतींपेक्षा किती तरी अधिक पद्धती आपण धिक्कारल्या आहेत. नव्या लोकांना काही गोष्टी करण्यास कार्यप्रवृत्त करण्यापेक्षा किती तरी जास्त लोकांना आपण कार्य करण्यापासून परावृत्त केले आहे. मनुष्यस्वभावाकडे व एखाद्या निर्णयाचा आपल्या कायद्यावर आणि देशावर काय परिणाम होईल याकडे आपण दुर्लक्ष केले आहे. संपूर्ण दारूबंदीचा आपण आग्रह धरला पण मनुष्यस्वभाव आपल्या वळणावर गेल्यामुळे आपल्याला दारूबंदी शिथिल करावी लागली.

मॅनेजिंग एजन्सीची पद्धत बंद करण्याच्या निर्णयाचा आपण आगस्ती विचार करावयास हवा, असे मला वाटते. मॅनेजिंग एजन्सीने चालविलेल्या व संचालकांनी चालविलेल्या अशा दोन्ही प्रकारच्या कंपन्या एकाच वेळी चालू ठेवल्यास अधिक बरे होईल. त्याचा परिणाम असा होईल की, जी पद्धत सरस असेल ती चढाओढ करून दुसऱ्या पद्धतीला या क्षेत्रातून हुसकावून लावील आणि या चढाओढीच्या प्रक्रियेमुळे दोन्ही पद्धतींमध्ये अधिक दक्षता निर्माण होईल.

मॅनेजिंग एजंटांना जो सामाजिक दुष्टावा चिकटविण्यात येत आहे तो समर्थनीय आहे असे मला वाटत नाही. कंपन्यांचा कारभार व वैयक्तिक मिळकती यावर सध्या पुरेशी नियंत्रणे आहेत. यातूनही काही वाईट गोष्टी शिल्लक राहिल्या असतील तर त्या चढाओढींच्या मामल्यात आपोआप सरळ होतील असे मला सुचवावेसे वाटते.

या दोन्ही पद्धती एकाच वेळी चालू देऊन, त्यांना आपसात चढाओढ करू द्यावी. व्यापारव्यवहाराच्या भाषेत, पैसे गुंतवणारे व ग्राहक या दोहोंचा अनुनय करणारी अशीच ही स्पर्धा ठरेल. वर्धिष्णु कारखान्यातच आपला पैसा गुंतवावा असे विवेकी माणसाला साधारणतः वाटत असते. ग्राहक हा चलाख असतो. उपयोगी व किफायतशीर पडेल तेच तो खरेदी करतो.

या दोन गोष्टी निर्णायक मानल्या जाव्यात. या दोन्ही पद्धती एकाच वेळी चालू राहिल्या तर त्यात पैसे गुंतविणारांचा व ग्राहकांचा फायदा होणार आहे. या दोघांसाठीच कोठलाही उद्योग चालवावयाचा असतो. परंतु राजकारणी लोक मात्र या गोष्टीचा खेळ करतात. अर्थविषयक व्यवहार ही एक गंभीर बाब असून, राजकारण किंवा गमतीसाठी त्याचा खेळ केला जाऊ नये.

शक्य तेवढा जास्त औद्योगिक विकास आपणा सर्वांनाच हवा आहे. पैसे गुंतविणारे व उद्योगधंदा करणारे यांच्या दृष्टीने विकसित राष्ट्रांपेक्षा, भारतासारख्या प्रगतिपथावरील देशात या दोघांना अधिक मोठा धोका पत्करावा लागत असून, त्यांच्यावर पडणारी जबाबदारी अधिक भारी स्वरूपाची आहे, ही गोष्ट आपण ध्यानात घ्यावयास हवी आहे. जे आपणाला हितकारक आहे, तेच आपण करायला हवे.

परिस्थितीचे यथार्थ ज्ञान होऊन राजकारणी लोक आपल्या विचारसरणीत इष्ट तो बदल करतील अशी आशा मी बाळगून आहे.

(फिनॅन्शिअल एक्सप्रेस)

# परदेशांची कर्जफेड वक्रफेडीने होणार काय ?

## १,००० कोटी रुपयांच्या वरवंट्याखाली राष्ट्रीय चारित्र्य आणि सत्त्व ह्यांचा चक्काचूर !

लेखक : श्री. वि. म. दांडेकर,

डायरेक्टर, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड इकॉनॉमिक्स, पुणे

**कर्जवसुलीपेक्षा भारतावरील कर्जाचा बोजा वाढवून त्यावर शक्य तेवढे राजनैतिक वर्चस्व प्रस्थापित करणे, हेच भारताला कर्ज देणाऱ्या देशांचे उद्दिष्ट आहे. ह्या साहाय्याच्या निमित्ताने परकीयांचा घरात दिवसाढवळ्या थेट प्रवेश झाला आहे आणि ह्या घराचा खरा मालक कोण, घर निर्वेध आहे की गहाण आहे, असा प्रश्न घरातील आणि घराबाहेरील माणसे विचारू लागली आहेत. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात अशा तऱ्हेने सुमारे १,००० कोटी रुपयांचे कर्ज अमेरिकेने भारत सरकारास दिले आहे. १०,००,००,००,००० रुपयांचा हा वरवंटा भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात अनेक वर्षे फिरत राहणार आहे. भारत सरकार या व्यवहाराला आज अव्याहत बारा वर्षे लोभावले आहे.**

१५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारतास राजकीय स्वातंत्र्य मिळाले आणि दीर्घकाल पारतंत्र्यात आर्थिक दृष्ट्या मागास राहिलेल्या भारताने राजकीय स्वातंत्र्याबरोबर नियोजनात्मक आर्थिक विकासाची घोषणा केली. १ एप्रिल, १९५१ रोजी भारताच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात झाली.

आर्थिक विकासास आवश्यक ती यंत्रसामग्री आणि इतर माल जो देशात तयार होत नाही तो परदेशातून आणण्याकरता परदेशी चलन लागते. आपला माल निर्यात करून परदेशी चलन मिळते. परंतु त्यातील पुष्कळसे चलन नित्य लागणारी आयात करण्यातच खर्च होते. त्यातून उरले तरच आर्थिक विकासास लावावयाचे. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस आपल्याला निर्यातीतून मिळणारे परदेशी चलन नित्याच्या आयातीतच खर्च होत होते. सुमारे ६५० कोटी रुपये किंमतीच्या मालाची निर्यात आणि ६५० कोटी रुपये किंमतीच्या मालाची आयात अशी परिस्थिती होती. सुदैवाने त्या वेळी आपणाजवळ सुमारे ९०० कोटी रुपयांचे परदेशी चलन शिल्लक होते. आर्थिक विकासास आवश्यक म्हणून आपण या गंगाजळीतून खर्चास सुरवात केली. गंगाजळीतून पहिल्या पंचवार्षिक योजनेत सुमारे १२५ कोटी रुपयांचे आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत सुमारे ६०० कोटी रुपयांचे परदेशी चलन आपण उचलले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटी गंगाजळी एवढी घटली होती की तिसऱ्या पंचवार्षिक योजनेकरता त्यांतून आणखी उचल करण्याची मुळीच सोय नव्हती.

आपल्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमास गंगाजळीतील परदेशी चलन पुरे पडणार नाही हे पाहून आपण प्रथमपासूनच जागतिक बँकेकडून परदेशी चलनाची कर्जे काढण्यास सुरवात केली. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात जागतिक बँकेने आणि तिच्याशी संलग्न असलेल्या आंतरराष्ट्रीय विकास मंडळाने आपणास सुमारे ७४१ कोटी रुपये किंमतीच्या परदेशी चलनाची एकूण ३४ कर्जे दिली. यातील बहुतेक कर्जे १५ ते २० वर्षे मुदतीची असून ४ ते ५ टक्के व्याजाची आहेत. कर्ज देणाऱ्या संस्था आंतरराष्ट्रीय असल्याने या कर्जाचा उपयोग करून त्या संस्थांचे सभासद असलेल्या कोणत्याही देशातून हवा तो माल आपणास आणता येतो. या काळात मंजूर कर्जापैकी प्रत्यक्ष सुमारे ५८१ कोटी रुपये किंमतीच्या परदेशी चलनाची उचल आपण केली आहे.

परंतु एवढ्यानेही न भागल्याने आपण अनेक देशांकडे आर्थिक साहाय्याची विनंती केली. नव्याने स्वतंत्र झालेल्या भारतासारख्या अविकसित देशात नव्याने, नव्या ढंगाने चंचुप्रवेश करण्याची संधी पाश्चात्त्य प्रगत राष्ट्रे पाहातच होती. त्यांनी भारतास विविध रीतींनी साहाय्य देऊ केले. अविकसित देशांना प्रगत देशांनी आर्थिक साहाय्य देण्याचा परिचित प्रकार म्हणजे परदेशी चलन देणगी म्हणून किंवा कर्जाऊ देणे. अशा वेळी दान अथवा कर्ज देणारा देश साहजिक अशी अट घालतो की त्याने उपलब्ध करून दिलेल्या परकीय चलनाचा उपयोग करून अप्रगत देशाने त्याचाच माल घ्यावा. ही इच्छा अथवा अट साहजिक म्हणण्याचे कारण इतकेच की, या सर्व व्यवहाराला आर्थिक साहाय्य असे शिष्टसंमत नामाभिधान असले तरी वास्तविक आंतरराष्ट्रीय व्यापार-व्यवहाराचाच तो एक भाग आहे, असे मानणे अधिक उचित होईल. असे मानणे किंवा निदान उघड म्हणणे म्हणजे कृतज्ञतेच्या अभावाचे लक्षण आहे असे पुष्कळ सज्जनांना वाटते. परंतु त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय व्यवहाराचे वास्तविक स्वरूप समजणे अवघड जाते, एवढेच.

साहजिकच आपणांस मिळालेली आर्थिक मदत सुरुवातीसुरुवातीस पुष्कळशी देणगी स्वरूपात होती. पुढे पुढे ती अधिकाधिक कर्जाऊ होऊ लागली. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपणास एकूण सुमारे ४०० कोटी रुपयांचे परकीय चलन देणगीदाखल मिळाले. त्यात अमेरिकेकडून सुमारे १९८ कोटी रुपयांच्या, कॅनडाकडून सुमारे १७६ कोटी रुपयांच्या आणि ऑस्ट्रेलियाकडून सुमारे २५कोटी रुपयांच्या, अशा प्रमुख

नूतन दीपावली वर्ष बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांना भरघोस यशाचे व समृद्धीचे जावो.

**आपण हे करता काय ?**

आपण आपल्या नित्याचे खर्चातून काही बचत करता काय? जर करीत नसाल तर ह्या वाढत्या महागाईच्या कालात तुमचा तरणोपाय नाही. तुमचा भविष्यकाल उज्ज्वल व्हावयास पाहिजे आहे ना ? मग आजपासूनच तुम्हास शक्य होईल त्याप्रमाणे बचत करणेस सुरवात करा. तुम्हास बचतच करावयाची आहे ना मग चला आमचेकडे. परंतु हो आम्हीच आपल्या सोयीसाठी आमचे हरभट रोडवरील मुख्यकार्यालयाखेरीज गावभाग, खणभाग, विश्रामबाग, माधवनगर, बुधगाव व मराठवाड्यातील बीड व परभणी या ठिकाणी आलो आहोत. आमच्या शाखाप्रमुखांना भेटा ते तुमच्या कुवतीप्रमाणे व तुम्हास पसंत येतील अशा बचत योजना समजावून देतील त्यातील तुम्हास खचीतच पसंतीस येतील, मग या दिपावलीच्या शुभमुहूर्तावर तुम्ही आमचे ठेवीदार होणार ना ? आमची बँक आपल्या महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळीतील एक अग्रगण्य बँक असलेने तुम्हास तुमच्या बँकेविषयी निःसंशय अभिमान वाटेल.

शाखा विस्तार : सात

## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.,

**सांगली** | मुख्य कार्यालय : हरभट रोड, सांगली

वा. वि. वाटवे, बी.ए.,एलएल.बी., कार्याध्यक्ष.
ल. य. लागू, बी.ए.,एलएल.बी., व्यवस्थापक.

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

नांदेड | चेअरमन :— श्री. शामरावजी कदम

बँकेने जिल्ह्यातील व्यापारी बंधूंच्या सोयीसाठी एक नवीन योजना जाहीर केली आहे. आता नांदेड जिल्ह्याचा लहानातला लहान व्यापारीदेखील खालील राज्यांतील बँकेतील ड्रॉफ्ट घेऊ शकतो.

(१) म्हैसूर जिल्ह्यातील १९ जिल्हा बँका. (२) केरळ राज्यातील ८ जिल्हा बँका. (३) मद्रास राज्यांतील १३ जिल्हा बँका. (४) गुजरात राज्यातील १२ जिल्हा बँका. या शिवाय दिल्ली, मणिपूर, पाँडिचरी, त्रिपुरा, आणि हिमाचल प्रदेशांतील राज्य बँका. सर्व गरजू सहकारप्रिय बंधूंनी या सवलतीच्या योजनेचा अवश्य फायदा घ्यावा. त्याचप्रमाणे सर्व जनतेला बचतीची सवय लागावी म्हणून बँकेत ठेवीवरील व्याजाचे फायदेशीर दर जाहीर केले आहेत.

*सांपत्तिक स्थिती*

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. | १०८·०८ लाख |
| गंगाजळी | रु. | १४·८२ ,, |
| गुंतवणूक | रु. | ८७·३१ ,, |
| ठेवी | रु. | ३११·२४ ,, |
| वाटलेली कर्जे | रु. | ७२३·०२ ,, |
| खेळते भांडवल | रु. | ८९७·४१ ,, |

वा. न. संत, मॅनेजर

# इचलकरंजी जनता सहकारी बँक लिमिटेड

स्थापना : ७ फेब्रुवारी १९६२ ] इचलकरंजी [ फोन नंबर २१३

पाच वर्षांचे अल्पावधीत इचलकरंजीचे जनतेत विश्वासाचे प्रतीक झालेल्या या संस्थेची भरभराट खालील आकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ३,९१,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. | २,३२,४०० |
| ठेवी | रु. | ३५,०५,००० |
| खेळते भांडवल | रु. | ४४,८३,००० |

**सभासदांचे सेवेसाठी अल्प हप्तेबंदीने**
रेडिओ, सायकल, घरगुती फर्निचर, इलेक्ट्रिक मोटार, ह्युमिडीफायर्स, रिफ्रिजेटर्स, शिवणयंत्रे,
**इत्यादी वस्तू आता बँक पुरवीत आहे.**

**ठेवीदारांना आकर्षक व्याजाचे दर**

| | |
|---|---|
| मुदतबंद ठेव : | ७ ते ८½ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव : | ४ टक्के |
| चालू ठेव : | १ टका |
| कॉल डिपॉझिट : | ५½ ते ७ टक्के |
| बचतगृह पेटी ठेव : | ५ टक्के व मुदतीनुसार त्यात वाढ केली जाते. |

के. बी. आवाडे, चेअरमन.

ह्याखेरीज कंपलसरी सेव्हिंग्ज व रिकरिंग डिपॉझिटस् ह्या आकर्षक व्याजाचे दरातील ठेवी स्वीकारल्या जातील.

परपेठ हुंड्या सवलतींचे दरात डिस्कौंट केल्या जातात व वसुलीसाठी घेतल्या जातात.

अधिक माहितीसाठी समक्ष भेटा अगर लिहा.

आर. पी. कुलकर्णी, मॅनेजर.

देणग्या होत्या. संयुक्त राष्ट्रसंघाच्या निधीतून सुमारे ८५ कोटी रुपयांची देणगी मिळाली. बाकीच्या देणग्या आठ राष्ट्रांकडून प्रत्येकी एक ते पाच कोटी रुपये किंमतीच्या परकीय चलनाच्या होत्या.

आंतरराष्ट्रीय व्यवहारात अशा देणग्यांचा राजकीय व व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याकरता चांगला उपयोग होतो. अर्थातच अशा देणग्या एक देश दुसऱ्या देशास केवळ व्यापारी दृष्टीने फार काळ देऊ शकत नाही. आवश्यक ते व्यापारी संबंध प्रस्थापित झाले म्हणजे आर्थिक मदतीचे स्वरूप कर्जाऊ होते. कोणताही कारखानदार, दुकानदार हेच करतो. बाजारात मालाला उठाव नसला म्हणजे दुकानदार माल उधार, हप्तेबंदीने देऊ करतो. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात सतरा देशांनी सुमारे २,८३४ कोटी रुपये किंमतीची अशा तऱ्हेची व्यापारी कर्जे आपणास दिली आहेत. त्यापैकी अमेरिकेने सुमारे ९९१ कोटी, रशियाने सुमारे ४८४ कोटी, पश्चिम जर्मनीने सुमारे ४४७ कोटी, इंग्लंडने सुमारे ३६५ कोटी, जपानने सुमारे १६५ कोटी रुपये किमतीची कर्जे दिली आहेत. या सर्व कर्जांचा उपयोग आपणास त्या त्या देशातून लागेल तो माल खरेदी करण्याकरताच करता येतो. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपण प्रत्यक्ष सुमारे १,९१०कोटी रुपयांचे कर्ज उचलले आहे. त्यापैकी ३१६ कोटी रुपयांची कर्जे कम्युनिस्ट राष्ट्रे म्हणजे रशिया, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड आणि युगोस्लाव्हिया यांजकडून घेतलेली आहेत. बाकीची १,५९४ कोटी रुपयांची कर्जे भांडवलवादी राष्ट्रांकडून घेतलेली आहेत. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय विकास मंडळाकडून उचललेली ५८१ कोटी रुपयांची कर्जे यात मिळविली म्हणजे तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात आपण सुमारे २,५०० कोटी रुपये किंमतीची परदेशी कर्जे घेतली आहेत असे दिसते. खेरीज ७००–७५० कोटी रुपयांची गंगाजळी आपण संपविली, ती वेगळीच.

परदेशी चलनात घेतलेली ही बहुतेक कर्जे परदेशी चलनातच सव्याज परत करावयाची आहेत. अशा परतफेडीला आवश्यक ते परदेशी चलन आपली निर्यात जेव्हा आपल्या आयातीपेक्षा जास्त होईल तेव्हाच मिळू शकेल. कम्युनिस्ट राष्ट्रांकडून घेतलेली कर्जे त्या त्या देशांना हवा असलेला तेवढ्या किंमतीचा माल त्यांना देऊन परत करावी लागतात. म्हणजे पुन्हा निर्यातीचाच प्रश्न आला. परंतु आयातीपेक्षा आपली निर्यात जास्त होण्याचा संभव नजिकच्या भविष्यकाळात तरी दिसत नाही. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीस आपली निर्यात सुमारे ६५० कोटी रुपयांची होती हे सांगितलेच आहे. १९६०-६१ साली, म्हणजे दहा वर्षांनी, दोन पंचवार्षिक योजनांच्या शेवटी, ती तेवढीच राहिली; मुळीच वाढली नाही. उलट आयात मात्र ६५० कोटी रुपयांवरून १,१०० कोटी रुपयांवर गेली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात निर्यात सुमारे १५० कोटी रुपयांनी वाढून ८०० कोटी रुपयांपर्यंत गेली, परंतु त्याचबरोबर याच काळात आयातही जवळ जवळ २५० कोटी रुपयांनी वाढून १,३०० कोटी रुपयांवर गेली. म्हणजे निर्यात आयातीपेक्षा अधिक होण्याचे दूरच राहो; आयात-निर्यातीतील प्रतिकूल तफावत वाढतच गेली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत म्हणजे १९६४–६५ आणि १९६५–६६ या साली आपली आयात निर्यातीपेक्षा सुमारे ५७५ कोटी आणि ५५० कोटी रुपयांनी अधिक होती. १९६६ साली रुपयाचे अवमूलन झाल्याने आयाती–निर्यातीतील ही तफावत आणखी वाढली. १९६६–६७ साली ती ८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक होती.

दरम्यान, कर्जफेडीचे हप्ते सुरू झाले आहेत. सध्या सुमारे २० कोटी डॉलर मुद्दली आणि १५ कोटी डॉलर व्याजापायी असे ३५ कोटी डॉलरचे वार्षिक हप्ते आपणास भरावे लागतात. हे हप्ते यापुढे काही वर्षे वाढतच जाणार. हे हप्ते भरण्यास आवश्यक ते परदेशी चलन आपणाजवळ नाही. म्हणून अब्रू झाकण्याकरता नवीन कर्ज काढून जुनी कर्जे फेडणे आपण सुरू केले आहे. पण हे फार काळ जमणार नाही. आता नवीन कर्जही मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे यंदा जागतिक बँक, इंग्लंड, कॅनडा, जपान, पश्चिम जर्मनी आणि ऑस्ट्रिया यांचे सुमारे १० कोटी डॉलरचे हप्ते आपण देऊ शकलो नाही. या सावकारांनी कृपाळू होऊन किंवा नाइलाजाने काही कर्जात सूट दिली आहे. काही कर्जांची मुदत वाढवून दिली आहे. बाकी सर्व कर्जांबाबतही अशीच याचना आपण सर्व सावकारांकडे सुरू केली आहे.

अशा लाचार वागण्याने अब्रू उघडी पडायची ती पडतेच. शिवाय नानातऱ्हेच्या राजकीय दडपणांना आपण असाहाय्यपणे बळी पडतो. यापेक्षा अधिक स्वाभिमानाचा आणि स्वनिष्ठेचा मार्ग स्वीकारावयास हवा. ही सारी कर्जे व्यापारी हिशेबाने दिलेली आणि घेतलेली आहेत. या कर्जांबाबत आपले व्यापारी हिशेब चुकले आहेत हे उघड आहे. देणाऱ्याचेही हिशेब चुकले आहेत असे स्पष्ट सांगून मोकळे होणे हाच आता राजमार्ग आहे. आम्ही सर्व कर्जे सव्याज परत करू, पराकाष्ठा करून ठरलेल्या हप्तेबंदीने फेडू, परंतु हप्ता चुकला तर नाईलाज आहे. तगादा लावून उपयोग होणार नाही, असे स्पष्ट सांगून टाकणेच आपल्या राष्ट्रीय हिताचे आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेबाजारात काही काळ आपली पत राहाणार नाही. आपणास कोणी नवीन कर्जे देणार नाही. परंतु त्याचबरोबर आपली निर्यात वाढली नाही तर आपण कर्ज फेडू शकत नाही हे सर्वांस कळत असल्याने ज्याला आपली कर्जफेड हवी असेल तो देश आपला माल विकत घेण्यास तयार होईल. आज आपली निर्यात न वाढण्याचे एक प्रमुख कारण असे आहे की आपला चांगला

नवता
मांगल्य
बंधुभाव
एकात्मता

हे सर्व म्हणजे

दीपावली



ऐक्याचे दीप घरोघरी उजळू देत

प्रसिद्धी संचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई

नवीन माल : : : : : : योग्य किंमत

☆ जरीची लुगडी, ☆ फॅन्सी साड्या, ☆ सुंदर बनारसी शालू

व

— सर्व मिलचा माल —

याकरिता

शाहाडे आठवले प्रा. लि., दादर

(टे. नं. ४५४५५१) मुंबई २८

विजय शाहाडे, मॅनेजिंग डायरेक्टर.

वसुली पेक्षा भारतावरील कर्जाचा बोजा वाढवून त्यावर शक्य तेवढे राजनैतिक वर्चस्व प्रस्तापित करणेच हेच त्यांचे मुख्य उद्दिष्ट आहे. कर्जाबाबतचे आपले हिशेब चुकले आहेत तेव्हा देणाऱ्यांचेही चुकविले पाहिजेत. आता त्यांनी नाही म्हणण्यापूर्वीच आपण नवीन कर्जे काढणे एकदम बंद करावे, निर्यातीतून मिळेल त्या परदेशी चलनातून कर्जाचे बांधलेले हप्ते देऊन बाकी राहील त्यातून होईल तेवढीच आयात करावी. आज होणारी पुष्कळशी आयात देशातील उत्पादनास मारक ठरत आहे. ती बंद झाली की आज खुंटलेले, मंदावलेले आर्थिक जीवन नव्या जोमाने, नव्या निष्ठेने पुढे सरकेल. या राष्ट्राची स्वनिष्ठा आणि पुरुषार्थ अजूनही जागृत आहे. परंतु गेली वीस वर्षे जनतेपासून हळूहळू दुरावत गेलेले लोकनेते आज जनतेस कोणतेच आवाहन करू शकत नाहीत; उलट जनतेशी प्रतारणा करून राष्ट्राची अब्रू जगाच्या बाजारात मांडीत आहेत.

परंतु काही झाले तरी परदेशी चलनात परत करावयाच्या या व्यापारी कर्जापायी सावकार सहजगत्या घरात शिरत नाही. तो सहसा बाहेरच उभा राहातो. पण आपण एवढ्यावरच थांबलो नाही. सुरवातीपासून आपल्या आर्थिक विकासाकरता म्हणून आपण काही अन्य प्रकाराचेही आर्थिक साहाय्य स्वीकारले त्याचे स्वरूप निव्वळ व्यापारी वा आर्थिक नव्हते, तर राजकीय आणि सांस्कृतिक होते. या सहाय्याचे निमित्ताने परकीयांचा घरात दिवसाढवळ्या थेट प्रवेश झाला आहे आणि या घराचा खरा मालक कोण, घर निर्वेध आहे की गहाण आहे असा प्रश्न घरातील आणि बाहेरील माणसे विचारू लागली आहेत. अशा प्रकारची मदत मुख्यतः अमेरिकेकडून मिळालेली आहे. त्या मदतीचे स्वरूप स्पष्ट समजण्यासाठी तिची सुरवात कशी झाली आणि राष्ट्राच्या आर्थिक जीवनात ती कसकशी रुजत गेली ते समजावून घेणे जरूर आहे.

अमेरिकेकडून आपणास होत असलेल्या आर्थिक साहाय्याची सुरवात आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीसच झाली. युद्धकाळात सुरू झालेला आपला अन्नधान्याचा प्रश्न स्वातंत्र्यानंतरही चालूच राहिला होता. युद्धकाळात आपत्काल म्हणून सुरू केलेले नियंत्रित शिधावाटप चालू ठेवावे किंवा नाही, याबाबत सरकारचे धोरण धरसोडीचे झाले. शेवटी, १९५१ साली, पंचवार्षिक योजनेच्या सुरवातीसच अन्नधान्य परिस्थिती बिकट झाली. म्हणजे, नियंत्रित दरात शिधावाटपाची जी जबाबदारी सरकारने पत्करली होती ती पुरी करण्यास आवश्यक तेवढे धान्य नियंत्रित दरात शेतकऱ्यांकडून वसूल करणे सरकारास अशक्य झाले. परदेशातून धान्य आणावे तर त्याकरता लागणाऱ्या परदेशी चलनाची चणचण होती. त्याकरिता गंगाजळीतून आणखी पैसे काढणे योग्य वाटेना. जागतिक बँकही धान्य आयातीकरता कर्ज देण्याचा संभव कन गहू उधारीने देण्याची विनंती केली. अमेरिकेने ही विनंती मान्य करून जून, १९५१ मध्ये भारताला सुमारे १९ कोटी डॉलर (सुमारे ९० कोटी रुपये) किंमतीचा २० लक्ष टन गहू उधार दिला. त्याची परतफेड डॉलरमध्ये करावयाची होती. त्यावर अडीच टक्के व्याज होते. परतफेड जून, १९५७ पासून अठरा सहामाही हप्त्याने व्हावयाची होती. अमेरिकेने भारतास दिलेले हे पहिले डॉलर कर्ज.

भारतानेही एखाद्या परराष्ट्राकडून काढलेले हे पहिलेच कर्ज. जागतिक बँकेकडून काढलेल्या कर्जात आणि या कर्जात असलेला फरक समजावून घेतला पाहिजे. सहकारी सोसायटीतून शेतकरी कर्ज काढतो आणि खाजगी सावकाराकडून काढतो त्यात जो फरक आहे तोच हा फरक आहे. आपण बँकेतून तारण ठेवून कर्ज काढतो ते कर्ज आणि वाण्याची उधारी ठेवतो यात जो फरक आहे तोच हा फरक आहे. खेरीज ज्या परिस्थितीत वा ज्या पद्धतीने भारताने या कर्जाकरता याचना केली तीही लक्षात ठेवली पाहिजे. शेतकरी विहिरीकरता, पंपाकरता, ट्रॅक्टरकरता कर्ज मागतो तसे हे कर्ज नव्हते, तर शेतकरी खावटीकरता धान्य मागून आणतो तसे हे कर्ज होते. आपण घराकरता, कारखान्याकरता कर्ज काढतो तसे हे कर्ज नव्हते, तर आज रेशन आणण्याला पैसा नाही म्हणून सावकाराकडे जातो तसे हे कर्ज होते. या कर्जाने आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेचा प्रारंभ झाला.

फार दिवस पिंजऱ्यात बसून खाणारा पोपट त्याचा मालक एखादे दिवशी पिंजऱ्याचे दार उघडे टाकून निघून गेला तर आज आपणास खाण्यास कोण देईल या विवंचनेत पिंजऱ्यातच बसून रहातो असे म्हणतात. काहीसा तसाच हा प्रकार आहे हे अमेरिकन राजनीति-चतुरांनी ताडले असल्यास नवल नाही. शिवाय, फार दिवस धन्याबरोबर राहून या पोपटाला अस्खलित इंग्रजी बोलता येत होते. पिंजऱ्यात बसल्या बसल्या आधुनिक राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, आणि आर्थिक विकासाचे सिद्धांत तो येणाऱ्याजाणाऱ्याला घडाघडा म्हणून दाखवीत असे. त्यामुळे अमेरिकेला त्याचेशी संभाषण सुरू करणे अवघड पडले नाही. या संभाषणाची भाषा नवी असली, त्यातील शास्त्रार्थ आधुनिक असला तरी मथितार्थ जुना होता, प्राचीन होता.

जानेवारी, १९५२ मध्ये म्हणजे कर्जाऊ गहू दिल्यानंतर केवळ सहा महिन्यांतच अमेरिकेने भारताशी तांत्रिक सहकार्याचा करार केला. त्या अन्वये अमेरिकेने भारताच्या विकास योजनेकरिता लागणारे तांत्रिक आणि आर्थिक तज्ज्ञ व सल्लागार अमेरिकेतून पुरवावेत आणि भारतीय शिकाऊ उमेदवार तंत्रज्ञांना अमेरिकेत उच्च शिक्षण देण्याची व्यवस्था करावी, त्याकरिता अमेरिकेत करावयाचा खर्च अमेरिकेने करावा आणि भारतात होणारा खर्च भारताने करावा असे ठरले. हा कार्यक्रम आज-

लागायत चालू आहे. या कार्यक्रमाकरिता तीन पंचवार्षिक योज-नांच्या पंधरा वर्षांत अमेरिकेने सुमारे १४७ कोटी रुपये किंमतीचे डॉलर देणगीदाखल दिले. अमेरिकेने भारताला एकूण १६८ कोटी रुपयांचे डॉलर देणगी दिल्याचा उल्लेख केला आहे. त्यापैकीच हे १४७ कोटी आहेत. ( बाकीचे २१ कोटी रुपयांचे डॉलर फोर्ड फाउंडेशनने दिले आहेत. ) या सहकार्या-करिता भारताने किती कोटी रुपये खर्च केले त्याचा एकंदर आकडा उपलब्ध नाही. परंतु तो बराच मोठा असण्याचा संभव आहे. या सहकाराची निष्पत्ती म्हणून या पंधरा वर्षांत १,२७१ अमेरिकन तज्ज्ञ व सल्लागार भारतात येऊन गेले आणि ४,५४२ भारतीय शिकाऊ उमेदवार तज्ज्ञ अमेरिकेत जाऊन आले. अमेरिकन आहे तो तज्ज्ञ असणारच या भावनेने आम्ही १,२७१ अमेरिकन तज्ज्ञांचे स्वागत केले. त्यांना प्रधानमंत्र्यापर्यंत सर्व रस्ते मोकळे होते. भारतात त्यांच्या आवतीभोवती काम करणारी माणसे साहेबांची ओळख झाली, मेहेरबानी झाली, तर आपल्याला अमेरिकेत जाता येईल या आशेने आपली सर्व कामे बाजूस ठेवून साहेबांच्या मागे मागे हिंडत होती. त्यापैकी ४,५४२ लोकांची वर्णी लागली. हे त्यांच्या आयुष्यातील अपूर्व यश म्हणून आम्ही त्यांचे अभिनंदन केले आणि सत्कारपूर्वक बोइंग ७०७ विमानाने त्यांची अमेरिकेस रवानगी केली. जे अमेरिकन तज्ज्ञ आले त्यांची अमेरिकेतील लायकी काय, त्यांच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा भारताला लाभ होण्याचा संभव काय, याची आम्ही कुणाकडे चौकशी [illegible] पाठविले ते तेथे काय शिकले, ते परत आल्यानंतर त्याचा काय काय उपयोग करीत आहेत याचीही आम्ही कधी विचारपूस केली नाही. अमेरिकेला जाऊन येणे हीच आयुष्याची इति-कर्तव्यता मानल्याने तेथून परत आल्यानंतर ते येथे काय करीत आहेत हे विचारण्याचे कारणच नव्हते.

१९५२ साली केलेल्या तांत्रिक सहकार्याच्या करारात आणखी दोन महत्त्वाच्या तरतुदी होत्या. तांत्रिक सहकार्याच्या कार्य-क्रमाकरिता लागणारे पुष्कळसे साहित्य अमेरिकेने अमेरिकेत खरेदी करून भारतास दिले. त्यात रासायनिक खते, पोलाद, आगगाड्यांचे डबे व वाफेची, मच्छीमारीची अवजारे, इत्यादी विविध माल होता. हा माल अमेरिकेने भारतास दिला परंतु तो देणगी स्वरूपात न देता कर्जाऊ दिला. त्याची किंमत ४२·२२ कोटी रुपये झाली. या कर्जावर चार टक्के दराने व्याज आका-रावयाचे होते आणि त्याची परतफेड चार वर्षांनंतर सुरू करून ३६ वार्षिक हप्त्यांनी करावयाची होती. १९५१ साली कर्जाऊ गहू दिला त्यावर अडीच टक्के दराने व्याज आकारले होते. त्या मानाने हे व्याज जास्त होते. परंतु या कर्जाच्या परत-फेडीत एक विशेष सवलत होती. गहू–कर्जाची परतफेड डॉलरमध्ये करावयाची होती. उलट, तांत्रिक सहकार्याच्या या कर्जाची फेड रुपयांत करावयाची होती. एका अर्थाने






ही फार महत्त्वाची सवलत होती म्हणून आपण तिचे स्वागतही केले. या तरतुदीमुळे एका देशाने दुसऱ्या देशास द्यावयाच्या मदतीत एक नवीन प्रकार प्रस्थापित झाला. त्याचे होणारे दूरगामी परिणाम त्या वेळी आपल्या लक्षात आले नाहीत. आज ते भोवत आहेत.

तांत्रिक सहकार्याच्या करारानुसार अमेरिकेकडून आलेल्या या साहित्यात भारत सरकारने पदरची भर घातली. हे सर्व साहित्य तांत्रिक सहकार्याच्या कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या संस्था आणि सरकारी परंतु व्यापारी तत्त्वावर चालणारी रेल्वेसारखी खाती, यांना विकत दिले गेले. राज्य सरकारांना कर्जाऊ दिले गेले. या मालाच्या विक्रीची रक्कम आणि राज्य सरकारांकडून येणारे कर्जफेडीचे हप्ते भारत सरकारने एका खास विकास निधीत जमा करावेत आणि या निधीचा उपयोग अमेरिकन सरकार संमत करील अशा विकासकार्यावर खर्च करावा अशी या करारात दुसरी तरतूद होती. त्यानुसार तीन पंचवार्षिक योजनांच्या पंधरा वर्षांत या खास विकास निधीत ७५·६८ कोटी रुपये जमा झाले. त्यापैकी ७·५ कोटी रुपये भारतीय औद्योगिक पत पुरवठा आणि गुंतवणूक महामंडळाला भांडवल म्हणून देण्यात आले आणि बाकीचे गटविकास योजनांवर खर्च केले. या रकमा खर्च झाल्या ते कार्यक्रम महत्त्वाचे होते की नाही हा गौण मुद्दा आहे. त्याकरता अमेरिकन सरकारची संमति घ्यावी लागली हा मुख्य मुद्दा आहे. एवढे करूनही मूळ कर्ज, रुपयांत का होइना, परतफेड करण्याची जबाबदारी आपल्या डोक्यावर राहिली ती राहिलीच.

अशा रीतीने १९५२ च्या तांत्रिक सहकार्याच्या करारानुसार भारत-अमेरिका आर्थिक सहकारात प्रारंभीच दोन महत्त्वाची तत्त्वे प्रविष्ट झाली. मदतीचा एक नवीन प्रकार आंतरराष्ट्रीय व्यवहारात निर्माण झाला. त्यायोगे परदेशी कर्जाची परतफेड रुपयांत करण्याची सोय झाली. सरकारमार्फत आणलेला परदेशी माल बाजारात विकला जाऊ लागला. अशा विक्रीचे रुपये तसेच कर्जफेडीत दिलेले रुपये एका स्वतंत्र निधीत जमा करण्याची व्यवस्था झाली आणि या निधीच्या पुढील विनियोगावर परकीय अधिकार प्रस्थापित झाला. जी मदत द्यावयाची तिच्या जोरावर ज्याला मदत द्यावयाची त्याच्या जीवनावर आणि धोरणावर अधिकाधिक प्रभुत्व प्रस्थापित करावयाची आंतरराष्ट्रीय राजनीति मदतीच्या या प्रकारात स्पष्ट झाली. अठराव्या शतकातील वॉरन् हेस्टिंग्जच्या तैनाती फौजेचा हा आधुनिक अवतार होता. परंतु या तैनाती फौजेचा धोका अजूनही आमच्या लक्षात आलेला नाही. फुकट मिळते ना, मग ते काहीही असो, त्याकरता पदर पसरावयाचा ही आमची राजकीय अर्थनीती आहे. फुकट मिळते ते पदरात पाडून घेण्याकरिता पदरचा किती खर्च होतो याचे भान आम्हांला राहात नाही. ज्या बाबींवर तो खर्च होतो त्यांना किती प्राधान्य द्यावयाचे याचा आम्ही विचार करीत नाही आणि जे फुकट मिळाले त्याची किंमत पैशात दिली नाही पण दुसऱ्या कशात दिली का, हा प्रश्न आम्ही कधी स्वतःस विचारीत नाही. अमेरिकेसारख्या संपन्न राष्ट्राला चंचुप्रवेश करावयाला आदर्श परिस्थिती या देशात होती.

अमेरिकन माल देशात विकून त्यांतून एक विकासनिधी उभा करावयाचा आणि त्याचा विनियोग अमेरिकेच्या संमतीने करावयाचा ही कल्पना आपल्या गळी इतक्या सहज उतरली हे पहाताच अमेरिकेने याच दिशेने आणखी एक पाऊल टाकले. १९५५ साली अमेरिकेत गहू, कापूस आणि इतर काही शेत-मालाचे शिलकी साठे पडून होते. आंतरराष्ट्रीय बाजारात ते साठे काढणे शक्य नव्हते, आणि सालोसाल ते वाढतच जाणार अशी भीती निर्माण झाली होती, त्यातील काही माल भारतात विकून त्या रुपयांचा एक निधी निर्माण करावा आणि त्यातून आपणास इष्ट वाटतील त्या विकासकार्यक्रमांस मदत घ्यावी अशी कल्पना अमेरिकन सरकारच्या मनात आली. ती भारत सरकारच्या गळी उतरवण्याकरता अमेरिकेने एक नवीन सवलत दिली. जून, १९५१ मध्ये अमेरिकेने २० लक्ष टन गहू खरेदी करण्याकरता जे सुमारे १९ कोटी डॉलरचे कर्ज दिले होते त्याची परतफेड जून, १९५७ पासून सुरू व्हावयाची होती. ती करणे भारतास अवघड होईल म्हणून अमेरिकेने या कर्जाच्या परतफेडीची मुदत सुमारे तीस वर्षांनी वाढवून दिली. आता १९५१ साली गहू खरेदी करण्याकरता, म्हणजे खावटीकरता काढलेल्या या १९ कोटी डॉलर कर्जाची परतफेड भारत डिसेंबर, १९८६ पासून अठरा सहामाही हप्त्यांनी करणार आहे. आणखी कृपाळू होऊन अमेरिकेने या वाढीव मुदतीचे व्याजही माफ केले आहे. या व्यवहाराने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची पत किती वाढली असेल ते सांगणे नकोच.

परंतु आम्हांला त्याची खंत नव्हती. १९४५ साली अमेरिकेने आपल्या शिलकी साठ्यातून काही शेतमाल, विशेषतः गहू, भारतास देऊ केला. ही देणगी नव्हती पण हे कर्जही नव्हते. भारताने हा माल आयात करावयाचा होता. परंतु आयातीची किंमत डॉलरमध्ये देण्याची आवश्यकता नव्हती. ती रुपयांत देऊन भागणार होते. किंमत डॉलरमध्ये म्हणजे परकीय चलनात द्यावी लागली नाही म्हणजे आम्ही तो माल फुकट मिळाला असेच समजतो आणि काहीही फुकट मिळत असले तर दुसरा कोणताही विचार न करता ते पदरात पाडून घ्यावयाचा हे आमच्या राजकीय अर्थनीतीचे मुख्य तत्त्व आहे. वास्तविक १९५३–५४ आणि १९५४–५५ ह्या दोन्ही वर्षी आपल्या शेत-मालाचे उत्पादन उत्तम होते. १९५५ मध्ये तर धान्याच्या किंमती अतोनात घसरल्या होत्या. परंतु अमेरिकेने गहू व इतर शेतमाल देऊ केला आणि आम्ही तो घेण्यास तयार झालो. कारण का, तर त्याची किंमत डॉलरमध्ये द्यावी लागणार नव्हती.

अशा तऱ्हेने अविकसित देशांना शिलकी साठ्यांतून शेतमाल

# दि नासिक मर्चन्टस
## को-ऑपरेटिव्ह बँक लि., नासिक

( रजि. नं. २२०९५—दि. ११ जून, १९५९ )

दि. १३ सप्टेंबर १९६८ चे बोलके आकडे

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. १,८८,९००–०० |
| ठेवी | रु. २१,७१,०००–०० |
| कर्जव्यवहार | रु. १३,००,०००–०० |

ही दिवाळी आमचे भागीदार व आश्रयदाते यांना सुख-समृद्धीची जावो.

श्री. म. ग. शुक्ल — ऑन. मॅने. डायरेक्टर.

श्री. द. य. पोतनीस — चेअरमन



# दि नासिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँक लि.

तारेचा पत्ता : सहकार] नासिकरोड [ फोन नंबर : ५४५

( स्थापना १४ सप्टेंबर, १९६१ )

३१–८–६८ अखेर आर्थिक स्थिती

| | |
|---|---|
| भाग भांडवल | रु. १,५९,५०० |
| ठेवी | रु. ६ लाखांचेवर |
| कर्जे | रु. ५॥ लाख |

( १ ) ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर

( २ ) बँकिंगचे सर्व व्यवहार

शाखा : भगुर, जि. नाशिक

चं. वि. जाजु — चेअरमन

सो. मो. बूब — व्हा. चेअरमन

व. के. महादेवकर — मॅनेजर



# परभणी जिल्हा सहकारी भू-विकास बँक लि., परभणी

- शेतकऱ्यांचा कल्पवृक्ष
- अल्प व्याजाचा दर
- कर्ज परत फेडीस दीर्घ मुदत
- समान वार्षिक हप्त्याने फेड.

कर्तबगार शेतकऱ्यांनो, या बँकेच्या साहायाने शेती सुधारणा करा.

धान्याने भारत समृद्ध करा.

## सुजलाम्–सुफलाम् बनवा

आणि स्वतःच्या जीवनांत क्रांतिकारक बदल घडवून आणा.

ब. रं. वराडे — व्यवस्थापक

द. ज. अडाकणे — चेअरमन



शेती आणि लघु उद्योगधंदे यांच्या विकासासाठी सदैव झटणारी

इचलकरंजीच्या होतकरू व कर्तबगार कारखानदार व्यापारी बंधूंच्या उत्कर्षास साहाय्यभूत झालेली इचलकरंजीतील अग्रगण्य नागरी सहकारी बँक

# दि इचलकरंजी अर्बन को-ऑप. बँक लि.

स्थापना : १९३० ] इचलकरंजी [ फोन नं. ३१

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर्स भांडवल | रु. १०,००,००० |
| भरलेले भांडवल | रु. ६,४५,००० |
| रिझर्व्ह फंड | रु. ३,०४,००० |
| इतर फंडस | रु. ५,०७,००० |
| खेळते भांडवल | रु. १,००,८०,००० |

| ठेवीचे दर :– | |
|---|---|
| चालू | १ टक्का |
| सेव्हिंग्ज | ४ टक्के |
| मुदत ठेव | ५ ते ८ टक्के |
| कॉलडिपॉझिट | ५ ते ५॥ टक्के |
| कर्जाचा दर | ८ ते ११ टक्के |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. ज. वांडेकर — मॅनेजर

सदाशिव मारुती मुरदंडे — चेअरमन

देण्याकरिता अमेरिकेने १९५४ मध्ये दोन कायदे मंजूर केले होते. त्यातील एक म्हणजे 'परस्पर संरक्षणाचा कायदा' जो अमेरिकन सार्वजनिक कायदा क्रमांक ६६५ म्हणूनही ओळखला जातो. या कायद्याच्या ४०२ कलमाखाली अशा तऱ्हेने शेतमाल पुरविण्याची तरतूद होती. सन १९५५, १९५६ आणि १९५७ या वर्षांत या कायद्यान्वये आपण सुमारे ३२ कोटी रुपये किंमतीचा गहू आणि कापूस आयात केला. त्याची किंमत रुपयांत द्यावी लागली. या रुपयांचा अमेरिकेत काहीच उपयोग नसल्याने अमेरिकन सरकारने भारतात या रुपयांचा एक निधी उभा केला. त्यातून भारताला रिहांड नदी प्रकल्पाकरता सुमारे १० लक्ष रुपयांची देणगी दिली. अमेरिकेस संमत असलेल्या विकास योजनांकरता सुमारे २० कोटी रुपयांची कर्जे भारतास दिली. या कर्जाची परतफेड भारतास यथावकाश रुपयांतच करावयाची आहे. मग त्या रुपयांतून अमेरिकन सरकार भारतास पुनश्च कर्जे देईल. निधीपैकी उरलेले १२ कोटी रुपये अमेरिकन सरकारने आपल्या मर्जीनुसार भारतात खर्च केले. त्यातून अनेक अमेरिकन, कोणी सल्लागार, कोणी तज्ज्ञ, कोणी प्राध्यापक, कोणी संशोधक, कोणी काही, कोणी काही, भारतात येऊन गेले. त्यांचा भारतात होणारा खर्च या निधीतून झाला. त्यांनी त्यांच्या सान्निध्यात आलेल्या त्यांना महत्त्वाच्या आणि उपयुक्त भारतीयांचा पाहुणचार केला. अमेरिकेस विशेष आस्था वाटत असलेल्या व्यक्ती, संस्था आणि विकासयोजना यांना या निधीतून मदत मिळाली.


याच प्रकारची मदत आणखी मोठ्या प्रमाणावर करण्याची तरतूद करणारा दुसरा कायदा म्हणजे व्यापार आणि विकास साहाय्याचा कायदा, जो अमेरिकन सार्वजनिक कायदा क्रमांक ४८० म्हणूनही ओळखला जातो. या कायद्यान्वये तीन प्रकारांनी मदत देण्याची तरतूद आहे. त्यातला प्रमुख प्रकार म्हणजे अमेरिकन शिलकी शेतमाल अप्रगत देशांना त्यांच्या चलनाच्या बदल्यात विकत द्यावयाचा, त्या चलनाचा निधी त्या त्या देशात करावयाचा आणि त्या निधीतून त्या त्या देशांच्या सरकारांना विकासयोजनांकरता काही प्रमाणात देणग्या व कर्जे द्यावयाची आणि उरलेला निधी अमेरिकन राजदूतकार्याकरता खर्च करावयाचा. या कायद्यानुसार दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या दहा वर्षांत भारत सरकारने वेगवेगळे नऊ करार करून एकूण सुमारे १,५६२ कोटी रुपये किंमतीचा अमेरिकन शिलकी शेतमाल रुपयांत किंमत देऊन आयात करण्याची व्यवस्था केली. त्यात मुख्यतः म्हणजे सुमारे दोन तृतीयांश भाग गहू होता. शिवाय थोड्या थोड्या प्रमाणात तांदूळ, ज्वारी, मका, कापूस, तंबाखू, सोयाबीन तेल, दुधाची भुकटी, इत्यादी माल होता. एकूण किंमतीपैकी सुमारे २०५ कोटी रुपये सागरी वाहतुकीचा खर्च होता. त्यापैकी निदान निम्मी वाहतूक अमेरिकन जहाजातून केली पाहिजे अशी कायद्यातच तरतूद होती. परंतु वाहतूक अमेरिकन जहाजातून केली, तरी भाडे रुपयांत देण्याची सोय असे. जून, १९६५ पासून ही सवलत काढून घेतलेली आहे. आता अमेरिकन जहाजातून होणाऱ्या वाहतुकीचे भाडे आपणास डॉलरमध्ये द्यावे लागते.

अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० अनुसार अमेरिकन शिलकी शेतमालातून मदत मिळण्याचे आणखी दोन प्रकार आहेत. त्यातील एक प्रकार असा की, एखाद्या देशावर दुष्काळ, पूर, धरणीकंप, इत्यादी नैसर्गिक आपत्ती ओढवल्यास अमेरिकन सरकार आपल्या शिलकी शेतमालातून निव्वळ देणगी म्हणून मदत देते. भारतास आजपावेतो सुमारे ७.५ कोटी रुपये किंमतीचा माल अशा रीतीने देणगीदाखल मिळाला आहे. मदतीचा दुसरा प्रकार देणगी स्वरूपाचाच आहे. परंतु असा माल अमेरिकन सरकार त्या त्या देशांच्या सरकारांना देणगी न देता सार्वजनिक सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांना देते. या तरतुदीनुसार भारतात काम करणाऱ्या देशी-विदेशी विविध संस्थांना १०९ कोटी रुपये किंमतीचा माल आजपावेतो मिळाला आहे.

पहिल्या प्रकारानुसार आयात केलेल्या मालाची किंमत रुपयांत द्यावी लागते हे सांगितलेच आहे. माल अमेरिकेतून निघाल्याबरोबर भारत सरकार मालाची किंमत रिझर्व्ह बँकेत अमेरिकन सरकारच्या नावे एका खास खात्यात जमा करते. या रकमेचा विनियोग कसा करावयाचा, त्यापैकी भारत सरकारला देणगी म्हणून आणि कर्जाऊ किती द्यावयाचे आणि अमेरिकन सरकारने भारतातील स्वतःच्या खर्चाकरता किती ठेवावयाचे, हे आयातीच्या प्रत्येक करारात ठरते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जे पाच करार झाले त्यात सर्व मिळून सुमारे तिसरा हिस्सा रक्कम भारत सरकारास देणगीदाखल देण्याची तरतूद होती. परंतु तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात जे चार करार झाले त्यात देणगीची मुळीच तरतूद नाही. एकूण नऊ करार लक्षात घेता आयात मालाची किंमत सुमारे १,५६२ कोटी रुपये होते. करारांनुसार या रकमेचा विनियोग सुमारे ३७५ कोटी रुपये भारत सरकारला देणगीरूपाने, ८७२ कोटी रुपये कर्जरूपाने आणि उरलेले ३१५ कोटी रुपये अमेरिकन सरकारच्या खर्चाकरता, असा व्हावयाचा आहे.

तात्पर्य, मालाच्या एकूण किंमतीपैकी सुमारे पंचवीस टक्के रक्कम भारत सरकारास देणगी रूपाने मिळते. म्हणजे, थोडक्यात, मूळ किंमतीत तेवढी सूट मिळते. अमेरिकन शेतमालाच्या अमेरिकेतील किंमती आंतरराष्ट्रीय किंमतींच्या मानाने पाचपंचवीस टक्के वर ठेवलेल्या आहेत. त्यामुळे सूट वजा घातली तर भारत सरकारास अमेरिकन माल ढोबळ मानाने आंतरराष्ट्रीय बाजारभावाने मिळतो असे म्हणावयास हरकत नाही. परंतु एक मख्खी राहतेच. देणगी दिलेले हे ३७५ कोटी रुपये भारत सरकारने कोणत्या कारणाकरता खर्च करावेत, हे अमेरिकन सरकार

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा.
४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्





१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड.
शिवाय बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लिं. –
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

ही दिवाळी
साठे
बिस्किटस्
कोको व
चॉकोलेटस्
घेऊन अधिक उत्साहानें
व आनंदानें साजरी करा.
साठे बिस्किट अॅण्ड चॉकोलेट कं. लि., पुणे-२


ठरविते. ताच गोष्ट कर्जाऊ मिळणाऱ्या रकमेची. कर्जाऊ द्यावयाच्या रकमा कोणकोणत्या बाबीवर खर्च करावयाच्या ते तपशीलवार अमेरिकन सरकार ठरविते. त्या बाबी महत्त्वाच्या की गैरमहत्त्वाच्या हा प्रश्न, पूर्वी म्हटल्याप्रमाणे, गौण आहे. एवढ्या मोठाल्या रकमांचा भारतात होणारा विनियोग परकीय सरकारचे संमतीनेच करावा लागतो हे महत्त्वाचे आहे.

अमेरिकन सरकारच्या अखत्यारीतील उरलेल्या ३१५ कोटी रुपयांपैकी सुमारे १०९ कोटी रुपये अमेरिकन सरकारने भारतातील अमेरिकन कारखानदार आणि त्यांच्याशी सहकार्य करणाऱ्या देशी कारखानदारांना कर्जाऊ द्यावयाचे आहेत. उरलेले २०६ कोटी रुपये अमेरिकन सरकारच्या भारतातील दूतवासाच्या खर्चाकरता आहेत. दूतवासातून चालणाऱ्या सर्व उद्योग-उपद्व्यापांचा त्यात समावेश होतो.

अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० खाली केलेल्या उपरिनिर्दिष्ट नऊ करारांनुसार भारताने दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनांच्या दहा वर्षांत प्रत्यक्षात १,३७० कोटी रुपयांचा अमेरिकन शेतमाल खरेदी केला आणि भारत सरकारने एवढी रक्कम अमेरिकन सरकारच्या नावे रिझर्व्ह बँकेत जमा केली. करारानुसार करावयाच्या विनियोगाप्रमाणे ३१ मार्च, १९६६ पर्यंत प्रत्यक्षात ९८३·५ कोटी रुपयांचा खर्च झाला होता. यात ३१६·४ कोटी भारत सरकारास देणगीदाखल, ५२८·९ कोटी भारत सरकारास कर्जाऊ, ४४·७ कोटी खाजगी कारखानदारास कर्जाऊ आणि ९३·५ कोटी रुपये अमेरिकेत दूतवासाचा खर्च अशा रकमांचा समावेश आहे. उरलेले ३८६·५ कोटी रुपये यथावकाश खर्च होणार होते, परंतु ३१ मार्च १९६६ रोजी ते रिझर्व्ह बँकेत शिल्लक पडून होते. अमेरिकन सरकारच्या मालकीच्या अशा शिल्लक रकमा रिझर्व्ह बँक एका खास सरकारी कर्जरोख्यात गुंतवते; म्हणजेच, पर्यायाने, भारत सरकारास कर्जाऊ वापरावयास देते.

तात्पर्य, अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० खाली अमेरिकन गहू किंवा इतर शेतमाल आयात केला की भारत सरकारला त्याची किंमत रुपयात द्यावी लागत असली तरी प्रत्यक्षात यापैकी बहुतेक सर्व रुपये भारत सरकारला पुनश्च वापरावयास मिळतात. आपण वर पाहिल्याप्रमाणे या रुपयांतून अमेरिकन दूतवासाचा जो प्रत्यक्ष खर्च होईल तो आणि अमेरिकन सरकारमार्फत भारतातील अमेरिकन कारखानदार किंवा अमेरिकन सहकाराने चाललेल्या देशी कारखानदारांना जी कर्जे या रुपयांतून दिली जातील ती वजा करता, बाकीचे सर्व रुपये भारत सरकारला पुनश्च वापरावयास मिळतात. काही रुपये देणगी म्हणून मिळतात. काही रुपये दीर्घ मुदतीच्या कर्जाने मिळतात. बाकीचे शिल्लक रुपये रिझर्व्ह बँक खास सरकारी कर्जरोख्यात गुंतविते. त्यामुळे भारत सरकारला ते अल्प मुदतीच्या कर्जाने मिळतात. कर्जाऊ मिळणाऱ्या सर्व रकमांवर

[illegible] लागते हे खरे. [illegible] किंवा दीर्घ मुदतीच्या कर्जाने मिळणाऱ्या रकमा कोणत्या कामाकरता खर्च कराव्यात यासंबंधी अमेरिकन सरकारची संमती घ्यावी लागते, हेहि खरे. परंतु कोणत्याही अटीवर का होईना, एवढे रुपये वापरावयास मिळतात, हे भारत सरकारच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

अमेरिकन सरकारच्या मालकीचे हे कोट्यवधी रुपये जे भारत सरकारास कर्जाऊ वापरावयास मिळतात, त्यातच आणखी एका प्रकारची भर सतत पडत असते. तांत्रिक सहकार्याच्या करारानिमित्ताने अमेरिकेने भारतास दिलेल्या सुमारे ४२ कोटी रुपये किंमतीच्या डॉलर कर्जाचा उल्लेख मागे केला आहेच. त्याची सव्याज परतफेड डॉलरमध्ये न करता रुपयांत करण्याची सवलत दिल्याचेही सांगितले होते. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अमेरिकेने अशाच तऱ्हेची आणखी सुमारे २५१ कोटी रुपये किंमतीच्या डॉलरची कर्जे भारतास दिली आहेत. त्यांची सव्याज परतफेडही रुपयांत करण्याची सोय आहे. अमेरिकन गहू आणि इतर शेतमालाच्या विक्रीतून भारत सरकार आणि खाजगी कारखानदार यांना जी सुमारे ६०० कोटी रुपयांची कर्जे दिली आहेत त्यांची सव्याज परतफेडही रुपयांतच व्हावयाची आहे. कर्जफेडीच्या हप्त्याचे हे सर्व रुपये अमेरिकन सरकारच्या नावे रिझर्व बँकेत जमा होतात. शिवाय या खात्यात वेळोवेळी शिल्लक असलेल्या रकमेवर रिझर्व बँक व्याज देते ते जमा होते. ३१ मार्च, १९६६ रोजी कर्जफेडीचे आणि व्याजाचे मिळून सुमारे २०८ कोटी रुपये या खात्यात जमा होते. अमेरिकन सरकार या रुपयाचे काय करणार? ते तसेच बँकेत पडून राहतात. रिझर्व बँक ते सरकारी कर्जरोख्यात गुंतविते; म्हणजे भारत सरकारास पुनश्च कर्जाऊ देते.

आता हसावे की रडावे? आम्हास वाटते छान आहे. कर्ज फेडले तरी पुनः आपणाकडेच येते. आणखी काय हवे? परंतु त्याचाच अर्थ असा की, या कर्जाची फेड कर्जफेडीने होणार नसून वस्त्रफेडीने होणार आहे. तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात अशा तऱ्हेचे सुमारे १,००० कोटी रुपयांचे कर्ज अमेरिकेने भारत सरकारास दिले आहे. ते फेडून फिटणारे नाही. अमेरिकेने एक दिवस या सर्व रकमेचे दानच केले तरच ते संपेल. परंतु त्यांचा हेतू सफल होईपर्यंत अमेरिकेने त्यांचे दान करून टाकण्याचे काहीच कारण नाही. अमेरिकन सरकारने हे सारे रुपये एकदा खर्च करून टाकले तर हे कर्ज नष्ट होईल. पण ते शक्य नाही; या कर्जावरचे व्याजही अमेरिकन सरकारच्या भारतातील सर्व व्यवहारास पुरेसे आहे. मग अमेरिकन सरकार तरी या सर्व रुपयांचे काय करील? अमेरिकन सरकार हे रुपये भारत सरकारास पुनः पुनः कर्जाऊ देईल आणि प्रत्येक वेळी ते कसे खर्च करावेत यासंबंधी भारतास तांत्रिक व आर्थिक सल्ला देईल. आपण यानंतर अमेरिकन माल मुळीच आणला नाही, [illegible] नाही, तरी १,००० कोटी रुप[illegible] यांचा हा वरवंटा भारताच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात अनंत वर्षे फिरत राहणार हे उघड आहे. या वरवंट्याखाली राष्ट्रीय चारित्र्य आणि स्वत्व यांचा चक्काचूर झाला नाही तरच नवल, परंतु हा सर्व व्यवहार भारत सरकारला इतर सर्व दृष्टींनी इतका सोईचा आणि गरजेचा झाला आहे की, या राष्ट्रीय आपत्तीकडे दुर्लक्ष करून भारत सरकार मुकाट्याने या सर्व व्यवहारास खुषीची संमती देते. किंबहुना हा व्यवहार सालोसाल असाच वृद्धिंगत होत राहावा म्हणून अमेरिकन सरकारची मनधरणी करते.

या व्यवहारात भारत सरकारची काय विशेष सोय होते ते नीट समजावून घेतले पाहिजे. म्हणजेच भारत सरकार या व्यवहाराला असे अव्याहत बारा वर्षे एवढे का लोभावले आहे ते लक्षात येईल. अमेरिकन गहू आणि इतर माल अमेरिकेतून निघाला म्हणजे त्या मालाची किंमत भारत सरकार स्वतःच्या तिजोरीतून रिझर्व्ह बँकेत अमेरिकन सरकारच्या खात्यात भरते हे सांगितलेच आहे. थोड्याच दिवसांत हा माल भारतात येतो आणि स्वस्त धान्याची दुकाने इत्यादी मार्गांनी बाजारात विकला जातो. भारत सरकारला त्याची पूर्ण किंमत मिळते आणि त्या मालाचे पोटी अमेरिकन सरकारच्या खात्यात पूर्वीच अगाऊ भरलेली आपली रक्कम भारत सरकार पूर्णपणे वसूल करून घेते. पर्यायाने असे मानण्यास हरकत नाही की, भारत सरकार अमेरिकन गहू आणि इतर माल आयात करते आणि तो बाजारात विकून विक्रीची रक्कम अमेरिकन सरकारच्या खात्यात जमा करते.

या व्यवहारात भारत सरकारला व्यापारी लाभ होत नाही. परंतु अमेरिकन सरकारच्या खात्यात भरलेली ही बहुतेक सर्व रक्कम वर वर्णन केल्याप्रमाणे भारत सरकारला वापरण्यास मिळते. त्यातील काही भाग देणगी म्हणून तर काही भाग कर्ज म्हणून मिळतो. या व्यवहारातील भारत सरकारने प्रथम अमेरिकन सरकारच्या खात्यात भरणा करण्याचा आणि त्या खात्यातून अमेरिकन सरकारने भारत सरकारास देणग्या व कर्जे देण्याचा तपशील बाजूस ठेवला, तर या सर्व व्यवहाराचे स्वरूप थोडक्यात असे होते की अमेरिकन सरकार भारत सरकारास गहू आणि इतर माल देते, भारत सरकार हा माल बाजारात विकते, आणि विक्रीचा पैसा स्वतःच्या खर्चाकरता वापरते. हे या व्यवहाराचे सत्य स्वरूप आहे. म्हणूनच मिंधेपणा, कर्जबारीपणा आणि स्वतःच्या घरात सावकाराची येजा पत्करूनही भारत सरकार या व्यवहारास चिकटून राहिले आहे.

ही कपोलकल्पित कथा नव्हे. अमेरिकन गहू आणि इतर माल सालोसाल देशात विकून उभा केलेला हा पैसा भारत सरकार दरसाल आपल्या वार्षिक अंदाजपत्रकात आणि जमाखर्चात जमेच्या बाजूस दाखवीत आहे. जेवढा जास्त माल आणावा, आणि जेवढी जास्त किंमत देऊन आणावा,

# धुळे जिल्हा सहकारी भू-विकास बँक मर्यादित, धुळे

दूरध्वनी : मुख्य कार्यालय : ८६
धुळे शाखा कार्यालय : ४८६

कृषि विकास भवन,
नवग्रही, धुळे

" सरकारने अधिक धान्य पिकवा " मोहिमेसाठी ठरवून दिलेली लक्ष्ये सतत ओलांडून
विकास कार्यांत उच्चांक गाठणारी बँक

## दिनांक ३१–५–६८ ( कर्जवाटप तपशील )

| तपशील | संख्या | रक्कम |
|---|---|---|
| ( १ ) नवीन विहीर | ९,२३९ | २,०५,२१,१५० |
| ( २ ) जुनी विहीर | ९७७ | १०,१०,३५० |
| ( ३ ) ऑईल एंजिन पंप | ५,७४० | ३,१३,७७,३०० |
| ( ४ ) इलेक्ट्रिक पंप | ८८१ | २४,८८,५०० |
| ( ५ ) ट्रॅक्टर्स | १३९ | २४,०५,८०० |
| ( ६ ) इतर | २,८३८ | ४३,५५,१५० |

## दि. ३१-५-६८ अखेर

| | | | |
|---|---|---|---|
| ( १ ) सभासद संख्या | २०,७८९ | ( २ ) भाग भांडवल | रु. ५८,०३,१९५ |
| ( ३ ) खेळते भांडवल | रु. ५,१३,६८,६४२ | ( ४ ) राखीव निधी | रु ३,१७,६९० |
| ( ५ ) सभासद कर्ज येणे | रु. ४,५८,८८,८०९ | ( ६ ) इमारत निधी | रु. २,७४,५६१ |

राजधर नवाजी पाटील, बी. कॉम., एलएल. बी.,
व्यवस्थापक.

गजमल तुळशीराम पाटील,
चेअरमन.

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

जैसा दीपें दीप लाविजे । तेथे आदील कोण हे नोळखिजे ।
तैसा सर्वस्वें जो मज भजे । तो मीचि होऊनि ठाके ॥ श्री ज्ञानेश्वरी

सन १९६७–६८ चे हंगामांत

## साखरेचे उत्पादन —१,३८,५८२ पोती साखर उतारा – ११·२९

## स्पिरिटचे उत्पादन – ३८,९४,६०३ लिटर्स

**साखरेचा नवीन हंगाम नोव्हेंबरमध्ये सुरू होईल.**

नवीन हंगामासाठी ऊसाचा पुरवठा भरपूर होण्याबद्दल जास्तीत जास्त प्रयत्न चालू आहेत. मद्यनिर्मिती योजनेबाबतची कार्यवाही चालू असून, त्यासाठी सायलेंट स्पिरिटच्या मशिनरीची ऑर्डर दिली आहे. इतर लागणाऱ्या मशिनरीची ऑर्डर देण्याची तजवीज चालू आहे.

**आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.**

गो. श्री. वाळिंबे, बी. कॉम.,
मॅनेजर.

शं. ल. लिमये, बी. एससी., एलएल. बी., वकील.
अध्यक्ष.

तेव्हा भारत सरकारला आवक पैसा उभा करता येतो. उदा. १९६४–६५ साली अशा तऱ्हेने अमेरिकन माल विकून भारत सरकारने २३० कोटी रुपये उभे केले होते. पुढील वर्षी, १९६५–६६ मध्ये दुष्काळामुळे जास्त गहू आयात केला आणि भारत सरकारला जास्त पैसे मिळाले. त्यावर्षी २५२ कोटी रुपये जमेस होते. त्याच्या पुढील वर्षी, १९६६–६७ साली माल जास्त मिळाला नाही परंतु रुपयाच्या अवमूलनामुळे त्याची रुपयात किंमत वाढली आणि भारत सरकारला आणखी जास्त पैसे मिळाले. त्या सालच्या दुरुस्त अंदाजपत्रकात ३२८ कोटी रुपये जमेस धरले होते. १९६७–६८ सालच्या अंदाजपत्रकात २९१ कोटी रुपये जमेस धरले आहेत. तात्पर्य, या सर्व व्यवहारामुळे भारत सरकारला सध्या दरसाल सुमारे ३०० कोटी रुपये अंदाजपत्रकात जमेस धरता येतात. केवळ स्वातंत्र्याकरता, स्वाभिमानाकरता हे सोडून देणे, नको म्हणणे, सरकारला सोपे राहिलेले नाही.

भारत सरकारच्या आर्थिक स्थैर्याकरता या रकमांचे महत्त्व जाणले पाहिजे. भारत सरकार आणि सर्व राज्य सरकारे यांचे जमाखर्च एकत्र केले तर चालू जमा आणि चालू खर्च यात १९६४–६५ साली १,४२२ कोटींची, १९६५–६६ साली १,८२६ कोटींची आणि १९६६–६७ साली २,२७७ कोटी रुपयांची तूट होती. १९६७–६८ साली तुटीचा अंदाज १,८२३ कोटी रुपये होता. ही तूट भरून काढून जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याचे दोनच मार्ग सरकारास उपलब्ध आहेत. देशात जनतेकडून एकतर कर्ज उभारणे; नाहीतर परदेशची मदत घेणे. बाजारातील कर्जे, अल्पबचत योजना, प्रॉव्हिडंट फंड, सक्तीच्या बचत योजना, इत्यादी सर्व जमेस धरून वरील तीन वर्षी अनुक्रमे ४६४ कोटी, ५०५ कोटी आणि ४३९ कोटी एवढ्याच रकमा भारत सरकार आणि राज्य सरकार या सर्वांस मिळून उभ्या करता आल्या. १९६७–६८ साली या रकमेचा अंदाज ४४३ कोटी रुपये होता. या रकमांशी तुलना केली म्हणजे अमेरिकन गहू आणि इतर माल बाजारात विकून याच तीन वर्षी उभ्या केलेल्या अनुक्रमे २३० कोटी, २५२ कोटी आणि ३२८ कोटी रुपयांचे आणि १९६७–६८ साली जमेस धरलेल्या २९१ कोटी रुपयांचे महत्त्व लक्षात येईल.

अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० अनुसार भारतात आयात होणारा अमेरिकन गहू आणि इतर शेतमाल यांचे भारत सरकारास असणारे हे महत्त्व लक्षात घेतले म्हणजे पुष्कळ अवघड प्रश्नांची उत्तरे मिळतात. सन १९६५–६६ आणि १९६६–६७ ही दोन वर्षे अवर्षणाची गेली म्हणून त्यावर्षी अमेरिकन गहू आयात करावा लागला, असे म्हणतात. परंतु १९६४–६५ साली पीक उत्तम होते. त्यावर्षीही पिकाचे मानाने आयात कमी झाली नाही. १९६७–६८ साली तर धान्य उत्पादनाने उच्चांक गाठला. गव्हात अपूर्व क्रांती झाली. ती जगजाहीर करण्याकरता आपण [illegible] केली. पण गव्हाची आयात चालूच आहे. कारण उघड आहे. देशात धान्याचे उत्पादन जास्त झाले तर ज्याच्या शेतात जास्त पिकेल त्या शेतकऱ्याचा फायदा होईल. भारत सरकारला त्याचा काय फायदा? सरकारला आपल्या जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्याकरता त्याचा काय उपयोग? सरकारच्या जमाखर्चाच्या तोंडमिळवणीकरता उपयोगी यावयाचे असेल तर धान्य देशात जास्त पिकून भागत नाही. ते अमेरिकेत पिकून अमेरिकन सार्वजनिक कायदा ४८० खाली आयात करावे लागते. म्हणून भारत सरकार ते आयात करते. या कायद्यान्वये होणारी धान्याची व इतर शेतमालाची आयात ही भारताला आर्थिक मदत नसून भारत सरकारला मदत आहे हे लक्षात घेतले पाहिजे. भारतीय जनतेने भारत सरकारला सरकारी खर्चाला पुरेसे कर दिले नाहीत, कर्जे दिली नाहीत, तरी भारत सरकारचे नडू नये, भारत सरकारचे भारतीय जनतेवरील अवलंबन कमी व्हावे म्हणून भारत सरकारला ही मदत मिळत आहे. ही मिळणारी मदत अगदी क्षुल्लक नाही. १९६४–६५, १९६५–६६ आणि १९६६–६७ ही तीन वर्षे भारतातील केन्द्र आणि राज्य सरकारांचा एकूण वार्षिक महसूल लक्षात घेतला तरी त्या मानाने भारत सरकारने अमेरिकन माल बाजारात विकून उभ्या केलेल्या या रकमांचे प्रमाण दहा टक्के बसते. उत्पन्नाची ही एवढी मोठी बाब सोडून देणे, नको म्हणणे, सरकारला कसे शक्य होईल?

म्हणून आपले अन्नधान्याचे उत्पादन दोन–तीन वर्षांत वाढेल आणि तीन वर्षांत आपण अन्नधान्याची आयात पूर्णपणे बंद करू असे सरकार म्हणते ते शक्य वाटत नाही. देशात धान्याचे उत्पादन कितीही वाढले तरी जोवर देशातील धान्याचे भाव अमेरिकन धान्याच्या भावाच्या फार खाली जात नाहीत, जोवर अमेरिकन धान्य आयात करून विशेष नुकसान न सोसता बाजारात विकून त्याचे रुपये सरकारी खर्चास घेणे शक्य आहे तोवर ही आयात बंद करणे सरकारला अवघड आहे. अन्नधान्याचे उत्पादन वाढेल तसा अन्नधान्याचा वापरही वाढेल हे लक्षात ठेवले पाहिजे. वाढत्या लोकसंख्येला अधिक अन्न लागेल. तिला पुरेसे धान्य पिकले तर जादा धान्य कोंबड्यांना, शेळ्यामेंढ्यांना, डुकरांना, गाई-बैलांना घालण्यास सुरवात होईल आणि आहारात दुधदुभते, अंडी आणि मांसाचा समावेश होईल. या कारणांनी आपल्या धान्याच्या किंमती अमेरिकन धान्याच्या किमतींच्या फार खाली येण्याचा नजीकच्या भविष्य काळात संभव नाही. तोवर सध्याच्या पद्धतीने होणारी धान्याची आयात थांबवणे सरकारी दृष्टीने व्यवहार्य होणार नाही.

शिवाय आपल्या धान्याच्या किमती फार घसरल्या आणि त्यामुळे अमेरिकेतून धान्य आयात करणे अवघड झाले पण याच पद्धतीने दुसऱ्या काही वस्तू मिळत असल्या तर भारत सरकार त्या आयात करू लागेल. अमेरिकन सरकारने भारत सरकारला

मदत करण्याचेच ठरवले तर अमेरिकेजवळ देण्याजोग्या कितीतरी गोष्टी आहेत. कापूस आहे, सोयाबीन तेल आहे, दुधाची भुकटी आहे. शिवाय अशी मदत केवळ धान्य व इतर शेतमाल यापुरतीच मर्यादित ठेवण्याचे कारण नाही. आर्थिक विकासाकरता शिक्षणाचे महत्त्व किती आहे हे सांगण्याची आवश्यकता नाही. त्याकरता स्वस्त पाठ्यपुस्तकांची गरज आहे. अमेरिकन सरकार सर्व विषयांची, सर्व वर्गांची, पाठ्यपुस्तके तयार करवून, छापून हव्या तेवढ्या संख्येने भारत सरकारास देऊ शकेल आणि भारत सरकार ती बाजारात विकून हवे तेवढे रुपये स्वतःच्या खर्चाकरता उभे करू शकेल. कारण, कोणतीच देशी पुस्तके अनेक वर्षे या पुस्तकांच्या गुणवत्तेत, छपाईत आणि किंमतीत बरोबरी करू शकणार नाहीत. पाठ्य पुस्तकाप्रमाणेच ट्रान्झिस्टर, रेडिओ, टेलिव्हिजन सेट, कुटुंबनियोजनाची नवी उपकरणे आणि शेवटी अमेरिकन विमानाने अमेरिकेत तीन महिने, सहा महिने किंवा नऊ महिने हिंडून येण्याकरता प्रवासी तिकिटे अशा अनेक गोष्टी अमेरिकन सरकार भारत सरकारास देऊ शकेल की ज्या विकून भारत सरकारच्या प्रपंचास मदत होईल.

अमेरिकेने आपले सार्वजनिक कायदे ६६५ आणि ४८० यांच्याखाली अशा तऱ्हेची मदत जगातील अनेक देशांच्या सरकारांना आजपावेतो केली आहे. उदाहरणार्थ, दक्षिण व्हीएटनाममध्ये १९६० साली सरकारी वार्षिक महसुलाच्या जवळजवळ दोन तृतीयांश भाग तेथील सरकार अमेरिकन माल बाजारात विकून मिळवीत असे. आज बहुधा तेथील सरकारचे उत्पादन शंभर टक्के अमेरिकन माल बाजारात विकून निघत असेल असे वाटते. सरकारच्या दृष्टीने केवढी ही सोय! जनतेवर कर बसवायला नकोत, ते वसूल करायला नकोत; जनतेकडून कर्जे काढायला नकोत, ती परत फेडायला नकोत. अमेरिकेतून माल आणावा, बाजारात विकावा आणि सरकारी खर्च चालवावा. स्वतंत्र जनता आणि परतंत्र सरकार, असा हा पारतंत्र्याचा नवा आविष्कार आहे.

(प्रथम प्रकाशितः "माणूस")


आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक, ठेवीदार व सभासद यांना दिवाळी व नूतन वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो!

# दि विटा मर्चन्टस्

## को-ऑप. बँक लि., विटा

जिल्हा–सांगली

ग्रामीण भागात एका शाखेनिशी बँकिंगचा सर्व व्यवहार करीत असलेली आणि विटे नगरीच्या आर्थिक विकासासाठी झटणारी एकमेव संस्था.

प्रगती -

| | |
|---|---|
| १) वसूल भाग भांडवल | रु. १,२६,२५० |
| २) रिझर्व फंडस् व इतर फंडस् | रु. २,६३,००० |
| ३) ठेवी | रु. ३१,२२,००० |
| ४) कर्जे | रु. २१,११,००० |
| ५) खेळते भांडवल | रु. ३७,३४,००० |

म. ना. भंडारे, चेअरमन — स. वि. कोरे, प्रेसिडेंट

व. का. बोबडे, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., मॅनेजर



## दीपावली अभीष्ट चिंतन

आमचे असंख्य सभासद, ठेवीदार व हितचिंतकांना ही दीपावली व नूतन वर्ष आनंदाचे जावो!

# श्री महालक्ष्मी को-ऑप. बँक लि., कोल्हापूर

मुख्य कार्यालय: १६७ बी मंगळवार पेठ, कोल्हापूर

स्थापना सन १९३३ — दूरध्वनी मुख्य कचेरी: २३७

शाखा: (१) उद्यमनगर ७०४, (२) श्री शाहूमार्केट यार्ड.

कोल्हापूर शहरातील अग्रेसर नागरी सहकारी बँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | १,९७,३१० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. | ५,२६,४१६ |
| ठेवी | रु. | ८१,०९,३५२ |
| खेळते भांडवल | रु. | १,०२,५५,१३१ |

द. रा. उमराणीकर, उपाध्यक्ष — व. व्य. किंकर, अध्यक्ष

गो. का. पेंडसे व्यवस्थापक



दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# सहकारी बँकांच्या काही समस्या

## नागरी सहकारी बँकांच्या विनतारणी कर्जावर आणि सल्लागार मंडळांवर रिझर्व्ह बँकेचा आक्षेप

लेखक : श्री. द. दि. चितळे, पुणे.

सर्वसामान्य लोकांकडे पडून असलेला किंवा त्यांना स्वतःच्या तात्कालिक उपयोगासाठी जरूर नसलेला पैसा त्यांच्याकडून ठेव म्हणून स्वीकारून त्या ठेवींच्याद्वारे जमविलेला पैसा गरजू लोकांना किंवा सरकाराला अथवा तत्सम इतर संस्थांना कर्जाऊ देणे हा एक विशेष प्रकारचा व्यवसाय असून त्यास इंग्रजी भाषेत "बँकिंग" म्हणतात व मराठी भाषेतही आपण सामान्यतः तोच शब्द अलीकडे वापरीत असतो. हा व्यवसाय सावकारी व्यवसायापेक्षा अगदी भिन्न आहे हे कोणासही सहजी कळेल. सावकारी व्यवसायात सावकार आपल्या स्वतःच्या मालकीच्या पैशातून कुळांना पैसे कर्जाऊ देत असतो तर बँकिंगच्या व्यवसायात इतर लोकांकडून ठेवींच्या द्वारे जमविलेल्या पैशातून बँक गरजू इसमांना पैसे कर्जाऊ देत असते. सावकारीचा धंदा आपल्या देशात गेली अनेक शतके चालू आहे. परंतु बँकिंगचा व्यवसाय हा आपल्याकडे त्या मानाने अलीकडील आहे.

### जॉइंट स्टॉक बँका

अनेक इसम एकत्र येऊन भागांच्या द्वारे जरूर ते भांडवल जमवून आपले संघ स्थापन करतात व हे संघ अनेक प्रकारचे उद्योगधंदे, व्यापार उदीम, बँकिंग, विमा, वगैरे व्यवसाय चालवितात. हे संघ सामान्यतः कंपनी कायद्याखाली नोंदविले जात असल्याने त्या "कंपन्या" होत, व त्यांचा कारभार कंपन्यांच्या कायद्याप्रमाणे चालतो. बँकिंग, विमा, या विशेष प्रकारच्या व्यवसायासाठी काही पुरवणी कायदे केलेले असल्याने या विशेष प्रकारचे व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांना तेही कायदे पाळावे लागतात. सबब जॉइंट स्टॉक बँकांचा कारभार कंपन्यांचा कायदा व बँकिंग कंपन्यांचा कायदा या दोन्ही कायद्यांना धरून चालत असतो. बँकिंग कंपन्यांच्या कायद्यात अलीकडे काही दुरुस्त्या केल्या असून आता त्या कायद्याचे नाव "बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट" असे झाले आहे.

### सहकारी बँका

सहकारी सोसायट्यांच्या कायद्याखाली नोंदविलेल्या संस्थांना वर उल्लेख केलेले सर्व प्रकारचे व्यवसाय करता येतात; त्यांना बँकिंगचाही व्यवसाय करता येतो. सहकारी सोसायट्यांचा कायदा हा मुख्यतः खेड्यापाड्यात राहणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीसाठी लागणारे जरूर ते भांडवल सहजी मिळावे या हेतूने केलेला असला तरी लहान-मोठ्या शहरात राहणारे कारागीर, कामकरी, नोकर, लहान लहान दुकानदार, व्यापारी, वगैरे यांनाही या कायद्याचा फायदा घेता येतो. बहुसंख्य सहकारी संस्था या शेतकऱ्यांच्या पतपेढ्या असून शहरात अगर नगरात राहणाऱ्या कारागीर, नोकर वगैरे लोकांच्या पतपेढ्या, सोसायट्या अगर बँका या अल्पसंख्याक आहेत. या सर्व संस्थांचा कारभार सहकारी सोसायट्यांच्या कायद्याप्रमाणे चालत असतो.

सहकारी बँकांचे तीन विभाग पाडण्यात येत असून ते पुढील प्रमाणे आहेत :—(१) राज्य सहकारी बँका, (२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, आणि (३) नागरी सहकारी सोसायट्या किंवा बँका. यापैकी तिसऱ्या विभागात येणाऱ्या संस्थांपुढे निर्माण झालेल्या अनेक समस्यांपैकी दोन समस्यांचा परामर्ष या लहानशा लेखात घेण्याचे आम्ही योजले आहे.

### बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट

सन १९४८ च्या सुमारास असे दिसून आले की काही जॉइंट स्टॉक बँकांचा कारभार ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीने जितका काळजीपूर्वक व योग्य प्रकारे चालावयास पाहिजे तसा तो चालत नाही. सबब जॉइंट स्टॉक बँकांसाठी बँकिंग कंपनीज ॲक्ट, १९४९, हा पुरवणी कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्यान्वये त्या बँकांची तपासणी करण्याचा, त्यांचेवर नियंत्रण ठेवण्याचा व देखरेख करण्याचा, त्यांचे मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने त्यांना जरूर ते हुकूम करण्याचा, वगैरे अधिकार रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया या बँकेस देण्यात आले. हा कायदा सहकारी बँकांनाही लागू करावा किंवा कसे याचा त्यावेळी विचार करण्यात आला. परंतु सहकारी बँकांचा त्यावेळेचा एकूण व्यवहार जॉइंट स्टॉक बँकांच्या एकूण व्यवहाराच्या मानाने विचारात न घेण्याइतका किरकोळ असल्याचे दिसून आल्यावरून तो कायदा सहकारी बँकांना लागू करू नये असे त्यावेळी ठरले. पुढे दहा-बारा वर्षानंतर मात्र त्यांच्या एकूण व्यवहाराबाबतची ही परिस्थिती पुष्कळच बदलली. शिवाय जॉइंट स्टॉक बँकांना डिपॉझिट इन्शुअरन्सची जी योजना लागू करण्यात आली ती सहकारी बँकांनाही लागू करावी, अशी एक सूचना विचारासाठी पुढे आली. या सर्व बाबींचा विचार करताना जॉइंट स्टॉक बँकांप्रमाणेच सहकारी बँकांची तपासणी करणे, त्यांचेवर नियंत्रण ठेवणे व देखरेख करणे, त्यांचे मार्गदर्शन करण्याच्या दृष्टीने त्यांना जरूर ते हुकूम करणे, वगैरे सर्व अधिकार रिझर्व्ह बँकेस देणे जरूर आहे असे दिसून आले. त्यासाठी बँकिंग कंपनीज् ॲक्टात बऱ्याच दुरुस्त्या करण्यात येऊन हा दुरुस्त झालेला कायदा जॉइंट स्टॉक बँका व सहकारी बँका या दोघांनाही लागू करण्याचे ठरले. या दुरुस्त झालेल्या कायद्याचे नाव बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट असे झाले असून तो सहकारी बँकांना दिनांक १ मार्च, १९६६ पासून लागू करण्यात

# दि धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., धुळे

स्थापना : १३-९-१९५७

मुख्य कचेरी :-गरुड बाग, धुळे (पोस्ट बॉक्स नं. ३)

चेअरमन—श्री. पु. का. पाटील, बी. कॉम., एलएल. बी. व्हा. चेअरमन--श्री. य. शं. पाटील

ह्या बँकेत ठेवलेला पैसा शेतकऱ्यांच्या व औद्योगिक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी वापरला जातो.

बँक अल्प मुदतीच्या ठेवी आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारते.

वाढत्या प्रमाणात ठेवी ठेवून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना साहाय्य करण्यास आम्हांला मदत करा.

ता. ३०-६-१९६८

| | |
|---|---|
| (१) अधिकृत भांडवल ... ... ... | १ कोटी, ५० लाख |
| (२) भरपाई झालेले भाग भांडवल ... ... | ८५ लाख |
| (३) ठेवी ... ... ... | ३ कोटी, ६३ लाख |
| (४) कर्जे ... ... ... | ४ कोटी, ८५ लाख |
| (५) खेळते भांडवल ... ... ... | ७ कोटी, १९ लाख |

जिल्ह्यात ह्या बँकेची मुख्य कचेरी व ३४ शाखा अविरत कार्य करीत आहेत.

एस्. एस्. कुलकर्णी,
ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी

जी. क्यू. शेख
मॅनेजर

ही दीपावली आमच्या सर्व सभासदांस, ठेवीदारांस व ग्राहकांस आनंदाची, सुखाची व भरभराटीची जावो हीच शुभेच्छा.

शेतकऱ्यांच्या गरजा भागवून देशाच्या आर्थिक प्रगतीस व विकास कार्यास मदत करीत असलेली व ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव जागरूक असलेली

# नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नासिक

दूरध्वनी क्र. २५११ ] केन्द्र कार्यालय, नासिक [ पत्रपेटी क्र. १९

१२५१ दामोदर रोड, नासिक

## शाखा ४४

**बँकेची सांपत्तिक स्थिती**

| | | |
|---|---|---|
| १] भरपाई झालेले भाग भांडवल | रु. | १०८ लाख |
| २] ठेवी | रु. | ५६३ लाख |
| ३] दिलेली कर्जे | रु. | ७१९ लाख |
| ४] खेळते भांडवल | रु. | १०१२ लाख |

**व्याजाचे आकर्षक दर**

| | | |
|---|---|---|
| १] सेव्हिंग्ज | द. सा. द. शे. | ३½ टक्के |
| २] मुदतीच्या ठेवी | ,, | ४ ते ६½ टक्के |

तु. मो. सोनवणे
मॅनेजर

मा. त्र्यं. पाटील
व्हा. चेअरमन

द. म. बिडकर
चेअरमन

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, नासिक.

आला आहे. म्हणजे १ मार्च, १९६६ पासून सहकारी बँकांचा कारभार, सहकारी सोसायट्यांचा कायदा व बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट या दोन्ही कायद्यांन्वये चालत असतो.

### कामकाजातील दोष

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट सहकारी बँकांना लागू झाल्यानंतर पुढे लवकरच नागरी सहकारी बँकांची पहिली तपासणी रिझर्व्ह बँकेच्या तपासनिसांनी केली किंवा त्या बँकेच्या हुकुमावरून मुंबई राज्य सहकारी बँकेच्या तपासनिसानी केली. या तपासणी बाबतचे अहवाल आता ज्या त्या बँकेकडे अधिक खुलाशासाठी किंवा अम्मलबजावणीसाठी गेलेले आहेत. या अहवालावरून असे दिसते की तपासनिसांच्या दृष्टीने सहकारी बँकांच्या कारभारात किंवा कामकाजात मुख्यतः पुढील दोष आढळून येतात :—

(१) या बँकांनी फार मोठ्या प्रमाणात बिनतारणी कर्जे दिलेली आहेत. सबब यापुढे त्यांनी निश्चित व दृश्य तारणावर कर्जे द्यावीत.

(२) बऱ्याच बँकांच्या पोट नियमात सल्लागार मंडळे नेमण्याची तरतूद दिसते. परंतु अशी तरतूद सहकारी सोसायट्यांच्या कायद्याचे कलम नंबर ७३ अन्वये करता येणार नाही. सबब अशी मंडळे सहकारी संस्थांनी नेमू नयेत, व पोट नियमातील ही तरतूद रद्द करावी.

वर दाखविलेले दोष किंवा तपासनिसांनी घेतलेल्या हरकती या बरोबर आहेत किंवा कसे, तसेच त्यांना दिसून आलेले दोष दूर करण्यासाठी त्यांनी सुचविलेले उपाय अमलात आणल्यास त्यामुळे काही नवीन अडचणी उत्पन्न होतील किंवा कसे, याचा सहकारी तज्ज्ञांना व सहकारी कार्यकर्त्यांना अधिक विचार करावा लागेल, असे वाटते.

रिझर्व्ह बँकेच्या नियमाप्रमाणे जामिनांच्या हमीवर दिलेली कर्जे ही बिनतारणी कर्जे होत.

या विषयास केवळ चालना मिळावी या हेतूने याबाबतचे आमचे काही विचार आम्ही पुढे देत आहों.

### अहमदनगरची परिषद व दिलेली आश्वासने

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट मंजूर होण्यापूर्वी महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांची एक परिषद अहमदनगर येथे भरली होती. त्या परिषदेचे अध्यक्ष श्री. ध. रा. गाडगीळ हे होते व श्री. भट्टाचार्य, त्यावेळेचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, हेही त्या परिषदेस हजर होते. त्या परिषदेत बँकिंग रेग्युलेशन ॲक्टाच्या मसुद्यावर पुष्कळच चर्चा झाली. त्या वेळी झालेल्या चर्चेत हे स्पष्ट करण्यात आले होते की सहकारी संस्थांचा मुख्य उद्देश असा आहे की आर्थिक दृष्टीने निर्बल असणाऱ्या परंतु सद्वर्तनी, विश्वासू व उद्योगशील असणाऱ्या पतवान सभासदांना केवळ त्यांच्या पतीवर व ते देत असलेल्या त्यांच्या पतवान जामिनांचे लेखी हमीवर त्यांना योग्य त्या व्याजाने जरूर ते भांडवल पुरवून वेगवेगळे उद्योगधंदे वगैरे करण्यास त्यांना प्रोत्साहन द्यावे आणि त्यांची सांपत्तिक परिस्थिती हळूहळू सुधारून ते शक्य तितक्या लवकर आर्थिक दृष्टीने सबळ होतील असा प्रयत्न या संस्थांनी करावा. सबब या संस्था हल्ली ज्या पद्धतीने व धोरणाने आपल्या सभासदांना कर्जे पुरवीत आहेत व आपले काम चालवीत आहेत त्यात, त्यांना बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट लागू केला तरी काहीही फेरफार करावा लागणार नाही इकडे रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनी लक्ष पुरवावे. त्यावर उत्तर देताना श्री. भट्टाचार्य यांनी असे आश्वासन दिले की, या कायद्याची बजावणी करताना सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार यांचे साहाय्य घेतले जाईल व त्यांच्याशी पूर्वीप्रमाणेच निकटचे संबंध रिझर्व्ह बँक ठेवील.

वर दिलेली परिस्थिती लक्षांत घेता सहकारी बँकांनी दिलेली बिन-तारणी कर्जे जास्त आहेत व म्हणून तो त्यांच्या कामकाजातील एक मोठा दोष आहे असे म्हणणे बरोबर होईल असे आम्हास वाटत नाहीं. सहकारी सोसायट्यांचे बहुसंख्य सभासद आर्थिक दृष्टीने निर्बल असल्याने त्यांचे जवळ कर्जासाठी देता येण्यासारखे निश्चित व दृश्य स्वरूपाचे तारण फारसे नसते-नव्हे, बहुतकरून ते नसतेच. परंतु सभासद विश्वासू, उद्योगी व सद्वर्तनी, म्हणून पतवान असल्याने केवळ त्यांच्या पतीवर आणि ते देत असलेल्या पतवान जामिनांचे लेखी हमीवर त्यांना कर्ज देणे प्राप्त होते. अशीच कर्जे बहुसंख्य असल्याने सहकारी बँकांनी दिलेली बिनतारणी कर्जे फार मोठ्या प्रमाणात असणार हे उघड आहे, व अशा परिस्थितीत त्यांच्या कामकाजातील हा एक मोठा दोष आहे असे मानण्याचे कारण नाही.

रिझर्व्ह बँकेकडून या बँकांची झालेली ही पहिलीच तपासणी आहे. या पूर्वी या तपासणी अम्मलदारांना फक्त जॉइंट स्टॉक बँकांचीच तपासणी करावी लागत असे. जॉइंट स्टॉक बँकांचे बाबतीत त्या बँकांनी दिलेल्या कर्जाच्या एकूण रकमेपैकी बिनतारणी दिलेल्या कर्जाची रकम शेकडा पंधरा टक्क्यापेक्षा जास्त असू नये असा सल्ला त्या बँकांना रिझर्व्ह बँकेनें दिलेला असावा असे वाटते, आणि त्याच दृष्टिकोनातून सहकारी बँकांच्या व्यवहाराकडे तपासनिसांनी पाहिल्यास सहकारी बँकांनी दिलेली बिनतारणी कर्जे वाजवीपेक्षा फाजील आहेत असा त्यांचा शेरा निघणे अगदी स्वाभाविक आहे. सबब आमची अशी सूचना आहे की, ज्या बँकांचे बाबतीत हा दोष म्हणून तपासणी यादीत नमूद केलेला असेल त्या बँकांच्या अम्मलदारांनी ही बाब तातडतोब सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार यांचे नजरेस आणावी, आणि त्यांना अशी विनंती करावी की त्यांनी रिझर्व्ह बँकेकडे याबाबत जरूर तो पत्रव्यवहार करून सहकारी बँकांच्या बाबतीत तपासनिसांचा हा दृष्टिकोण बदलण्यास रिझर्व्ह बँकेने




विविध प्रकारच्या कापडाच्या 'क्वालिटी' व 'गॅरेंटी' मुळे,
सर्व ग्राहकांच्या विश्वासास पात्र झालेले पुण्यातील अग्रेसर कापडदुकान

# ब्यूटी क्लॉथ स्टोअर्स

'होम ऑफ क्वालिटी ॲण्ड व्हरायटी'

पेरुगेट रोड, पुणे २. (फोन नं. ५७३१८)

त्यांना शक्य तितक्या लवकर कळवावे. जर याबाबत जरूर ती तजवीज तावडतोब केली गेली नाही तर आपल्या सूचनेकडे संबंधित बँकेने मुद्दाम दुर्लक्ष केले आहे असा रिझर्व्ह बँकेचा विनाकारण गैरसमज होण्याचा संभव आहे, आणि या गैरसमजामुळे त्या बँकेस लायसेन्स देण्याचे नाकारून त्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने संबंधित बँकेस एकदा लेखी कळविले म्हणजे मग त्या बँकेची परिस्थिती अत्यंत अनुकंपनीय होईल व कदाचित बँकिंगचा व्यवसायच बंद करण्याची तिचेवर पाळी येईल, अशी साधार भीती वाटते.

## सल्लागार मंडळावर गंडांतर

काही सहकारी बँकांच्या बाबतीत तपासणी अम्मलदारांनी दाखविलेला त्यांचा दुसरा दोष म्हणजे सल्लागार मंडळाची नेमणूक करण्याची व त्या मंडळास अपिले ऐकण्यासारखे काही अधिकार देण्याबाबतची त्यांच्या पोट-नियमात असलेली तरतूद हा होय.

तपासणी अम्मलदारांच्या दृष्टीने, प्रत्येक सहकारी संस्थेने फक्त एकच कार्यकारी कमिटी सहकारी सोसायट्यांच्या कायद्याचे कलम ७२ अन्वये नेमली पाहिजे. या कमिटीशिवाय अन्य कोणतीही समिती अगर मंडळ, मग ते अपिले ऐकणारे असो किंवा देखरेख करणारे असो, ज्याला संस्थेच्या कारभारासंबंधी काही सूचना अगर हुकूम करता येतील असे मंडळ अगर समिती सहकारी संस्थेस नेमता येणार नाही. सबब संस्थेने असे मंडळ नेमता कामा नये. हा कायद्याचा अर्थ लावण्याचा प्रश्न असल्याने त्यात मतभिन्नता होण्याची पुष्कळच शक्यता आहे. कलम नं. ७२ यात "कायदा व कानू" असा उल्लेख आहे. यावरून पोट नियमात "सल्लागार मंडळ", "देखरेख मंडळ", "नियंत्रण मंडळ", वगैरे नेमण्याची व त्या मंडळाला काही अधिकार देण्याची तरतूद केलेली असेल तर अशी अन्य मंडळे नेमण्यात चूक होत आहे असे म्हणता येणार नाही. ते काहीही असो; परंतु सल्लागार मंडळाबाबतचा इतिहास येथे थोडक्यात दिल्यास ते अस्थानी होईल असे वाटत नाही.

सहकारी संस्थांची सल्लागार मंडळे असावीत ही कल्पना पुण्यातील कॉसमॉस बँकेच्या कारभारावरून प्रथम निघाली असावी असे दिसते. सन १९१४ चे सुमारास ह्या बँकेची परिस्थिति इतकी खालावली होती की त्या वेळी ही बँक लिक्विडेशनमध्ये काढली जाईल किंवा काय अशी भीती निर्माण झाली होती. परंतु त्या वेळी या बँकेच्या पोट नियमात तशी तरतूद नसताही कै. नरसिंह चिंतामण केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या सल्लागार मंडळाची देखरेख, मार्गदर्शन व सल्ला वेळोवेळी मिळाल्यामुळे हा प्रसंग टळला व पुढे ही बँक लवकरच नावारूपास आली. यावरून सल्लागार मंडळाचा फार मोठा उपयोग होतो असे दिसून येते. कॉसमॉस बँकेच्या सुवर्ण महोत्सव अंकातील पान नं. १३ वर असलेला काही भाग पुढीलप्रमाणे आहे :-

"मॅनेजिंग कमिटीच्या हातून चुका होण्याचा संभव आहे. म्हणून त्यांच्या कामावर देखरेख करून त्यांना सल्ला देऊन मार्गदर्शन करण्यासाठी एक सल्लागार मंडळ १९१४ साली नेमण्यात आले. १९१४ ते १९१७ पर्यंत, रजिस्ट्रारकडून पोट नियम मंजूर होऊन न आल्यामुळे, या सल्लागार मंडळाला अधिकृत आधार नव्हता; पण १९१५ साली मुंबई इलाखा परिषदेत श्री. केळकर यांनी सहकारी संस्थांच्या कारभाराबाबत एक निबंध वाचून दाखविला आणि त्यात कॉसमॉसच्या सल्लागार मंडळाची कल्पना विशद केली. ती कल्पना पसंत पडून सहकारी खात्याने अशा तऱ्हेचे सल्लागार मंडळ नेमण्याबद्दल इतर पतपेढ्यांस शिफारस केली."

ज्या खात्यास १९१४ साली सल्लागार मंडळाची योजना पसंत पडली त्याच खात्याने १९६८ साली ही मंडळे बरखास्त करावीत म्हणून आग्रह धरावा, हा दैवदुर्विलास नाही काय? सन १९६० च्या कायद्याने अशी मंडळे नेमता येणार नाहीत असे वादासाठी मान्य केले तरी त्यासाठी कायद्यात दुरुस्ती करण्याऐवजी ही मंडळेच नष्ट करावीत हा कोठला न्याय? तपासणी अम्मलदारांनी दाखविलेला हा दोष बरोबर असला तरी देखील त्यांनी व सहकारी खात्याने त्यावर सुचविलेला इलाज हा मात्र योग्य आहे असे आम्हांस मुळीच वाटत नाही. सबब याबाबत सहकारी तज्ज्ञांनी व सहकारी कार्यकर्त्यांनी अधिक विचार करून सहकारी खात्यास योग्य तो सल्ला द्यावा अशी आमची त्यांना मित्रत्वाची सूचना आहे.

## मध्यवर्ती बँका आणि सुंदोपसुंदी

हा लेख थोडा लांबला असल्याने त्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या समस्यांसंबंधी आम्ही आमचे विचार मांडले नाहीत. तथापि एका बाबीचा येथे वेळीच उल्लेख करणे आम्हांस जरूर वाटते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या संचालकांच्या निवडणुकीची धामधूम व धावपळ लक्षात घेता या निवडणुकीसाठी होणारा खर्च विधिमंडळाच्या सभासदांच्या निवडणुकीचे खर्चापेक्षा जास्त होत असावा असे वाटते. वेगवेगळ्या व्यक्तींनी केलेला हा भरमसाठ खर्च ते पुढे कसा भरून काढीत असतील हा एक मोठा बिकट प्रश्नच आहे.

मध्यवर्ती सहकारी बँकांत हल्ली पुष्कळच राजकारण व गटबाजी घुसल्यासारखी दिसते. कित्येक ठिकाणी संचालकांची भांडणे व सुंदोपसुंदी चालल्याचेही ऐकिवात येते. या सर्वांचा अनिष्ट परिणाम या बँकांच्या कारभारावर होतो किंवा काय याचा सरकारने व प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांनी सत्वर विचार करावयास नको काय? आम्हांस हल्लीची परिस्थिती फारच गंभीर दिसते व म्हणून आम्ही हा प्रश्न संबंधितांपुढे वेळीच व मुद्दाम या लेखाचे द्वारे मांडीत आहो.

---

# रत्नागिरी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

दूरध्वनी क्र. ९१ ] स्थापना : १३–७–१९१४ [ तार : अर्बन बँक

शाखा संख्या ६

## रत्नागिरी जिल्ह्यांतील प्रमुख नागरी सहकारी बँक

| | | |
|---|---|---|
| खेळते भांडवल | ::: | रु. ५५ लक्ष |
| ठेवी ::: | ::: | रु. ४५ लक्ष |
| ऑडीट वर्ग | ::: | 'अ' |

★ मुदतीच्या, बचत, स्वल्प बचत, संचयी, चालू ठेवी आकर्षक व्याजाने स्वीकारल्या जातात.
★ सभासदांना तारण वस्तूवर व पतीवर माफक व्याजाचे दराने कर्जे दिली जातात.
★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

माहितीकरता समक्ष भेटा अगर पत्रद्वारे चौकशी करा—

वि. वि. भाटवडेकर
मॅनेजर

आमच्या दिवाळीनिमित्त शुभेच्छा

जगातील हुकुमशहांची भारतातील लोकशाहीवर वक्रदृष्टी होऊ नये याकरिता भारतीय लोकशाही मजबूत, कणखर नि अभेद्य राखण्यासाठी राष्ट्रातील कृषिउत्पादन जास्तीत जास्त वाढले पाहिजे, यावर अढळ श्रद्धा बाळगणाऱ्या शेतकऱ्यांनी सहकारी तत्त्वावर एकत्रित येऊन उभारलेल्या शेतकऱ्यांच्या मालकीचा नि शेतकऱ्यांनी चालविलेला भारतातील पहिला साखर कारखाना

# दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. माळीनगर

तारेचा पत्ता :— "माळीशुगर" माळीनगर टेलि. नं. २१

स्थापना : सन १९३२

रजिस्टर्ड ऑफिस : माळीनगर, जि. सोलापूर

मुंबई ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १

व्हा. चेअरमन : श्री. चंद्रकांत शंकरराव कुदळे, बी. एससी. (ॲग्रि.)

चेअरमन : श्री. पंढरीनाथ हणमंत गिरमे.

संचालक मंडळ

हरिभाऊ बळवंतराव गिरमे,
शंकरराव भाऊराव राऊत,
जगन्नाथ गणपतराव रासकर,
भगवंतराव गेनूजी गिरमे,
कृष्णाजी लक्ष्मणराव गिरमे,
शंकरराव मारुतिराव गिरमे,
विजय नारायणराव बोरावके,

फॅक्टरी मॅनेजर : श्री. के. एन्. पाटील, बी. ए., बी. एससी., बी. कॉम., एल्एल्. बी.,

# सहकारी संस्थांतील व्यवस्थापकांचे हात बळकट होणार !

## 'मॅनेजमेंट केडर'च्या योजनेचा उद्देश आणि अडचणी

लेखक : श्री. के. के. तैमनी

राज्य सरकारांनी किंवा फेडरल संघटनांनी सहकारी संस्थांतील व्यवस्थापकीय महत्त्वाच्या जागांवरील नेमणुकांसाठी अधिकाऱ्यांची एक एकत्र श्रेणी निर्माण करण्याचा प्रयत्न करावा, असे मद्रास येथील मुख्यमंत्र्यांच्या परिषदेने ठरविले, ही सहकारी चळवळीच्या प्रगतीच्या दृष्टीने एक चांगली घटना झाली. अल्प आणि मध्यम मुदतीचे सहकारी बँकिंग, जमीन सुधारणा बँका, मार्केटिंग आणि ग्राहकांच्या सोसायट्या, ह्या सहकारी चळवळीतील चार महत्त्वाच्या संस्थांना ह्या निर्णय लागू होईल. हीच सूचना काही वर्षांपूर्वी नियोजन मंडळाने फेटाळून लावली होती!

सहकारी चळवळीचा व्याप मुख्यत: सरकारी पुढाकाराने इतक्या गतीने वाढला आहे आणि त्यात वैचित्र्य निर्माण झाले आहे की, त्या मानाने लायक व्यवस्थापक कमी पडू लागले आहेत आणि सहकारी चळवळीचा जनतेवर पडावा तसा प्रभाव पडू शकलेला नाही. सहकारी चळवळीला मारक होणाऱ्या इतरही गोष्टींकडे लक्ष देऊन उपाययोजना करण्याची वेळ आलेली आहे.

सहकारी चळवळीमध्ये काही ठिकाणी सामाजिक आणि राजकीय मक्तेदारी निर्माण झालेली आहे, त्यामुळे ह्या चळवळीत व्यवस्थापनात आवश्यक क्रांतिकारक सुधारणा घडवून आणण्याचे मार्गात व्यत्यय येत आहे. धंदेवाईक व्यवस्थापकांना स्वत:च्या स्थानाची सुरक्षितता लाभली, तर निवडून आलेल्या संचालकांचे अधिकार कमी होतील; विशिष्ट वर्गाच्या व्यक्तींना निकोप नसणाऱ्या धोरणाने दिल्या जाणाऱ्या अवास्तव सोईसवलतींना लगाम घातला जाईल.

सहकारी संस्थांचे नेतृत्व आर्थिकदृष्ट्या बलवत्तर असलेल्या अल्पसंख्याकांच्या हाती आहे आणि त्यामुळे त्यांना समाजात सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा लाभली आहे. ह्या नेत्यांना, सहकारी चळवळीमुळे आपल्या अनुयायांना मदत करून पुढारीपण मिळविण्याची संधी मिळते. हे पुढारी सहकारी चळवळीच्या सामाजिक आणि ध्येयात्मक महत्त्वाचे नसते स्तोम माजवून धंदेवाईक व्यवस्थापनाच्या वाढीस आडकाठी आणतात; कारण स्वतंत्र सुस्थानापन्न धंदेवाईक व्यवस्थापकांमुळे त्यांच्या स्वत:च्या हस्तक्षेपाला पूर्ववत वाव मिळणार नाही, हे ते जाणून आहेत. व्यवस्थापकांच्या श्रेणीची कल्पना यशस्वी व्हावयाची असेल, तर निवडून येणाऱ्या संचालक मंडळांचे आणि पगारी मुख्याधिकाऱ्यांचे अधिकारक्षेत्र निश्चित करून दिले पाहिजे. संचालक मंडळाने धोरणे आखून द्यावी, लक्ष्ये ठरवावी, आणि त्यांची व्यवस्थापकाकडून कसोशीने अपेक्षा करावी. व्यवस्थापक नालायक ठरले, भ्रष्टाचार किंवा दिलेल्या अधिकाराचा दुरुपयोग करू लागले, तर संचालक मंडळाने जरूर मध्ये पडावे. आर्थिक कामांची नोंद घेऊन त्याने मंजुरी द्यावी. संस्थेच्या दीर्घकालीन इष्ट प्रगतीची आखणी करावी.

व्यवस्थापकांना दैनंदिन व्यवहारात पूर्ण स्वातंत्र्य असावे. ह्या स्वातंत्र्यात चुका करण्याचा अधिकार अभिप्रेत आहे. कारण, किरकोळ चुकांमुळे होणारे नुकसान वेळेवर कार्य झाल्यामुळे होणाऱ्या फायद्यापेक्षा कितीतरी कमी असेल. ठरविलेली उद्दिष्टे गाठण्यात अपयश आले, तर संचालक मंडळाने त्याची जरूर चिकित्सा करावी; स्वातंत्र्य ह्याचा अर्थ व्यवस्थापकांनी संचालक मंडळाला धुडकावणे, असा नव्हे.

व्यवस्थापक वर्गाच्या केडरमध्ये कुणाचा समावेश होईल, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. सरकारी नोकरांतूनच केडर निर्माण करावयाचे झाले, तर त्याचा मूळ उद्देशच निष्फळ होईल. व्यावसायिक अनुभव आणि त्या कामाची नावड, ह्याबरोबर त्यांना संस्थांशी तन्मय होता येणार नाही, हीही त्यांच्या नेमणुकीला पोषक गोष्ट नाही. मध्यवर्ती सरकारला सरकारी क्षेत्रातील कंपन्यांच्या बाबतीत हा अनुभव आलेला आहे. बाहेरील उपलब्ध लोकांतून निवडलेल्यांचे केडर केले, तर सरकारी नोकरांच्या सवत्या सुभ्याकडून विरोध येईल. सहकारी चळवळीचा विस्तार झाल्यामुळे काही बिनसरकारी व्यक्तींचा व गटांचा फायदा झाला, तसाच सरकारी नोकरांचाही झाला आहे. राज्य सरकारांचे नोकर वेगवेगळ्या सहकारी संस्थांतून डेप्युटेशनवर गेलेले आहेत आणि त्यामुळे त्यांना जादा अधिकार, भत्ते व सुखसोई मिळत आहेत. त्यांच्या मूळ जागी, खालचे नोकर बढती मिळून जाऊन बसले आहेत. ह्याला धक्का देणारी सुधारणा, सध्याच्या परिस्थितीचा लाभ घेत असलेल्या उभय वर्गाला मानवणारी नाही. पहिला वर्ग कमी करून आणि दुसऱ्या वर्गाला चुचकारूनच मुख्यमंत्र्यांना पुढे पाऊल टाकावे लागेल. परंतु दोघांच्याही जवळ चिकटून, टिकून राहण्याची ताकद आहे.

आमच्या हजारो खातेदारांचे नि हितचिंतकांचे
दीपावली शुभ चिंतन

तुमच्या संचयाची व समृद्ध जीवनाची विश्वस्त.

## दि सांगली बँक लिमिटेड

रजि. ऑफिस : राजवाडा चौक
– सांगली –

स्थापना १९१६ ] शेड्यूल्ड-बँक [ सुवर्णमहोत्सवी वर्ष १९६६

दिपावलीचे शुभ मुहूर्तावर आपण वस्त्रालंकाराची खरेदी करणारच तशीच आमची दामदुप्पट योजना सर्टिफिकेटस् खरेदी करून आपला आनंद द्विगुणित करा.

प्रत्येक व्यक्तीस रु. १०० ते ५,००० पर्यंत खरेदी करता येतात

एम्. के. गुप्ते
एम्. ए., एल्. एल्. बी., सी. ए. आय्. आय्. बी.
जनरल मॅनेजर

दिवाळी व नूतन वर्ष सर्वांना आनंदाचे व भरभराटीचे जावो

शेतकरी बांधवांना योग्य वेळी आर्थिक साहाय्य करून राष्ट्राच्या उत्पादनात भर टाकून जनतेची सेवा करणारी बँक म्हणजेच ............

## ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., ठाणे

दूरध्वनी क्रमांक | ५९१६१८ | ५९३०१४
मुख्य कचेरी
१५:४ छत्रपती शिवाजी पथ, ठाणे

तालुक्याचे ठिकाणी व इतरत्र २५ शाखा

ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दर; विशेषतः सेव्हिंग्ज खात्यावरील दर ४ टक्के

| | | |
|---|---|---|
| श. ह. भिडे, | वि. द. खाडे, | मा. प. मेहेर, |
| मॅनेजर | व्हा. चेअरमन | चेअरमन |

## श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.

गंगानगर–इचलकरंजी ( जि. कोल्हापूर )

* सहकारातून आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास !
* आजवर नऊ हंगाम यशस्वीपणे पार पाडले असून चालू सन १९६८–६९ चा गळित हंगाम दैनिक २,६०० टनाच्या वाढीव गाळप शक्तीनिशी सुरू होत आहे.
* कारखान्याने हाती घेतलेल्या दीड कोटी रुपये भांडवली खर्चाच्या ५७ सहकारी जलसिंचन योजनेंपैकीं बारा योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. यामुळे चालू वर्षांच्या अभूतपूर्व अवर्षणामुळे तृषार्त भूमीला व जनतेला फार मोठा दिलासा मिळाला.
* कारखान्याच्या ऊसवाहतुकीमध्ये सुकरता यावी व उत्पादक सभासदांना जोडधंदा उपलब्ध व्हावा म्हणून रु. ५०.०० लाखाहून अधिक किंमतीचे १०० ट्रक्स कारखान्यांमार्फत सभासदांना पुरविण्यात आले आहेत.
* कामगार, सभासद व कार्यक्षेत्रातील सामान्य जनता यांचा आर्थिक विकास व्हावा व त्यांचे जीवन सुखमय व्हावे याच ध्येयाने कारखान्याचे कार्य चालू आहे.

*नूतन वर्ष व दीपावली आमचे सभासद, कामगार, ग्राहक व हितचिंतक यांना सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो !*

| | | |
|---|---|---|
| बी. एन. गरगटे | एम. व्ही. सुलतानपुरे | रत्नाप्पा कुंभार |
| मॅनेजिंग डायरेक्टर | व्हा. चेअरमन. | चेअरमन |

## व्यंकटेश रंग-तंतु मिल्स

( स्थापना १९०४ )

इचलकरंजी

♣ ♣ ♣

कॅलेंडर ब्लीच व मर्सराईज्ड धोतरजोडीचे
कारखानदार

ही दिवाळी आमचे ग्राहकांस सुख-समृद्धीची जावो.

## रिझर्व्ह बँकेचा १९६७–६८ चा प्रचंड नफा

### सरकारचा कर्जबाजारीपणा वाढण्याचा हा परिणाम

| उत्पन्न | ३०–६–६८ अखेर रु. | ३०–६–६७ अखेर रु. | ३०–६–६६ अखेर रु. |
|---|---|---|---|
| व्याज, डिस्कौंट, एक्सचेंज, कमिशन इ. | ९२,९२,११,६७१ | ८५,१२,१७,७९८ | ६७,५२,५४,५०२ |
| **खर्च** | | | |
| एस्टॅब्लिशमेंट | ११,७४,५२,५८१ | १०,२४,००,९५२ | ८,९४,२५,८७५ |
| डायरेक्टर, लोकल बोर्ड सभासद ह्यांची फी, भत्ते | ६६,८३९ | ६७,६०५ | ७१,४९० |
| ऑडिटरांची फी | ३०,००० | ३०,००० | ३०,००० |
| भाडे, कर, दिवाबत्ती | ६४,७०,३०७ | ५८,१९,५७६ | ४०,४५,६८४ |
| कायदेशीर सल्ला, कोर्ट खर्च | १,६३,२३९ | १४,७०८ | ४८,३३२ |
| पोस्टेज व तार | ९,६१,९३८ | ८,५०,३७७ | ७,७६,४२५ |
| पैसे पाठविण्याचा खर्च | ४२,१७,५२६ | ४४,२६,०८० | ४४,६१,०९८ |
| स्टेशनरी, इ. | १५,९७,९७६ | १६,१५,८३० | २०,२७,९८१ |
| चेक, नोटा, इ. ची छपाई | ५,००,१३,९०४ | ४,६५,२४,८९७ | ३,९४,१८,२९९ |
| मालमत्तेचा घसारा व दुरुस्ती | ६९,०८,४८७ | ६८,६१,३५७ | ४९,०१,५८४ |
| एजन्सी चार्जेस | ८,६५,३०,३७६ | ७,८३,५९,७३३ | २,६०,७२,८०४ |
| स्टाफ फंडात | ७,३२,००० | ७,३२,००० | ७,३२,००० |
| इतर खर्च | ४०,६६,१४५ | ३५,१३,७७४ | ३२,४२,५४७ |
| निव्वळ वाढावा | ६५,००,००,३४८ | ६०,००,००,९०३ | ५०,००,००,३७७ |
| एकूण | ९२,९२,११,६७१ | ८५,१२,१७,७९८ | ६७,५२,५४,५०२ |
| मध्यवर्ती सरकारच्या वाट्याचा वाढावा | ६५,००,००,३४८ | ६०,००,००,९०३ | ५०,००,००,३७७ |

रिझर्व्ह बँकेचे उत्पन्न सालोसाल वाढत आहे; १९६५–६६ मध्ये ते ६७·५ कोटी रु. होते, ते १९६६–६७ मध्ये ८५ कोटी रु. आणि १९६७–६८ मध्ये ९३ कोटी रु. झाले. खर्चही वाढत गेला, तरी सर्व खर्च वजा जाता निव्वळ वाढावाही वाढत गेला; ५० कोटी रु. चा ६० कोटी रु. आणि आता तो ६५ कोटी रु. झाला. मध्यवर्ती सरकारलाही त्याचप्रमाणे वाढती रक्कम मिळत गेली.

ह्या प्रचंड नफ्याचे इंगित काय आहे? "१९६७–६८ मध्ये उत्पन्न ७·८० कोटी रुपयांनी वाढले, त्याचे मुख्य कारण ट्रेझरी बिलांवरील डिस्कौंटचे आणि रोख्यांवरील व्याजाचे उत्पन्न अधिक आले" असा १९६७–६८ सालच्या रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालात उल्लेख आहे. मध्यवर्ती सरकारची पैशाची तात्कालिक गरज भागविण्यासाठी ही ट्रेझरी बिले विकण्यात येतात, त्यांची मुदत ९१ दिवसांची असते. ह्या विक्रीवर रिझर्व्ह बँकेला द.सा. द. शे. ३ ह्या दराने डिस्कौंट मिळते. ही बिले विकून त्यांची रक्कम सरकारला उपलब्ध करून दिली जाते. ९१ दिवसांनीं परतफेडीची वेळ येईल, तेव्हा परतफेड शक्य झाली तर ठीक; नाहीतर त्या परतफेडीसाठी पुनः नवी ट्रेझरी बिले विकण्यात येतात; रिझर्व्ह बँकेला पुनः द. सा. द. शे. ३ प्राप्तीचे साधन प्राप्त होते. सरकारची पैशाची गरज वाढत गेली, की ट्रेझरी बिलांची विक्रीही वाढत जाते; रिझर्व्ह बँकेचे उत्पन्नही वाढत जाते. ह्यासंबंधातील परिस्थितीं खालील तक्ता दर्शविते :—

| वर्ष | ट्रेझरी बिलांची विक्री (कोटी रु.) | परतफेड (कोटी रु.) | ट्रेझरी बिलांपोटी निव्वळ देणे (कोटी रु.] |
|---|---|---|---|
| १९६०-६१ | ११५ | ११२ | १,१०९ |
| १९६१-६२ | १३१ | १३१ | १,१७४ |
| १९६२-६३ | १६४ | १६३ | १,२९९ |
| १९६३-६४ | २२२ | २२० | १,३८१ |
| १९६४-६५ | ३१३ | ३०७ | १,४४३ |
| १९६५-६६ | ४२२ | २८४ | १,६११ |
| १९६६-६७ | ६५६ | ६६४ | १,९१९ |
| १९६७-६८ | ७३३ | ६४६ | २,०६४ |

ट्रेझरी बिलांच्या द्वारा सरकारला जे कर्ज मिळते, त्यातील प्रचंड वाढीमुळे रिझर्व्ह बँकेचे डिस्कौंटचे उत्पन्न वाढते आणि उरणारा वाढावाही वाढत जातो. सरकारला त्याचा वाटाही वाढत्या प्रमाणात मिळत जातो. असा हा कागदी हिशेब आहे.

तार :- SANCOSOP ऑफिस फोन नं.:- २३२१५; २३५८८
शीतगृह फोन नं.:-२३८५०.

विना सहकार नही उद्धार

आमच्या शेतकरी बंधूंस, ग्राहकांस, हितचिंतकांस
दीपावलीनिमित्त शुभेच्छा

पुणे जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ., लिमिटेड

१२५, भवानी पेठ, पुणे २

शेतकरी बंधूंसाठी सहकारी क्षेत्रातील एकमेव संस्था.
सर्व प्रकारची नत्रयुक्त व इतर खते, तसेच सर्व प्रकारची मिश्रखते.
सर्व प्रकारची ऑईल इंजिन्स व विद्युत मोटार्स.
शेती-उपयुक्त सिमेंट व लोखंडी मालाचा पुरवठा.
इंडियन ऑईल कंपनीचे केरोसिन व इतर तेले.
अडत विभागातर्फे शेतकऱ्यांच्या मालाची उत्तम भावाने विक्री.
नाशवंत माल ठेवण्यासाठी अद्ययावत शीतगृहाची सोय.

के. डी. शिंदे, बी. ए., मॅनेजर
संभाजीराव साहेबराव काकडे, बी. ए., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर

मुगुटराव साहेबराव काकडे, देशमुख, चेअरमन

नूतन वर्ष आमच्या ग्राहकांस व हितचिंतकांस सुख-समृद्धीचे जावो

सांगली जिल्ह्याचा कृषि औद्योगिक विकास सहकाराद्वारे साधण्यास गेली ४१ वर्षे अविरतपणे प्रयत्नशील असणारी

सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सांगली

फोन नं. : मॅनेजर : ५४४, अकौंटंट : ३० तार : रयतबँक

| | |
|---|---|
| शेअर भांडवल | रु. ८५,२१,४५० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. १९,८०,११० |
| ठेवी | रु. ४,९३,०८,४५८ |
| खेळते भांडवल | रु. ७,९६,९६,९८० |

(१) सांगली जिल्ह्यामध्ये बँकेच्या २१ शाखा कार्य करीत आहेत.
(२) सरकारने बँकेचे रु. २२ लाख, ५० हजार किंमतीचे शेअर्स घेतले आहेत.
(३) सहकारी संस्थांना शेतीच्या गरजेसाठी प्रामुख्याने कर्जे दिली जातात.
(४) कायमठेव दरसाल दर शेकडा ४ ते ७-५० टक्के व्याजाच्या दराने ठेवी स्वीकारल्या जातात.
(५) बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

गुलाबराव रघुनाथराव पाटील, चेअरमन.
पंडित भाऊराव टाकवेकर, मॅनेजर.

तार :—साखर-सांगली. फोन नं. :—१७० ऑफिस, १७५ चेअरमनसाहेब, ३७० मॅ. डायरेक्टर (निवास)

# शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली.

(महाराष्ट्र राज्य)

देशातील जनता जर खऱ्या अर्थाने सुखी आणि समृद्ध व्हायची असेल तर या देशात कृषि-औद्योगिक समाजनिर्मिती झाली पाहिजे, हा मंगलमंत्र नामदार श्री. यशवंतरावजी चव्हाण यांनी दहा वर्षांपूर्वी दिला. त्या स्फूर्तिदायक संदेशातून जी प्रेरणा आणि सामर्थ्य लाभले, त्यातूनच सांगली जिल्ह्यात आज शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली हा प्रगतीची वाटचाल करीत आहे. 'कृषि औद्योगिक समाजनिर्मितीच्या राष्ट्रीय कार्यात तो आपला वाटा अभिमानाने उचलीत आहे.

ह्या साखर कारखान्याचा आज साऱ्या महाराष्ट्रात साभिमान उल्लेख केला जातो. तो आजच्या सांगली जिल्ह्यातील प्रगत कारखानदारीचा केंद्रबिंदू आहे, असे नम्रपणे नमूद करावेसे वाटते. १९५६ साली स्थापन झालेल्या साखर कारखान्याच्या परिसरात आज डिस्टिलरी सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्शन प्लँट, सहकारी कोंबडी पालन संघ, सांगली औद्योगिक वसाहत, ३६ सहकारी तेल गिरण्या, सिमेंट पाइप फॅक्टरी, सहकारी लिफ्ट इरिगेशन योजना, आदी शेती व्यवसायात संबंधित संस्था आत्मविश्वासाने उभ्या आहेत. एका संस्थेतून दुसऱ्या संस्थेची उभारणी होत आहे. भारत सहकारी सूत गिरणी अस्तित्वात येत असून नियोजित सहकारी कागद कारखान्याचे प्रयत्न मोठ्या हिरिरीने चालू आहेत. समाजवादी समाजरचनेच्या दृष्टिकोनातून शेतकरी सुखाकडे जात आहे. सांगली जिल्ह्यांत आजवर झालेल्या या कार्याच्या शक्तीचे, स्फूर्तीचे अन् श्रद्धेचे स्थान आहेत—पद्मभूषण वसंतरावजी पाटील आणि त्यांनी स्थापन केलेला व त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला तुमचा-आमचा, महाराष्ट्राचा आणि भारताचा शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली. त्याने सन १९६७-६८ साली ३,३५,६३० टन ऊस गळित व ४,०२,०८० पोती साखर निर्माण करून भारतात उच्चांक प्रस्थापित केला आहे. सन १९६८-६९ साली पाच लक्ष टन ऊस गळित करून सहा लाख पोती साखर उत्पादन करून या उच्चांकात अधिक भर घालीत आहे.

आ. र. उपाध्याय, मॅनेजिंग डायरेक्टर
दिनकरराव हिंदुराव पाटील, व्हाइस चेअरमन

शेतकरी सहकारी साखर कारखाना लि., सांगली.

ग्रामीण भागातील बचत वाढविण्यासाठी

# व्यापारी बँका काय करू शकतील ?

अलीकडे काही वर्षांत शेतीच्या मालाला भरपूर किंमत येऊ लागल्यामुळे ग्रामीण भागांतील लोकांजवळ चांगला पैसा झाला आहे. ह्या पैशाचा उपयोग शेतीच्याच विकासासाठी न करता वैयक्तिक ख्यालीखुशालीसाठी पुष्कळदा करण्यात येतो; निदान तशा वार्ता ऐकू येतात. म्हणून ग्रामीण भागांतील हा पैसा उत्पादक कामाकडे वळविण्याचे काम बँकांनी हाती घ्यावयास पाहिजे, असे सांगण्यात येते. ह्यासंबंधी सुचविण्यात येणाऱ्या उपायांची ही अल्पशी चर्चा.

ग्रामीण भागांतील पैसा बचतीच्या रूपाने एकत्रित करण्याच्या प्रश्नाने एकाएकी राष्ट्रीय महत्त्व धारण केले आहे. हा पैसा लवकरात लवकर गोळा करण्यात आला नाही, तर देशातील विकासकार्यासाठी तो उपयोगात आणण्याची संधी कायमची दुरावेल, असा ओरडा सर्व देशभर करण्यात येत आहे. खेडेगावातील लोक हाती आलेला पैसा अविचाराने अनुत्पादक बाबींवर उधळून टाकतील अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे. तथापि, काही थोड्या अर्थशास्त्रज्ञांनी ह्याविषयी निराळा अभिप्राय व्यक्त केला आहे. त्यांचे म्हणणे असे की ग्रामीण भागात भरपूर पैसा आहे, ही एक रम्य कल्पनाच आहे. गेली दोन वर्षे देशातील अनेक भागांत दुष्काळ पडलेला होता आणि आता शेतीच्या मालाच्या किमती घसरल्या आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागांतील लोकसंख्याही वाढली आहे. ह्या परिस्थितीचा विचार करता ग्रामीण भागांतील लोकांचे दरडोई उत्पन्न दोन किंवा तीन वर्षांपूर्वी होते त्याच्यापेक्षा आज जास्त झालेले नाही. ग्रामीण भागांतील लोकांच्या दरडोई उत्पन्नाचा प्रश्न बाजूला ठेवला तर एक गोष्ट अगदी स्पष्टपणे दिसून आल्याशिवाय राहात नाही. देशातील काही ठिकाणचा विवक्षित शेतकरी वर्ग भरपूर पिके काढीत आहे. त्यांच्याजवळ वाचविण्याजोगे व गुंतवणुकीजोगे बरेच मोठे उत्पन्न म्हणून पैसा आहे, हे नाकबूल करता येण्यासारखे नाही. तंजावर हा एकच जिल्हा घेतला तरी असे दिसून येते की, तेथील शेतकरी दरसाल ९० कोटी रुपयांच्या पिकांची विक्री करतो. शेतकऱ्यांच्याजवळ असलेला हा भरपूर शिलकी पैसा कसा गोळा करावा हा प्रश्नच आहे. अर्थात तो गोळा करण्यात आला तर त्याचा उपयोग बिगर-शेतकरी अधिक चांगल्या रीतीने उत्पादनाच्या कामी लावील असे गृहीत धरण्यात आले आहे.

ह्या विषयासंबंधी दोन प्रमुख सूचना करण्यात आल्या आहेत. अर्थमंत्र्यांनी अशी सूचना केली आहे की व्यापारी बँकांनी ग्रामीण भागात शाखा उघडाव्या. ह्या सूचनेला धरून असेही सांगण्यात येत आहे की व्यापारी बँकांनी फिरत्या शाखा उघडाव्या किंवा एकाच माणसाकडून चालविल्या जाणाऱ्या शाखा उघडाव्या. दुसरी सूचना डॉ. ध. रा. गाडगीळ ह्यांनी राष्ट्रीय विकास मंडळाच्या बैठकीत केली आहे. ग्रामीण भागांतील पैसा बचतीच्या रूपाने गोळा करण्यासाठी ग्रामीण कर्जरोखे मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी काढण्यात यावेत अशी ही सूचना आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने छोट्या शहरांतून आणि ज्या ठिकाणी बँक नाही अशा ठिकाणी अनेक शाखा उघडल्या आहेत. परंतु केवळ सरकारी मदतीमुळेच तसे करणे शक्य झाले आहे. दक्षिण भारतामधील दोन व्यापारी बँका सोडल्या तर दुसऱ्या कोणत्याही बँकेने ग्रामीण भागात शाखा उघडलेल्या नाहीत. कारण, तेथे मोठ्या प्रमाणावर धंदा होणार नाही म्हणून पुरेसा नफाही सुटणार नाही असे बँकांना वाटत आहे.

खेडेगावी हिंडणाऱ्या फिरत्या शाखा काढाव्या आणि त्यांनी ठिकठिकाणी जाऊन लोकांपासून त्यांचा शिलकी पैसा गोळा करावा असे सुचविण्यात आले आहे. पण, ही योजना व्यवहार्य आहे काय, ह्याचा विचार करण्यात आला पाहिजे. बँकांमार्फत आपल्या पैशाचे व्यवहार करण्यास शेतकऱ्यांना उद्युक्त करण्यासाठी त्यांच्यात प्रथम विश्वास उत्पन्न केला गेला पाहिजे. चांगली सेवा आणि व्यक्तिगत जवळीक ह्यामुळेच जरूर तो विश्वास उत्पन्न करता येईल. बँकांच्या फिरत्या शाखा खेडेगावात आठवड्यातून फार तर एक किंवा दोन वेळा जाऊ शकतील. अशा बँकवाल्यांजवळ कोठला शेतकरी आपल्या श्रमाचा पैसा देईल ? दुसरे असे की, शेतकऱ्याला कर्जाची जरुरी असते. ही गरज फिरत्या बँकांच्यामार्फत भागवावयाची म्हटले तर शेतकऱ्यांना आपल्या कर्जाच्या मागण्या स्वतःच्या सोयीप्रमाणे न आखता बँकेच्या सोयीप्रमाणे आखाव्या लागतील. एखाद्या वेळी फिरत्या बँकेची मोटार बिघडली अगर काही कारणाने ती वेळेवर आली नाही तर शेतकऱ्यांना बँकेविषयी काहीच आपुलकी वाटणार नाही. असे प्रसंग भारतात अनेक कारणांनी उद्भवू शकतात व शकतील. फिरती शाखा काढावयाची झाल्यास तिचा खर्च बेताचा असेल काय ? अशा फिरत्या शाखेत बँकेचे काम करण्यासाठी एखादा कारकून अगर अधिकारी तर हवाच पण त्याशिवाय एक ड्रायव्हर आणि एक बंदुकधारी रखवालदार ह्यांचीही आवश्यकता आहे. ह्या सर्व नोकरांना ठरलेल्या वेळेपेक्षा अधिक काम करावे लागेल. कारण त्यांना दुसऱ्या ठिकाणाहून

नव्या युगाच्या निरीक्षका तूं....
आळव क्रांती गान !
गा क्रांतीचे गान ! !

निरीक्षका !

## नवयुगात क्रांती कोणती ...?

देश स्वावलंबी बनविणे, त्यासाठी अन्नधान्य आघाडी मजबूत करणे, प्रत्येक पाण्याचा थेंब वाया न जाऊ देता अन्नधान्याच्या उत्पादनासाठी वापरणे. यासाठी —

# यशवंत सिमेंट वस्तु निर्मिती सहकारी सोसायटी लि., सांगली

या कामगार सहकारी संस्थेने सांगली औद्योगिक वसाहतीत

## आपल्या कारखान्यात उत्पादन केलेले सिमेंट पाईप्सच वापरा.

असाच सल्ला अनुभवी शेतकरी सांगेल, असा आमचा ठाम विश्वास आहे !

**नामदेव कराडकर**
सेक्रेटरी

**रघुनाथ रामचंद्र भिडे**
चेअरमन

---

सतफलाय सहकारिता

# पुणे जिल्हा सहकारी भू-विकास बँक लि., पुणे

फोन नं. २५१११ ] १०७ भवानी पेठ, पुणे नं. २ [ रजिस्टर नं. ७२११

बँकेच्या प्रगतीचे बोलके आकडे

| | | |
|---|---|---|
| (१) सभासद संख्या | | १८,७१६ |
| (२) अधिकृत भांडवल | रु. | १,००,००,००० |
| (३) खपलेले भाग भांडवल | रु. | ४७,४५,०६५ |
| (४) रिझर्व्ह व इतर फंड | रु. | २,३८,७९८ |
| (५) सभासदांकडून येणे कर्ज | रु. | २,४३,५६,६७६ |
| (६) खेळते भांडवल | रु. | ४,२८,८६,३८० |

या बँकेच्या १४ शाखा व २ उपशाखा असून या शाखांमार्फत ही बँक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा करून देशाच्या धान्यउत्पादन मोहिमेस हातभार लावीत आहे.

**दा. दा. चव्हाण,** बी. ए. (स्पे.)
मॅनेजर

**व. स. सणस**
चेअरमन

यावे लागेल. अर्थातच त्यांना जादा वेळ कामाचा भत्ता द्यावा लागेल. तेव्हा अशा फिरत्या शाखा काढणे उपयुक्त होणार नाही. कारण ग्रामीण भागाच्या दृष्टीने त्या सोयीच्या अगर बेताच्या खर्चाच्या होणार नाहीत.

एकाच माणसाकडून चालविल्या जाणाऱ्या शाखा काढण्याची कल्पनाही बरीच जुनी आहे. पण तीही व्यवहार्य नाही. शेतकऱ्यांच्या मनात अशाश्वतीच्या भावनेने कायमचे ठाण मांडलेले असते. त्यामुळे जो त्यांच्या मनात निश्चिंतपणाची भावना निर्माण करू शकत नाही अशा कोणत्याही माणसाजवळ तो आपला पैसा विश्वासाने देण्यास धजावणार नाही. ही भावना निर्माण करण्यासाठी बँकेची रीतसर कचेरीच पाहिजे. कचेरी म्हटली की तिचा सारा सरंजाम आलाच. त्याशिवाय विश्वासाचे वातावरण निर्माण होतच नाही. कर्जे मिळण्याच्या सवलतीचा फायदा मिळत नसेल तर कोठलाही शेतकरी आपला पैसा बँकांजवळ ठेवणार नाही आणि कर्जाचा व्यवहार एकाच माणसाकडून चालविला जाणे शक्य नसते. तेव्हा एकंदरीने ग्रामीण भागांतील पैसा गोळा करण्यासाठी झटपट रंगारी पद्धतीचे मार्ग शोधणे योग्य होणार नाही.

रिझर्व्ह बँकेच्या रूरल क्रेडीट सर्व्हे कमिटीने १९५५ सालीच ग्रामीण भागासाठी खास कर्जरोखे काढण्याची सूचना केली होती. १९५७ च्या डिसेंबरमध्ये रिझर्व्ह बँकेच्या दुसऱ्या एका कमिटीने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की उत्पादक कामासाठी पैसा उभारण्याचे पहिले पाऊल म्हणून ग्रामीण कर्जरोखे काढण्यास हरकत नाही. ह्या कर्जरोख्यांची (डिबेंचर्स) मुदत ५ वर्षांपेक्षा अधिक असावी; पण ८ वर्षांपेक्षा कमी असावी. हा उपक्रम मध्यवर्ती लँड मॉर्टगेज बँकांनी सुरू केला आहे. सुगीच्या वेळी असे कर्जरोखे त्या काढतात. ह्या कामी त्यांना रिझर्व्ह बँकेचे सहकार्य व मदत मिळते. कर्जरोखे पैसे गुंतविणाऱ्यांना आकर्षक वाटावे म्हणून त्यावरील व्याजाचा दर जरा अधिक ठेवण्यात आला आणि मुदत ८ वर्षांऐवजी ७ वर्षांची ठेवण्यात आली. शिवाय डिबेंचर्सची मालकी वर्ग करण्याची सवलतही देण्यात आली. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे लँड मॉर्टगेज बँकांना ग्रामीण कर्जरोखे काढण्यास उत्तेजन मिळावे म्हणून रिझर्व्ह बँकेने काही जबाबदारी स्वीकारली. कर्जरोख्यांच्या सार्वजनिक विक्रीने रोख्यांची पूर्ण रक्कम जमा झाली नाही तर कमी पडलेल्या रकमेचे रोखे घेण्याचे रिझर्व्ह बँकेने मान्य केले. मात्र ही खरेदी एकूण कर्जरोख्यांच्या किमतीच्या दोनतृतीयांशापेक्षा अधिक असणार नाही अशी अट घालण्यात आली.

१९६२ ते १९६७ ह्या अवधीत मध्यवर्ती लँड डेव्हलपमेंट बँकांनी काढलेल्या ग्रामीण कर्जरोख्यांचे स्वागत लोकांनी कसे केले ते पुढे दिलेल्या कोष्टकावरून दिसून येते.

(आकडे कोटी रुपयांचे)

| वर्ष | एकूण कर्जरोखे | सार्वजनिक विक्री | रिझर्व्ह बँकेची खरेदी |
|---|---|---|---|
| १९६२–६३ | १·५७ | ०·७० | ०·६२ |
| १९६३–६४ | १·८४ | ०·८५ | ०·७४ |
| १९६४–६५ | ३·२३ | १·३० | १·१४ |
| १९६५–६६ | ४·३३ | १·७० | १·४९ |
| १९६६–६७ | २·९३ | ०·९२ | ०·८० |

लोकांनी कर्जरोख्यांना इतका अनुत्साहक साद का दिला ? एक कारण असे की ग्रामीण भागातील लोकांची बचत बेताबाताचीच आहे, आणि दुसरे असे की अर्थव्यवस्थेतील इतर विभागांना ह्या बचतीचे आकर्षण वाटू लागले आहे. तथापि शेतकऱ्यांना जर असा अनुभव आला की त्यांनी बचतीच्या रूपाने गोळा करून दिलेला पैसा खास त्यांच्या कल्याणासाठी वापरण्यात येतो अगर येईल तर मात्र हे कर्जरोखे अधिकाधिक लोकप्रिय होऊ लागतील. ह्याचा अर्थ असा की ग्रामीण कर्जरोखे काही निश्चित कार्यक्रमाशी निगडित झालेले असले पाहिजेत. ग्रामीण भागातील शिलकी पैसा बचतीच्या रूपाने गोळा करण्याचा जास्तीत जास्त चांगला उपाय असा सुचविता येईल की जमिनीत पैसा गुंतविण्याची जबाबदारी शेतकऱ्यावरच टाकण्यात यावी. हा पैसा गुंतविण्याचे सामर्थ्य मुख्यतः व्यापारी पिके काढणाऱ्या प्रगतिशील शेतकऱ्यांत आहे. पण त्यांच्यापुढे मालाची साठवण करण्याच्या प्रश्नाने काहीसे गंभीर स्वरूप धारण केले आहे. साठवण करण्यासाठी गुदामे बांधण्यासाठी त्यांना उत्तेजन देण्यास काय हरकत आहे ? त्यांनी अशी गुदामे बांधल्यास ती पाच ते सात वर्षांपर्यंत सरकार भाड्याने घेऊन वापरील अशी हमी भारताच्या अन्न महामंडळाने अगर राज्य सरकारांनी द्यावी. त्याशिवाय शेतीशी संबंधित अशी इतर अनुषंगिक कामे हाती घेण्यात येऊन शेतकऱ्यांना आपल्या शिल्लक पैशापैकी काही भाग त्यात दरसाल गुंतविण्यास प्रवृत्त करावे. शेतीला भांडवलाचा जो अपुरा पुरवठा होत आहे, त्यावर ह्या मार्गाने हळुहळू तोड निघू शकेल. तथापि, भरभराटीची आणि समृद्धीची काही ठिकाणे दृष्टीस पडली तरी त्यामुळे ग्रामीण भागात सर्वत्र दिसून येणाऱ्या दारिद्र्याच्या सागराकडे दुर्लक्ष होता कामा नये. आपल्या नियोजकांकडून सर्वसामान्य शेतकऱ्याला संपूर्णपणे पाठिंबा व साह्य मिळण्याची अतिशय आवश्यकता आहे. काही थोड्या श्रीमंत शेतकऱ्यांनी त्यांच्या विकासाच्या आड येण्याचे काही कारण नाही.

फोन नं. १२५ तार : शेतकरी

शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर

भारताची सुख-समृद्धी शेतीच्या विकासावर अवलंबून आहे. यासाठी संघाचे "बैलछाप" दाणेदार मिश्रखत वापरा.

♣

वसूल भाग भांडवल रु. १५·२५ लाख
रिझर्व व इतर फंडस् रु. ५० लाख
खेळते भांडवल रु. ३·८२ कोटी

वि. शं. शिंदे, (नेसरीकर) कार्यकारी संचालक.
ना. गो. सरदेसाई अध्यक्ष.

जनता सहकारी बँक लि., सांगली

हेड ऑफिस फोन नंबर अकौंटंट २२४ मॅनेजर १३४
कराळे बिल्डिंग, हायस्कूल रोड, सांगली
शाखा मार्केट यार्ड फोन नंबर ४८८

—: प्रगतिपथावरील बोलके आंकडे :—

(ज) अधिकृत शेअर भांडवल रु. ५,००,०००
(न) वसूल झालेले शेअर भांडवल रु. ३,२०,०००
(ता) रिझर्व्ह व इतर फंडस् रु. २,०७,०००
(बँ) एकूण ठेवी रु. २९,६८,०००
(क) एकूण खेळते भांडवल रु. ४३,८०,०००

बा. आ. कबाडे असि. मॅनेजर
ता. शा. पाटील व्हा. चेअरमन

आण्णासाहेब कराळे चेअरमन

## महाराष्ट्रातील ऊस पिकाची चिंतनीय परिस्थिती

### डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री. बाहुबलि गुलाबचंद ह्यांचा गंभीर इशारा

महाराष्ट्रातील जमीन आणि हवामान उसाच्या पिकास विशेष अनुकूल असताही गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील उसाच्या दर एकरी उत्पादनात आणि एकूण उत्पादनातही घट होऊ लागली आहे, ही मोठ्या चिंतेची बाब आहे. १९६० ते १९६४ ह्या दरम्यानच्या काळात दर एकरी उत्पादन ३१·५ टनांवरून ३४ टनांवर गेले, तरी उसाच्या क्षेत्रात घट झाल्यामुळे उसाचे एकूण उत्पादन १·२० कोटी टनांवरून १·१५ कोटी टनांवर आले. उसाचे क्षेत्र ३·३८ लक्ष एकरांचे ३·८१ लक्ष एकर झाले. पण दर एकरी उत्पादन ३४·०० टनांवरून २५·१ टनांवर घसरले आणि एकूण उत्पादनही कमी झाले. ऊस हे महाराष्ट्रातील महत्त्वाचे पीक आहे. लागवडी-खालील एकूण क्षेत्रापैकी उसाखाली फक्त ०·६% जमीन आहे, तरी महाराष्ट्रातील शेतीच्या उत्पन्नापैकी ७·५% उत्पन्न उसाच्या लागवडीपासून मिळते. साखरतज्ञांची एक कमिटी नेमून तिला ह्या गंभीर परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्या-साठी उपाययोजना सुचविण्यास सांगावे, अशी डेक्कन शुगर फॅक्टरीज असोसिएशनचे अध्यक्ष श्री. बाहुबलि गुलाबचंद ह्यांनी सूचना केली आहे.

| वर्ष | उसाखालील क्षेत्र (००० एकर) | दर एकरी उत्पादन (टन) | उसाचे एकूण उत्पादन (००० टन) |
|---|---|---|---|
| १९६०–६१ | ३८४ | ३१·५ | १२,०८९ |
| १९६१–६२ | ३८१ | २८·९ | १०,९९५ |
| १९६२–६३ | ३३४ | ३१·९ | १०,६६७ |
| १९६३–६४ | ३३९ | ३४·० | ११,५१३ |
| १९६४–६५ | ३६५ | २७·२ | ९,९२५ |
| १९६५–६६ | ३८७ | २६·२ | १०,४१० |
| १९६६–६७ | ३८१ | २५·१ | ९,५६८ |

## हे कोडे सोडवा

### कॅशिअर, मॅनेजर आणि अकौंटंट कोण आहे ते ओळखा !

एका बँकेत कुलकर्णी, पाटील आणि कानडे असे अधिकारी काम करतात. त्यांपैकी एकजण कॅशिअर, एकजण मॅनेजर आणि एकजण अकौंटंट आहे, पण त्या अनुक्रमानेच असे नव्हे.

अकौंटंट हा आपल्या आईबापाचे एकुलते एक अपत्य आहे. त्याला सर्वांत कमी पगार आहे.

कानडेचा कुलकर्णींच्या बहिणीशी विवाह झालेला असून त्याला मॅनेजरपेक्षा जास्त पगार मिळतो.

कोण कोणत्या जागी काम करतो, ते ओळखा.

(उत्तर पृ. ५३ वर)

# पीक विमायोजना व्यवहार्य आहे काय?

## योजनेतील नैतिक जबाबदाऱ्या

**हिंदमधील शेती अजून बऱ्याच प्रमाणात पावसाच्या लहरीवर अवलंबून आहे. शिवाय टोळधाडी, कीड, इत्यादी संकटे आहेतच. उत्पादन अद्याप जेमतेम गरजेपुरतेच आहे. अशा परिस्थितीत पीक विमायोजना भारतात अमलात आणता येईल काय? तशी शक्यता असेल तर काय पथ्यपाणी सांभाळावे लागेल, त्या संबंधीचा हा ऊहापोह.**

विमा ह्या शब्दाला जादूच्या कांडीची आकर्षकता प्राप्त झाल्यासारखे दिसते. केवळ व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर संभाव्य घटनेला तोंड देण्यासाठी खात्रीची तरतूद करणे एवढाच त्या शब्दाचा अर्थ आहे. अस्थिरता आणि अनिश्चितता ह्यांची जागा स्थैर्य आणि निश्चितता ह्यांना देण्याचे कार्य विम्याच्या कल्पनेत अंतर्भूत आहे. हे झाले केवळ शब्दार्थाच्या दृष्टीने; पण ह्या कल्पनेत एक गर्भितार्थ हा आहे. काही ठिकाणे व काही वेळा मुबलकतेच्या व समृद्धीच्या असतात. अशा ठिकाणांतून व अशा वेळी साठा जमवून ठेवता येतो, त्या साठ्याचे रक्षण करता येते आणि नुकसानीच्या प्रसंगी अशा साठ्याचा उपयोग करता येतो; कारण नुकसानीचा अंदाज आधी बांधता येतो आणि त्याचे मोजमापही करता येते.

सामान्य नागरिक विम्याच्या कल्पनेशी आता बराच परिचित आहे. तो आपल्या आयुष्याचा विमा उतरतो, आपल्या मोटारीचा विमा उतरतो, आपल्या प्रवासाच्या जोखमीचा विमा उतरतो आणि आपल्या मालमत्तेचाही विमा उतरतो. त्यामुळे त्याला असे वाटते की कोणत्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून अगर मुद्दाम घडवून आणलेल्या आपत्तीपासून अशाच प्रकारचे संरक्षण मिळविता येणे शक्य आहे. त्याचप्रमाणे त्याला असेही वाटते की शेतकऱ्याला ईश्वरी कोपामुळे अगर स्वतःच्या मूर्खपणामुळे ज्या जोखमींना तोंड द्यावे लागते त्यांची धार विम्याच्या मार्गाने बोथट करता येईल. शेतकऱ्याच्या अनेक चोखमी विसरून टाकता येतील असे गृहीत धरण्यात येते. त्यामुळे पिकाच्या विम्याचे अगर शेताच्या विम्याचे हेतू स्पष्ट करण्याची फारशी जरुरी भासत नाही. उलट अशा विम्याविरुद्ध घेण्यात येणारे आक्षेपच नीट मांडावे लागतात. शेतकऱ्याला ज्या निश्चित आणि गंभीर अडचणींशी सामना द्यावा लागतो त्यांच्यापासून शेतकऱ्याचा बचाव करण्यासाठी राष्ट्रीय पातळीवर कार्यक्रम आखण्यात आले पाहिजेत; असे कार्यक्रम आखताना सामाजिक सेवा, सार्वजनिक धोरण आणि व्यापारी यश ह्या तिन्ही दृष्टीने विचार करण्यात आला पाहिजे.

शेतीच्या व्यवसायाशी संबंध असलेल्या विमायोजनांचे यश दाखविण्यासाठी अमेरिकेचे उदाहरण नेहमी घेतले जाते. हे यश लक्षात भरण्यासारखे आहे आणि त्यापासून बरेच काही शिकण्यासारखे आहे ह्यात शंका नाही. इस्राइल, इटली, स्वीडन आणि जपान ह्या देशांसारख्या इतर काही देशांत, शेतीविषयक विम्यांना मिळालेले यशही उद्बोधक आहे. मात्र त्यासंबंधीची माहिती फारशी पसरलेली नाही. पश्चिम युरोपातील बहुतेक देश, रशियातील अनेक घटक राज्ये, ब्रिटन आणि कॉमनवेल्थ राष्ट्रगटातील देश, त्याचप्रमाणे दक्षिण अमेरिकेतील काही देश, ह्यातून शेतीविषयक पिकांच्या विम्याच्या योजनांवर चर्चा करण्यात आलेल्या आहेत. काही देशांतून तर अशा योजना कार्यवाहीत असून त्यांना कमीअधिक प्रमाणात यशही लाभले आहे. १९१७ साली बंगलोर येथे भरलेल्या सायन्स कॉंग्रेसच्या बैठकीत म्हैसूर सरकारच्या त्यावेळच्या अर्थखात्याच्या चिटणिसांनी ह्या विषयासंबंधी एक निबंध वाचला होता. परंतु त्यानंतर सर्व काही सामसूम झाले. खुद्द अमेरिकेत पिकाचा विमा उतरण्याची एखादी पद्धत अमलात आणण्याची सूचना बेंजामिन फ्रँकलिन ह्यांनी १७८८ साली केली होती.

तथापि, पिकाच्या विम्याची जोखीम शिरावर घेण्याची जबाबदारी स्वीकारण्यास एक धाडसी कंपनी पुढे आली तेव्हा १८९९ साल उजाडले होते, ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. तरीसुद्धा अशा प्रकारच्या प्रयत्नांनी थोडेबहुत बळ धरण्यास १९१७–२० पर्यंतचा अवधी लागला, तथापि त्यांना यश मात्र मिळाले नाही. विमा उतरणाऱ्या खाजगी संघटना बुडाल्या. एक तर त्यांच्याजवळ आधारभूत अशी आकडेवार माहिती नव्हती. अनिर्वाह्यपणे येणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याइतके पैसेही त्यांच्याजवळ नव्हते. धनिक शेतकऱ्यांनी विमे उतरलेच नाहीत आणि गरीब शेतकऱ्यांची कोणत्याच प्रकाराने नुकसानभरपाई होऊ शकली नाही. ह्या संघटनांजवळ प्रचार करण्याची कलाही नव्हती. ह्या प्रयोगावरून दोन गोष्टी सिद्ध झाल्या. पिकाच्या विम्याबाबत सरकारने पुढाकार घेणे आवश्यक ठरले. अनेक विभागांत करण्यात येणाऱ्या अनेक प्रकारच्या पिकांचा विमा यशस्वीपणे उतरण्यासाठी विम्याचे हप्ते आणि द्यावयाची नुकसानभरपाई ह्यांच्या दरात एकसारखा पण योग्य असा फेरबदल करीत राहण्याची जरूरी उघड झाली. अखेर १९३७ साली अमेरिकेचे अध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट ह्यांनी ह्या बाबतीत महत्त्वाचे पाऊल टाकले. त्यापूर्वी ४ वर्षे अमेरिकेत पिकांची दुर्दशा उडाली होती व त्यांच्या किंमतीही खूप घसरल्या होत्या. त्यांनी पिकाच्या विम्याचा कार्यक्रम आखण्यासाठी एका समितीची स्थापना केली. त्याचवेळी जादा पिकांच्या साठवणीचीही योजना आखण्यात आली. अशा योजनेमुळे टंचाईच्या

# दि बँक ऑफ कराड लि.

(शेड्यूल्ड बँक)

रजिस्टर्ड ऑफिस : १५ रविवार पेठ, कराड.

शाखा : मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, इस्लामपूर, तासगांव, विटे व कोल्हापूर.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ५,४२,००० |
| रिझर्व्हज् | रु. | २,७४,००० |
| डिपॉझिटस् | रु. | १,४५,००,००० |

ठवींवरील व्याजाचे दर

मुदत ठेव ६½% ते ७½%

सेव्हिंग्ज ठेव ४%

कॉल व शॉर्ट टर्म डिपॉझिटस् आकर्षक व्याजाचे दराने स्वीकारली जातील. कराड ऑफिसमध्ये अद्यावत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

अ. शां. हेंद्रे — एजंट, पुणे शाखा

म. वि. खंडकर — जनरल मॅनेजर



दीपावलीनिमित्त शुभेच्छा

# कोल्हापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., कोल्हापूर.

हेड ऑफिस : बिंदू चौक, कोल्हापूर.

फोन नं. ३४२, १०१२, १०१८.

सहकारी समाज-रचनेच्या ध्येयवादाने प्रेरित होऊन जिल्ह्यातील शेती, कामकरी, मजूर, कारागीर, वगैरे अनेक विविध सहकारी संस्थांना अधिक उत्पादनाकरिता पत-पुरवठा करणारी पश्चिम महाराष्ट्रातील अग्रगण्य बँक.

(१) भाग भांडवल रु. १ कोटी, २० लाख, १५ हजार.

(२) ठेवी रु. ७ कोटी, ९५ लाख, ८५ हजार.

(३) खेळते भांडवल रु. ११ कोटींचे वर

मा. ह. भडभडे — मुख्य व्यवस्थापक

वी. एस. पाटील — चेअरमन



## दीपावली शुभचिंतन

दिवाळी व नूतन वर्ष सर्वांस आनंदाचे व सुखसमृद्धीचे जावो.

# दि बेळगांव बँक लि.

स्थापना १९३० शेड्यूल्ड बँक

रजि. ऑफिस : ६५९-६०, रविवार पेठ,

बेळगांव



शेतकऱ्यांचे वैभवस्थान

सहकार-सेवा-सुरक्षितता

बँकेच्या ग्राहकांना खूष खबर

सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना मार्गदर्शन व पत-पुरवठा करणाऱ्या जिल्ह्यातील अग्रगण्य सहकारी बँकेचे वतीने भारतात कोठेही पैसे पाठविण्याची सोय आता बँकेचे मुख्य कार्यालयामार्फत उपलब्ध झाली आहे.

# रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., रत्नागिरी

मुख्य कार्यालय : गुरुकृपा, महात्मा गांधी रोड, रत्नागिरी.

फोन नं. ९६ तारेचा पत्ता : सेंको बँक, रत्नागिरी

दि. ३० जून १९६८ अखेरचे प्रगतीचे आकडे

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | २८,७७,७५० |
| एकूण निधी | रु. | ५,३३,२६७ |
| ठेवी | रु. | १,८९,९३,३६९ |
| खेळते भांडवल | रु. | २,६८,७०,५५८ |
| शाखाविस्तार | | २० |

राज्य सहकारी वीज मंडळाची बिले वसुली या बँकेमार्फत केली जाते. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे एकमेव बँकर्स.

भा. वा. चिटणीस, व्हा. चेअरमन

शां. ल. पेजे बी. ए. (एम्. एल्. ए.) चेअरमन

म. चिं. सांखळकर, बी. ए. (ऑनर्स), एल्. डी. सी., जी. डी. सी. अँण्ड ए. मॅनेजर

काळात ग्राहकांना धान्य मिळण्याची आणि किमती एकदम न भडकण्याची व्यवस्था होणार होती, शेतीच्या मालाचा पुरवठा सतत सारखा चालू राहिला असता, शेतकऱ्यांची खरेदी शक्ती स्थिर राहिली असती आणि व्यापारधंद्याला व रोजगारीला शाश्वती लाभली असती. अमेरिकेच्या संघ सरकारने आणि राज्य सरकारांनी ह्या विषयासंबंधी अनेक दृष्टींनी अभ्यास केला आणि अखेर १९३८ साली संघ सरकारने पीक-विमा कायदा मंजूर केला. त्याचबरोबर तो अंमलात आणण्यासाठी एका कॉर्पोरेशनचीही स्थापना करण्यात आली. ह्या कॉर्पोरेशनच्या मॅनेजरने केलेल्या दहा वर्षांच्या प्रतिवार्षिक अहवालात पीक-विमा योजनेतील अनेक उणीवा नमूद करण्यात आल्या आहेत. अहवालावरून दोन गोष्टी स्पष्टपणे दिसून येतात. पीक-विमायोजनेत जरुरीप्रमाणे सतत बदल करण्याची व दुरुस्त्या करण्याची आवश्यकता ही एक आणि योजना अंमलात आणताना एकसारखा वाढत जाणारा सरकारी खर्चाचा आकडा, ही दुसरी.

भारतात पीक विमायोजना अंमलात आणण्यापूर्वी फार काळजीपूर्वक विचार करण्याची जरुरी आहे. योजनेची स्थूल रूपरेषा आखण्यासाठीसुद्धा ज्या मूलभूत गोष्टींची अवश्यकता आहे त्या येथे अपुऱ्या आहेत किंवा मुळीच उपलब्ध नाहीत. अशी योजना अमलात आणताना हे गृहीत धरलेले असते की काही ठिकाणी आणि काही वेळा पुरवठा पुरेशा प्रमाणावर उपलब्ध असतो आणि त्यातून गरजू माणसांची नड भागविता येते. परंतु भारताची अर्थव्यवस्था ह्या अवस्थेपर्यंत पोचलेली नाही. देशातील बऱ्याच भागांतील उत्पादन अद्याप जेमतेम गरजेपुरते आहे किंवा नाही ! काही उत्पादक समृद्ध आहेत ही गोष्ट खरी. पण त्यांच्याजवळची समृद्धी, बाजारभाव वाढेतोपर्यंत दडपून ठेवण्याची व राजकीय दडपणाची ताकद त्यांच्याजवळ आहे अशा परिस्थितीत पीकविम्याचा फायदा मिळणे बरेच अवघड आहे. कारण, विमा-योजना ही वितरण करणारी अगर आपत्तीचा परिहार करणारी व्यवस्था आहे म्हणून उत्पादनाच्या पातळीवर अगर धोका टाळण्याच्या पातळीवर अधिक जोराचे प्रयत्न व्हावयास पाहिजे आहेत.

शेतकऱ्याने अधिक पिकवावे म्हणून यांत्रिक, तांत्रिक आणि इतर साधनांच्या द्वारे त्याला मदत करण्यात येत आहे. सरकार शेतकऱ्यांना जी मदत देत आहे त्यात अशा साधनांच्या पुरवठ्यास प्राधान्य देण्यात येत आहे. कारण, शेतीचा भक्कम पाया असेल तर अर्थव्यवस्थेच्या विकासाला तर मदत होतेच; पण, काटकसर आणि निश्चितता ह्यांनाही आपोआपच उत्तेजन मिळते. तसे पाहिले तर पीक विमायोजनेने काही पिके निर्माण होत नाहीत, आणि ज्या वेळी भरपूर पीक आले असेल त्यावेळी विम्याची गरजच नसते. ज्यावेळी आणि ज्या ठिकाणी शेतीच्या व्यवसायात नाविकी वध येतात त्यावेळी आणि तेथे मदतीचे उपाय आणि नुकसानभरपाई देण्याची व्यवस्था सध्याच्या कारभारविषयक यंत्रणेतही आहे. मग निराळ्या पीक विमायोजनेची काय आवश्यकता आहे ? तेव्हां पीक विमायोजनेचा एखादा नेहमीचा प्रकार अंमलात आणण्यास प्रारंभ करण्यापूर्वी आपल्या त्या संबंधीच्या कल्पना, पद्धती आणि उपाय ह्यांची स्पष्ट कल्पना करून घेण्यात आली पाहिजे. एक अर्थपूर्ण मुद्दा लक्षात घेतला पाहिजे तो हा की, नुकसानी ह्या शब्दाचा सुसंगत व नक्की अर्थ अजूनहीं निश्चित करण्यात आलेला नाही. 'नुकसानी' ही पिकांचे प्रमाण, किंमत आणि दर्जा ह्याच्यावर अवलंबून असते. पुन्हां त्यांचे अर्थही साक्षेप असतात. कोठले मोजमाप लावावयाचे, त्यावर त्यांचे अर्थ अवलंबून असतात. ह्या बाबतीत देशात उपलब्ध असलेली आकडेवार माहिती फारशी नाहीच, आणि आहे ती विश्वासार्ह नाही. सध्या उत्पादन वाढविण्यासाठी अनेक प्रकारांनी उत्तेजन देण्यात आहे. अशा वेळी तर ह्या माहितीत सारखा बदल होत असतो. 'नुकसानी'ची सध्याची कल्पना किमतीत होणाऱ्या फेरबदलावर आधारलेली आहे. पुष्कळ वेळा ती अगदी मनाच्या समजुतीवरच अवलंबून राहू शकते. 'नफ्याची' कल्पना घेतली तर लागवडीच्या खर्चाची बिनचूक नोंद जेथे नसते तेथे ह्या कल्पनेला फारसा अर्थ राहू शकत नाही. कारण, उत्पादनाच्या खर्चातील काही बाबींची किंमत कृत्रिम अगर मानीव असते. मालाला बाजारात येणाऱ्या किमतीवरून त्याचा दर्जा ठरविला जातो. अर्थात्, दर्जाची कसोटी पाहण्याचे स्वतंत्र साधन उपलब्ध नाही, हेहि खरेच आहे. म्हणून ह्या गुंतागुंतीच्या जंजाळाचे स्वरूप समजण्याठी अनेक प्रघात पाडावे लागतात.

कोणतीही व्यापारी संघटना पीक विमायोजना हाती घेण्याची शक्यता नसल्यामुळे सरकारचेच हे काम आहे असे गृहीत धरण्यात येते. मग प्रश्न असा उत्पन्न होतो, की पीक विमायोजना देशभर पसरलेली असावी, का जी राज्ये तिची आर्थिक जबाबदारी स्वीकारू शकतात त्यांच्यापुरतीच ती मर्यादित असावी ? योजना अशा राज्यांपुरतीच मर्यादित असावी असे ठरविले तर ह्या बाबतीतील राज्यांचे व संघ-राज्याचे घटनात्मक संबंध कसे असावे हाही प्रश्न आलाच. ते कसेही असो; योजना अंमलात आणण्यासाठी स्वतःची वेगवेगळी कार्यपद्धती असणारी अनेक केंद्रे असावीत हे स्पष्टच आहे. जोखमीचे मोजमाप काय असावे हाही प्रश्नच आहे. मोजमापाला आधारभूत म्हणून संबंधित शेत घ्यावयाचे का शेतकऱ्याची सर्व जमीन घ्यावयाची का त्याच्यावरील कर्जाचा बोजाही लक्षात घ्यावयाचा ? सध्याची परिस्थिती लक्षात घेता शेतकऱ्याला कर्ज देणाऱ्या बँकेला पीक विम्याची गरज आहे.

पीक विमायोजना सक्तीची असावी का ऐच्छिक असावी, हा फार मोठा महत्त्वाचा प्रश्न आहे. ऐच्छिक ठेवली तर ज्या शेतकऱ्यांची जोखीम अधिक धोक्याची त्यांनाच योजनेचे

दीपावली शुभचिंतन

यंदाची दीपावली व नवीन वर्ष कारखान्याचे
सभासद, कामगार, व्यापारी व हितचिंतक
यांना सुखसमृद्धीचे जावो !

–शुभ्र व दाणेदार साखरेचे उत्पादक–

दि गिरणा सहकारी साखर
कारखाना लिमिटेड

— भाऊसाहेब हिरे नगर —

पोष्ट–दाभाडी, तालुका–मालेगांव, जिल्हा–नाशिक

चंद्रराव धनजी निकम — उपाध्यक्ष
विजयसिंग ठाकोर — अध्यक्ष
जीवन चंद्र पंत — कार्यकारी संचालक

[ स्थापना १९२१ ]

गरगट्टी अँड सन्स

शहापूर–बेळगाव

धोबी, फॅमिली व शिंपी
पेटंट इस्त्रीचे कारखानदार

आमचे देश-
बांधवांस हे वर्ष
सुखाचे जावो !

दीपावली अभिनंदन

सहकारी क्षेत्रातील आदर्श व यशस्वी प्रयोग

छोट्या यंत्रमाग व हातमाग धारकांच्या अभिवृद्धीसाठी
अहर्निश झटणारी व सभासदांना वाजवी दरात
दर्जेदार सुताचा पुरवठा करणारी एकमेव
सहकारी संस्था

म्हणजेच

दि डेक्कन को-ऑप. स्पिनिंग
मिल्स लिमिटेड

इचलकरंजी, जिल्हा-कोल्हापूर

अधिकृत चात्यांची संख्या–५४,४५६
स्थापित चात्यांची संख्या–४०,१३६

द. बा. कदम — व्हाइस चेअरमन
अ. ग. कुलकर्णी, एम. पी. — चेअरमन
गो. वा. परांजपे — ऑ. सुपरिटेंडेंट
रा. द. गोवंडे — मॅनेजर

अधिक पीक–उत्पादनासाठी !
शेतकऱ्यांचे कसोटीस उतरलेली

'न
व
'न व नां ग र'
ग
र'

छाप

मिश्रखतेच वापरा.

उत्पादक : पन्हाळा बावडा महाल शेतकरी
स. ख. वि. संघ लि., कोल्हापूर

संरक्षण आधी देण्यात आले पाहिजे. ह्या जोखमीच्या प्रमाणात हप्त्यांचे दर आणि योजना राबविण्याचा खर्च ठेवावा लागणार हे ओघानेच आले. जे शेतकरी सामान्यतः ऐपतदार आहेत ते अगर चांगल्या ऐपतीचे शेतकरी पिकांची नुकसानी सोसू शकतात किंवा नुकसान भरून काढण्यासाठी दुसरे उपाय योजू शकतात, अशा शेतकऱ्यांना योजनेत सामील करून घेण्याचे राजकीय धैर्य राज्य अगर संघ सरकारात आहे का? शेवटी योजनेसाठी लागणारा पैसा करातूनच उभा करावयाचा असल्याने कर देणाऱ्यांचा सरकारला सतत पाठिंबा मिळेल का, हाही प्रश्नच आहे. पीक विमायोजना अमलात आणण्यात काही नैतिक जोखीमही आहे. विमा उतरणारा शेतकरी विम्याचा फायदा मिळविण्याच्या एकमेक दृष्टीने शेतीची अकार्यक्षम पद्धत अवलंबण्याची अगर नापिकीच्या काठावर असलेल्या जमिनीची लागवड वाढविण्याची शक्यता आहे, तिकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. ह्या नैतिक जोखमीचा विचार करताना अधिकारावर असणाऱ्या राजकीय पक्षाची व राज्यकारभार यंत्रणेची नैतिक वागणूक काय दर्जाची आहे, ह्याचीही दखल घेणे अपरिहार्य आहे. पीक विमायोजना सुरू करण्यासाठी जागोजागी हिंडून काम करणारा मोठा नोकरवर्ग तयार करावा लागेल. त्याचप्रमाणे विम्याचे दर, नुकसानीचे मोजमाप करण्याची पद्धत, रिझर्व्ह फंड, इत्यादींचा विचार करावा लागेल. पण त्या सर्व तांत्रिक बाबी आहेत. ह्या सर्वापेक्षा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. पीक विमायोजनेचे हिशेब कोठल्या चलनात ठेवावयाचे? सर्व व्यवहारांचा हिशेब ऐनजिनसी मालाच्या घटकात म्हणजे धान्य, तंबाखूची पाने, गळिताची धान्ये, इत्यादीत ठेवावयाचा की नेहमीसारखा रुपयांत ठेवावयाचा?

पीक विमायोजना काही निवडक ठिकाणी प्रयोग म्हणून सुरू करण्यात यावी असे सुचविण्यात येते. अशा प्रयोगांची व्याप्ती आणि हेतू ह्यांच्याविषयी अधिक विचार होणे इष्ट आहे. औषधांचे उत्पादन करण्यासाठी खास प्रयोगशाळा असतात. ह्या प्रयोगशाळांतून एखादे औषध सिद्ध झाले की त्याचे व्यापारी तत्त्वावर उत्पादन सुरू करता येणे शक्य असते. कारण रसायनशास्त्र हे प्रयोगसिद्ध शास्त्र आहे. पण प्रयोगसिद्ध नसलेल्या शास्त्रावर आधारलेल्या इतर प्रायोगिक योजनात असे करता येत नाही. कारण, त्यात एका प्रायोगिक योजनेवरून दुसऱ्या योजनेच्या यशापयशाबद्दल अगर निष्कर्षाबद्दल निश्चित अनुमान काढता येत नाही. तात्पर्य काय, पीक विमायोजनेचा प्रश्न घोषणा देण्याइतका सोपा नाही. प्रे. रूझवेल्ट ह्यांनी पीक विमायोजनेचा प्रसार व प्रचार करण्यास प्रारंभ केला तेव्हा एका वृत्तपत्राने त्यासंबंधी दिलेला इशारा लक्षात ठेवण्यासारखा आहे. तो असा: "पीकविमायोजनेच्या साऱ्याकडे अलीकडे लोकांचे लक्ष खिळून राहिले आहे. शेतीच्या अर्थशास्त्रज्ञात व इतरांत त्यावर चर्चा चालू आहे. पण ह्या साऱ्याकडे पाहून मागे आक्रमण्याइतका तो तेजस्वी आहे की नाही ह्याबद्दल निश्चित सांगता येत नाही. योजनेत अनेक आकर्षक गुण आहेत ह्यात शंका नाही. तीपासून फायदा होण्याचीही शक्यता आहे. परंतु तिच्या मार्गात राजकीय, विमाविषयक गणिताचे आणि द्रव्यविषयक अनेक खाचखळगे आहेत, आणि ते चांगलेच खोल व फसवे आहेत."

भारतापुरता विचार करता, पीक विमायोजना अमलात आणण्यास योग्य वेळ अद्याप आलेली नाही असेच म्हणावे लागते. दरम्यान, प्रत्येक शेतकऱ्याने शेतीची चांगली पद्धत स्वीकारावी आणि स्वतःचे संभाव्य नुकसान भरून काढण्याची व्यवस्था करावी. ह्या कामी त्याला सरकारच्या शेतीविषयक संघटनांनी मार्गदर्शन करावे आणि मदत करावी. ह्या पद्धतीनेच उत्पादन वाढविणे इष्ट आहे. सध्या तरी हाच मार्ग कमी खर्चाचा व अधिक फायद्याचा आहे.

---

## गिऱ्हाइकाचे महत्त्व

बँकेत केव्हाहि येणाऱ्यात गिऱ्हाइक सर्वांत महत्त्वाचा माणूस होय; तो स्वतः येवो फोन करो वा पत्र पाठवो, तो तुमच्यावर अवलंबून नसून तुम्ही त्याच्यावर अवलंबून आहा.

तो तुमच्या कामात व्यत्यय आणणारा नसून तुमच्या कार्याचे तो उद्दिष्टच आहे. त्याचे काम करून तुम्ही त्याला मदत करीत असला, तरी तसे करण्याची तुम्हांस संधि देऊन तोही तुमच्यावर एक प्रकारे कृपाच करीत असतो.

तो तुमच्या व्यवसायात उपरा नसून तो त्या व्यवसायाचा भागच आहे.

तो हाडामासाच्या रक्ताचा मानव आहे; त्यालाहि भावना असतात; तुमच्यासारखेच समज-गैरसमज असतात. त्याच्यावर शाब्दिक मात करण्याचा प्रयत्न करू नका.

गिऱ्हाइक तुम्हांला त्याच्या गरजा सांगतो, त्याच्या आणि तुमच्या हिताच्या दृष्टीने त्यावर उपाय योजा. त्याचे समाधान घडवून आणणे हेच तुमचे एकमेव उद्दिष्ट असू द्या.

ह्या सर्व गोष्टी ध्यानांत बाळगा. कुठल्याहि व्यवसायात गिऱ्हाइकाचे महत्त्व फार मोठे असते, हे कधीहि विसरू नका.

---

## पृ. ४८ वरील कोड्याचे उत्तर

कुलकर्णी हा मॅनेजर असून पाटील हा अकौंटंट आहे आणि कानडे हा कॅशिअर आहे. कसे, ते पाहा,

अकौंटंटला सर्वांत कमी पगार आहे. त्यामुळे तो कानडे असू शकणार नाही. तो कुलकर्णी असू शकणार नाही, कारण त्याला बहीणच नाही. म्हणजे तो पाटीलच असणार.

कानडेला मॅनेजरपेक्षा जास्त पगार मिळतो. म्हणजे तो मॅनेजर असणार नाही. अकौंटंटचे जागी पाटील आहे, हे आपण ओळखलेच आहे. तेव्हा तो फक्त कॅशिअरच असणार.

पाटील आणि कानडे हे अनुक्रमे अकौंटंट आणि कॅशिअर असल्यामुळे आपोआपच उरलेला कुलकर्णी मॅनेजरच असणार.

भारताला विपत्तीतून वैभवाकडे नेणारा एकच मार्ग—
सहकाराचा !!
दिवाळीचा खरा आनंद त्याच्या अवलंबनानेच मिळेल.

## दि जमखंडी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, जमखंडी

स्थापना : १९४० ] मुख्य कचेरी : जमखंडी [ शाखा : बनहट्टी

[ ३० जून १९६८ चे आकडे ]

| | | |
|---|---|---|
| * वसूल भाग भांडवल | रु. | २,०८,५८० |
| * गंगाजळी व इतर निधी | रु. | ४,७६,०४३ |
| * सर्व प्रकारच्या ठेवी | रु. | ३१,९१,१२० |
| * कर्जव्यवहारातील गुतवणूक | रु. | १६,९५,०६८ |
| * रोखे वगैरेतील गुंतवणूक | रु. | ६,८०,६६१ |
| * ठेवीवरील व्याजाचे दर | रु. | १ ते ७॥ टक्के |
| * डिव्हिडंड | रु. | ६१/४% |
| * ऑडिट वर्ग | | "अ" |

स्वतःच्या मालकीची ऑफीस—इमारत व गोडाऊन्स. सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

म. द. खाडिलकर, मॅनेजर — पा. म. बंगी, चेअरमन

हो दिवाळी आमचे हितचिंतकांस समृद्धीची जावो !

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. कराड

स्थापना : १९१७ — फोन नं. २४३

ऑडिट वर्ग सतत ३७ वर्षे 'अ'

| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | १,६१,६५० |
| रिझर्व्ह फंड | रु. | २,७७,६७७ |
| इतर फंडस् | रु. | ७,९७,४२५ |
| ठेवी | रु. | ८३,७२,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,०१,४४,७७५ |

♣ बँकिंगचे सर्वप्रकारचे व्यवहार केले जातात.
♣ ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर.
♣ अद्ययावत सेफ डिपॉझिटची सोय.

अधिक चौकशी बँकेचे कार्यालयात करावी.

शं. पु. कुलकर्णी, मॅनेजिंग डायरेक्टर — वि. कृ. तांबवेकर, चेअरमन

# दि कोल्हापूर शुगर मिल्स लि.

शुभ्र दाणेदार साखर

उत्कृष्ट प्रतीचे रेक्टिफाईड व डिनेचर्ड स्पिरिट

ॲबसोल्यूट अल्कोहोल

तसेच

ॲसेटिक ॲसिड

ब्युटेनॉल व

ब्युटाईल ॲसिटेट

यांचे उत्पादक.

मॅनेजिंग एजंटस् :

दि युनायटेड एजन्सीज प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर–३

# व्यापारी बँका व शेतीला कर्जपुरवठा

## ग्रामीण भागांत व्याप वाढविण्याची आवश्यकता

**बँकांवर सामाजिक नियंत्रण घातल्यामुळे त्यांना आपल्या कर्जपुरवठ्याच्या धोरणात बदल करावा लागत आहे. ह्या बाबतीत काही अडचणी असल्या तरी काही नवीन संधीही त्यांना प्राप्त झाल्या आहेत. ग्रामीण भागांतील लोकांतून ठेवी गोळा करून शेतीच्या विकासाला मदत करणे ग्रामीण जनतेच्या हाती खेळणाऱ्या पैशामुळे आता नव्याने शक्य झाले आहे. ह्या विषयासंबंधीचे स्थूल दिग्दर्शन.**

अलीकडेच दिल्ली येथे नॅशनल क्रेडिट कौन्सिलची बैठक भरली होती. देशातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने व्यापारी बँकांनी आपली धोरणे बदलावी आणि खेडेगावांतून बँकांच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात अशी सूचना बैठकीत करण्यात आली, आणि ती योग्य अशीच होती. व्यापारी बँकांनी शेतीला कर्जपुरवठा करण्यात स्वतःला अधिक प्रमाणात गुंतवून घ्यावे अशी सूचना संघटनेच्या स्थायी समितीने केली होती. तिलाच बैठकीत पाठिंबा व्यक्त करण्यात आला. बँकांनी सहकारी संस्थांनी चालविलेल्या कार्याला पूरक अशी कृती करावी; एवढेच नव्हे तर त्या कार्याला हातभार लावून बळकटी आणावी असेही आवाहन करण्यात आले. आतापर्यंत बँकांनी आपले कार्यक्षेत्र शहरी व निमशहरी भागांपुरते मर्यादित केले होते. त्या मुख्यतः उद्योगधंदे व व्यापारविषयक क्षेत्रालाच कर्जपुरवठा करीत असत. ग्रामीण भागांतील पैशातून बचत निर्माण करण्यासाठी फारसे प्रयत्न कधीच करण्यात आले नाहीत. त्याचप्रमाणे शेती आणि ग्रामीण विकासाला लागणारा पैसा पुरविण्याकडेही लक्ष देण्यात आले नाही.

बँकांवर सामाजिक नियंत्रण ठेवण्याचा नवा जमाना आता सुरू झाल्यामुळे मात्र परिस्थितीत बराच फरक पडला आहे. शेती व शेतीशी संबद्ध असलेले उद्योगधंदे ह्यांना पतीवर पैशाचा पुरवठा करून त्यांच्या गरजा भागविणे हे क्रेडिट कौन्सिलचे एक प्रमुख कार्य आहे. शेतीला पैसा पुरविण्याचे आव्हानच आता व्यापारी बँकांना देण्यात आले असून त्या ते यशस्वीपणे स्वीकारतील ह्यात शंका नाही. हे काम करण्यासाठी बँकांनी ॲग्रिकल्चरल फायनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना केली आहे. बी-बियाणे तयार करणारी शेते स्थापन करणे, शेतीचे यांत्रिकीकरण करणे, मालाच्या साठवणीसाठी गुदामे बांधणे, शेतीच्या मालाची वाहतूक करणे आणि शेतीच्या मालावर संस्करण करणाऱ्या धंद्यांचे आधुनिकीकरण घडवून आणणे, ह्या विविध कामांसाठी लागणारा पैसा कॉर्पोरेशन पुरविणार आहे. कॉर्पोरेशनचे भांडवल उभारण्यासाठी बँकांनी पैसा दिला आहे. त्याचप्रमाणे लँड मॉर्टगेज बँकांनी डिबेंचर्स खरेदी करण्यातही चांगला भाग घेतला आहे. शिवाय बऱ्याच बँकांनी शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी स्वतःची स्वतंत्र खातीही उघडली आहेत. काही राज्यांतील ग्रामीण वीजपुरवठा योजनांना पुष्कळ बँकांनी भरपूर साह्य दिलेले आहे आणि राज्य सरकारांच्या सहकार्याने शेतीच्या विकासाच्या खास योजनाही आखल्या आहेत. शेतीला कर्जपुरवठा करण्याची गरज फार मोठी आहे. १९७०-७१ सालात ह्यासाठी २,३०० कोटी रुपयांची जरुरी लागणार आहे. त्यापैकी १,२५० कोटी रुपये अल्प मुदतीने, ५०० कोटी रुपये मध्यम मुदतीने आणि ५५० कोटी रुपये दीर्घ मुदतीने लागणार आहेत. एकूण बेरजेपैकी ५० कोटी कृषिउद्योग कॉर्पोरेशन्सकडून, १२५ कोटी ॲग्रिकल्चरल फायनॉन्स कॉर्पोरेशनकडून आणि ५२५ कोटी सहकारी संघटनांकडून मिळतील अशी अपेक्षा आहे. ही ७०० कोटी रुपयांची रक्कम सोडून आणखी १,६०० कोटी रुपयांची गरज आहे. ह्या गरजेपैकी किती हिश्श्याची जबाबदारी व्यापारी बँका उचलू शकतील, हे दिसून यावयाचे आहे.

बँकांनी काही निवडक शेतीच्या प्रकल्पांना साह्य देण्याचे ठरवावे; किंवा काही विवक्षित भागाचा विकास घडवून आणण्याच्या योजनांची द्रव्यविषयक जबाबदारी उचलावी, त्याशिवाय, शेतीच्या व्यवसायाशी निगडित असणारे कामधंदे, कृषिउद्योग संघटना, यंत्रचलित नांगरांचे उत्पादन व वितरण, इत्यादी उपक्रमांना आर्थिक मदत करावी. बी-बियाणांची निर्मिती करणाऱ्या शेतवाड्या, मळे, फळबागा आणि दूधदुभत्यांचे गौळवाडे ह्यांनाही मदत करावी. शेतीच्या विकासासाठी हुकमी पाणीपुरवठ्याची अतिशय गरज असते. शेतजमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठी विजेचे पंप आणि मोटर्स लागतात. ही साधने विकत घेण्यासाठी शेतकऱ्यांना मदत देण्याचे काम बँका करू शकतील. ह्या विषयासंबंधी दिल्ली येथील इन्स्टिटयूट ऑफ इकॉनॉमिक ग्रोथ ह्या संघटनेतील प्राध्यापक श्री. ए. एम्. खुस्रो ह्यांनी उपयुक्त सूचना केली आहे. ते म्हणतात की बँका व त्यांचा नोकरवर्ग ह्यांनी स्वतःला कर्ज देणाऱ्या संस्थांपेक्षा शेतीला मदत करणारे कार्यकर्ते असे मानावे. कोणत्या भागात कोणती पिके घ्यावीत, पिकात फेरबदल कसा करावा, खते व इतर साधने कशी व किती वापरावी, ह्या बाबतीतही त्यांनी खास लक्ष घातले पाहिजे. त्याचप्रमाणे दिलेल्या पैशाच्या वापरावर आणि खत वगैरेच्या वापरावर नजर ठेवण्याचे कामही त्यांनी केले पाहिजे, उभ्या



## "लक्ष्मीची पाउलें"

उंबरठ्यावर माप ठेविले. मी पायाने उलटुनि आले

गृहलक्ष्मीच्या मंगल आगमनाबरोबर अनेक जबाबदाऱ्याही तुमच्यावर आल्या आहेत. त्या व्यवस्थित पार पाडण्यास पैसे हवेत.
परंतु ते थोडेच झाडाला लागतात ? छे, ते तर सांठवावे लागतात.
त्याकरितां आजच महाराष्ट्र बँकेत बचत खाते उघडा.


आपली जिव्हाळ्याची बँक.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.





आपल्या दीपावलीच्या गोड फराळात
आमचीही ' एक चमचाभर साखर ' असेल.
या गोड प्रतीकाने आम्ही आपले अभीष्ट चिंतितो.



# दि उगार शुगर वर्क्स लि:

मॅनेजिंग एजंटस्—मे. शिरगांवकर ब्रदर्स
फोन नं. —फॅक्टरी : सांगली १८७
—रजि. ऑफिस : सांगली १९१
तारेचा पत्ता —' उगार शुगर ' उगार खुर्द

पिकांवर व उत्पादित मालाच्या तारणावर कर्ज देण्याचा विचारही त्यांनी केला पाहिजे. व्यापारी बँकांकडून मिळणारे कर्ज तारणाचा विचार करून देण्याची परंपरा आहे ह्यात शंका नाही. परंतु शेतीला कर्जपुरवठा करताना खुद्द शेतकऱ्यांपेक्षा अधिक चांगले तारण बँकांना कोठले मिळणार, असा विचार बँकांनी केला पाहिजे.

ह्या बाबतीत युनायटेड कमर्शिअल बँकेचे अध्यक्ष श्री. आर. टी. शहा, ह्यांचे उद्‌गार लक्षात घेण्यासारखे आहेत. ते म्हणतात की जाणकार व कामसू, नवीन कल्पना ग्रहण करणारा, आधुनिक मशागत पद्धतीचा वापर करणारा आणि मागणी करत असलेल्या कर्जाशी स्वतःच्या भांडवलाचे प्रमाण योग्य असेच आहे हे जाणणारा शेतकरीच हिंदी शेतीची उत्पादनक्षमता वाढविण्यास समर्थ आहे. अर्थात् त्याची जमीन कसण्यास योग्य अशी असली पाहिजे. अशा शेतकऱ्याला बँकांनी मदत केलीच पाहिजे. असे असले तरी कर्जाची काही प्रमाणात शाश्वती आणि द्रव्यसाह्याच्या योजना निवडताना दक्षता घेणे ह्यांच्याकडे दुर्लक्ष करून भागणार नाही. शेतकऱ्यांजवळ जमिनीच्या मालकीचे योग्य ते दस्तऐवजच नसतील तर त्यांना मोठी मदत करणे बँकांना अवघड जाईल. शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीची नोंद करणारे पासबुक त्यांना देण्यात आले तर ही अडचण दूर करता येईल. अशा प्रकारची एक योजना राजस्थान सरकारने आखली आहे. निरनिराळ्या राज्यांतील जमीन धारणा कायद्यात फार मोठे फरक आहेत ही दुसरी एक अडचण आहे. जमीन धारणा कायद्यात अधिक एकसूत्रता व संवादित्व असेल तर शेतकऱ्यांना कर्जे देण्याच्या बाबतीत बँकांना एकाच प्रकारचे नियम करणे अधिक सोपे जाईल. दरम्यान, शेतकऱ्यांना आपल्या व्यवसायातील कामकाजाची व्यवस्थित नोंद करता यावी म्हणून शिकवण्याची जरूर आहे. हे काम बँकांच्या फिरत्या अधिकाऱ्यांनी त्यांना शिकविले पाहिजे. त्याचप्रमाणे बँकांकडून मिळालेल्या पैशाचा योग्य उपयोग केला जातो की नाही ह्यावरही त्यांनी नजर ठेवली पाहिजे.

देशातील बँकांनी शेतीच्या व्यवसायाला भरीव मदत केली पाहिजे ही गोष्ट खरी. पण अशी मदत करण्यापूर्वी काही बाबतीत अनुकूल वातावरण निर्माण करण्यात आले पाहिजे. तरच बँकांना अशी मदत करण्यात सहभागी होता येईल. काही सरकारी धोरणांचा फेरविचार करण्यात आला पाहिजे. त्याचप्रमाणे काही कायद्यांत बदल झाला पाहिजे; आणि मुख्य म्हणजे बँकांपुढील प्रश्नांबाबत सरकारी गटाने अधिक सहानुभूतीची व समजुतीची दृष्टी ठेवली पाहिजे. उदाहरणार्थ, छोट्या शहरांतून अगर खेडेगावांतून काम करणाऱ्या बँकांच्या शाखांचा प्रश्न घ्या. बँकांच्या ज्या शाखा १० हजार वस्तीपेक्षा कमी वस्ती असलेल्या ठिकाणी असतील, त्यांच्यावर कारभार चालविताना वाजवीपेक्षा अधिक खर्चाचा बोजा टाकण्यात येऊ नये. शिवाय कामाचा दर्जा आणि त्याची परिस्थिती ह्या बाबतीत मोठी गावे व शहर ह्यांना लागू असणार नियम छोट्या गावांतून लावता येणार नाहीत. स्थलभेदाप्रमाणे योग्य तो फरक करण्यास परवानगी असली पाहिजे. अशा दावींचा आणि सुरक्षिततेचा विचार करण्यात आला पाहिजे. त्याचप्रमाणे पैसे पाठविण्यातील अडीअडचणींकडेही लक्ष देण्यात आले पाहिजे. त्यासाठी बँक अवार्ड आणि दुकानांच्या व व्यापारी कचेऱ्यांच्या कायद्यात फेरफार करावा लागेल.

शेतीला कर्जपुरवठा करण्याच्या कामी बँका कुठवर जाऊ शकतील हे अर्थातच त्यांच्याजवळ असणाऱ्या पैशावर अवलंबून राहील. ग्रामीण भागांतून बँकांनी ठेवी गोळा करण्याची आवश्यकता फार आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे आणि रोखीच्या पिकात वाढ झाल्यामुळे ग्रामीण भागांतील लोकांची उत्पन्ने अलीकडे खूपच वृद्धी पावलेली आहेत. शेतीत अधिकाधिक पैसा गुंतविण्यावर भर देण्यात येत आहे. परिणामी, ग्रामीण भागांतील लोकांची उत्पन्ने वाढण्याची शक्यता बळावत चालली आहे. ही परिस्थिती आणि शेतकऱ्यांवर कर लादण्याची सरकारची राजकीय नाखुषी लक्षात घेता ग्रामीण भागांतून ठेवीच्या रूपाने पैसा गोळा करण्याची फार चांगली संधी बँकांना प्राप्त झाली आहे, म्हणून बँकांनी ग्रामीण भागांत आपल्या व्यवहाराचा विस्तार करण्याचे जोराचे प्रयत्न केले पाहिजेत व अधिकाधिक शाखा उघडल्या पाहिजेत. त्याचबरोबर बँकिंगच्या सोयीसवलतीत सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. खेडेगावांतील लोकांत बँकांच्या मार्फत व्यवहार करण्याची सवय वाढावी म्हणून कसोशीने खटपट करण्यात आली पाहिजे. ग्रामीण भागातील पैसा बचतीच्या रूपाने एकत्र करावयाचा असेल आणि शेतीचा विकास साधावयाचा असेल तर बँकांतील नोकरवर्गाला शिक्षण देऊन तयार करणे अतिशय अगत्याचे आहे. ते काम बँकांनी हाती घेतले पाहिजे. ग्रामीण भागात बँकांचे काम करताना काही नवीन आणि विशेष तंत्र वापरावे लागते. ह्या तंत्रातील व्यवहारकुशलता बँकांच्या नोकरांना परिचित असली पाहिजे. बँकांच्या चालकांनी ह्या कामाकडे तळमळीने व आस्थेने लक्ष पुरविले पाहिजे.

---

## टेलिफोनची आजची मागणी पुरी होण्यास १० वर्षे

मुंबईत १·१० लक्ष टेलिफोन बसविण्यात आले आहेत आणि ५६,००० टेलिफोन्सची मागणी नोंदलेली आहे. ती पुरी होण्यास १० वर्षे लागतील.

---

## आफ्रिकी तरुणीचा उमरावांच्या बालेकिल्ल्यात प्रवेश

लॉर्ड हॅनवर्थ ह्यांचा वारस पुत्र स्टीफन पोलॉक ह्यांचा ऱ्होडेशियामधील कृष्णवर्णीय एलिझाबेथ वेंब ह्या तरुणीशी लवकरच विवाह होणार आहे. त्यामुळे परंपराप्रिय उमरावांच्या बालेकिल्ल्यात एका अस्सल आफ्रिकीला प्रवेश मिळणार आहे. वधू-वर विद्यार्थीदशेत असून वांशिक ऐक्याचे पुरस्कर्ते आहेत.

शेकडो शेतकऱ्यांनी वापरून अत्युत्कृष्ट असल्याचा अनुभव घेतलेला आहे. म्हणूनच बहुसंख्य शेतकरी

♣ ♣ ♣

## दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी, जि. कोल्हापूर

निर्मित

# पैसाफंड मिश्रखत

सर्व पिकांकरिता वापरणे पसंत करतात. आपण एकवेळ अनुभव घेतल्यास कमी पैशांत भरपूर मोबदला मिळाल्याचे समाधान आपणासही लाभेल.

खात्री करून घ्या.

आ. बा. नाईक
मॅनेजिंग डायरेक्टर

एल. वाय. पाटील
चेअरमन

दि पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि., हुपरी.

# सरदारगृह

**मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.**

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

॥ श्री शिवशक २९४–२९५ ॥

## दि कोल्हापूर मराठा को. ऑप. बँक लि., कोल्हापूर.

स्थापना : १९१३ ] 'अ' वर्ग [ फोन : ७१३


| | | |
|---|---|---|
| भाग भांडवल | रु. | २,००,००० |
| वसूल भाग भांडवल | रु. | २,००,००० |
| गंगाजळी | रु. | १,१६,१३९ |
| इतर निधी | रु. | ६८,३६८ |
| खेळते भांडवल | रु. | २०,७३,२३५ |
| एकूण व्यवहार | रु. | १,०५,५८,४२९ |

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतकांना ही दिपावली व नूतन वर्ष सुखसमृद्धीचे व भरभराटीचे जावो.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

*Make doubly sure by fitting*



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

सखोल अभ्यास असलेले व अनेक प्राविण्यपत्रे मिळवीलेले

सायनाचार्य **श्री. गो. जोशी**

भेटा :—कानडा मारुती, नाशिक.

# शास्त्रीय विषयांच्या नियतकालिकांची अल्प संख्या

## मराठीचा पाचवा क्रमांक

उत्पादनाच्या आधुनिक तंत्रांचा पाया म्हणजे शास्त्रीय ज्ञान. भारतात शास्त्रीय विषयांना वाहिलेल्या नियतकालिकांची संख्या इतकी थोडी आहे की शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करण्याच्या कामी ती फार मोठी अडचण होऊन बसली आहे. त्यातही देशी भाषांपेक्षा इंग्रजीतील नियतकालिकेच आघाडीवर आहेत.

दिल्ली येथे ऑगस्टच्या ९ तारखेपासून शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाचा विकासाच्या कामात होणाऱ्या व्यावहारिक उपयोगासंबंधी एक आंतरराष्ट्रीय परिषद् भरविण्यात आली होती. ह्या परिषदेला २५ देशांचे प्रतिनिधी आलेले होते. त्यातही आशिआतील देशांच्या प्रतिनिधींची संख्या अधिक होती. परिषदेचे संक्षिप्त नाव 'कॅस्टेशिआ' असे होते. 'कॉन्फरन्स ऑन दि अॅप्लिकेशन ऑफ सायन्स अँड टेक्नॉलजी टु डेव्हलपमेंट' असे तिचे पूर्ण नाव आहे. परिषदेने अनेक शिफारसी केलेल्या आहेत. परंतु त्या सर्वांत आशिआतील देशांत शास्त्रीय ज्ञानाचा लोकांत प्रसार करून त्याची गोडी लावण्यासंबंधी केलेली शिफारस विशेष महत्त्वाची मानावी लागेल. शास्त्रीय विषयांचे ज्ञान लोकप्रिय करण्याच्या आणि त्याच्या महत्त्वाची जाणीव लोकांत उत्पन्न करण्याच्या कामी शास्त्रीय विषयांना वाहिलेल्या नियतकालिकांना अर्थपूर्ण स्थान द्यावे लागते. पण भारतात अशा नियतकालिकांची संख्या फारच थोडी आहे. १९६७ सालाच्या प्रारंभी देशात प्रसिद्ध होत असलेल्या एकूण नियतकालिकांच्या संख्येपैकी अशा नियतकालिकांची संख्या १० टक्क्यांपेक्षाही कमी होती. शास्त्रीय आणि तांत्रिक विषयांत मुख्यतः वैद्यकीय, आरोग्य, शेती, पशुसंवर्धन, एंजिनिअरिंग, इत्यादी विषयांचा समावेश होता. खपाच्या दृष्टीने विचार करता, शास्त्रीय व तांत्रिक विषयासंबंधीच्या नियतकालिकांचा खप एकूण खपाच्या अवघा ७·५ टक्के होता. वृत्तपत्रांच्या नोंदणी अधिकाऱ्याकडे नोंद झालेल्या वृत्तपत्रांची एकूण संख्या ७,६३३ होती. त्यांपैकी एकतृतियांश वृत्तपत्रे बातम्या देणारी आणि चालू घडामोडींची माहिती देणारी होती. त्यांच्या नंतरचे मोठे गट म्हणजे साहित्यिक व सांस्कृतिक नियतकालिकांचा एक, आणि धार्मिक व तत्त्वज्ञानविषयक नियतकालिकांचा दुसरा. पहिल्या गटाची टक्केवारी १७ व दुसऱ्या गटाची १२·५ अशी आहे. इतर कोणत्याही प्रकारच्या नियतकालिकांची एकूण खपाशी टक्केवारी ५% पेक्षा अधिक नव्हती.

शास्त्रीय विषयांच्या नियतकालिकांत वैद्यक व आरोग्य ह्या विषयांवरील नियतकालिके सर्वांत अधिक म्हणजे ४ टक्के होती. शेती आणि पशुसंवर्धन ह्या विषयांवरील नियतकालिकांची टक्केवारी २% होती. एंजिनिअरिंग व तंत्रशास्त्रविषयक प्रकाशनांची टक्केवारीही तितकीच होती. सर्वसामान्य शास्त्रीय विषयांवरील प्रकाशनांची टक्केवारी अवघी १% होती. प्रत्येक नियतकालिकाचे सरासरी वाचक २,३००; होते. सर्वांत जास्त वाचकांची सरासरी अशी होती. मुलांची नियतकालिके: ६,७००; चित्रपट विषयक: ५,६००; स्त्रियांविषयींची नियतकालिके: ४,४०० आणि साहित्यिक व सांस्कृतिक स्वरूपाची: ३,२००; शेती व पशुसंवर्धन ह्या विषयांच्या नियतकालिकांच्या सरासरी वाचकांची संख्या २,३०० होती; तर वैद्यक, आरोग्य, एंजिनिअरिंग व तांत्रिक विषयांच्या वाचकांची सरासरी संख्या प्रत्येकी २ हजार होती. नुसत्या शास्त्रीय विषयांच्या नियतकालिकांच्या वाचकांची सरासरी अवघी १ हजार होती. एकूण नियतकालिकांपैकी ५० टक्के नियतकालिके इंग्रजीतून प्रसिद्ध करण्यात येत होती. हिंदी नियतकालिकांच्या प्रकाशनांची टक्केवारी अवघी ०·१० होती. बंगाली, तामीळ, उर्दू आणि मराठी ह्या भाषेतील शास्त्रीय नियतकालिकांची संख्या प्रत्येकी २० होती आणि गुजराती, मल्ल्याळम व तेलगू भाषेतील संख्या प्रत्येकी १३ होती. इंग्रजी भाषेत प्रसिद्ध होणाऱ्या बऱ्याच नियतकालिकांतून संशोधनातून काढण्यात आलेले निष्कर्ष प्रकाशित करण्यात येत होते. 'विज्ञान परिषद् अनुसंधान पत्रिका' ह्या एकाच देशी भाषेतील प्रकाशनात असे संशोधनात्मक निष्कर्ष प्रसिद्ध केले जात होते.

तामीळ भाषेतील नियतकालिकांत शास्त्रीय व अनुषंगिक विषयावरील नियतकालिकांचे प्रमाण इतर भाषांच्या मानाने सर्वांत अधिक म्हणजे ६·५ टक्के होते. त्यानंतर मल्ल्याळम भाषेतील हे प्रमाण ६ टक्के होते. इतर काही भाषांतील ही टक्केवारी अशी होती. मराठी ५·२ टक्के; तेलगू ५ टक्के; कानडी ४·९ टक्के; गुजराती ४·७ टक्के; बंगाली ४·३ टक्के; पंजाबी ४·२ टक्के आणि हिंदी ४ टक्के. मल्ल्याळम भाषेतील शास्त्रीय विषयांच्या नियतकालिकांचा सरासरी खप सर्वांत अधिक म्हणजे ४ हजार होता. त्यानंतर २ हजारांपेक्षा अधिक सरासरी खप असणारी नियतकालिके तामीळ व हिंदी भाषेतील होती; सरासरी खप प्रत्येकी २,७००. इंग्रजी व उर्दू मासिकांचा सरासरी खप अनुक्रमे २,५०० व २,१०० होता. मराठी व गुजराती भाषेतील शास्त्रीय मासिकांचा सरासरी खप प्रत्येकी १,६०० होता; इतर भाषेतील सरासरी खप हजाराच्या आसपास होता.

'कॅपसुल' ह्या इंग्रजी भाषेतील वैद्यकीय मासिकाचा खप सर्वांत जास्त म्हणजे ८० हजार होता. 'सायन्स टुडे' ह्या लोकप्रिय मासिकाचा खप १९६७ च्या आरंभी ४० हजार होता. शेतीविषयक मासिकात 'इन्टेन्सिव्ह अॅग्रिकल्चर'

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — : विभागीय कचेरी :

९, बेंक हाउस लेन, फोर्ट, मुंबई. — महाल नागपूर.

दूरध्वनी :– २५९८१४, २५९९९७, २५०१८९, २६९६६७

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले मांडवल व गंगाजळी फंड | ... | रु. ११,९८,८४,००० |
| ठेवी | ... | रु. ६३,१८,९३,००० |
| खेळते मांडवल | ... | रु. १,१३,२३,७१,००० |

: बृहन् मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगाव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्ले (पूर्व) (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम)

: नागपूर विभागातील शाखा :

(१) सिताबर्डी (२) धरमपेठ (३) धन्तोली (४) सदर बझार.

ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरी वर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे, सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. वसंतराव पाटील, चेअरमन

डॉ. वा. सु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. — श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



आमचे असंख्य ग्राहक व हितचिंतक ठेवीदार व सभासद यांना ही दिवाळी व आगामी वर्ष सुखाचे व समृद्धीचे जावो

# दि आष्टा अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

आष्टा, जिल्हा सांगली

र. नं. ९५१८ — ऑडिट वर्ग अ — स्थापना २०-१-१९४७

तारीख २०-९-१९६८ ची अर्थ व्यवस्था

| | | |
|---|---|---|
| १. वसूल भाग भांडवल | रु. | २,१२,८३० |
| २. निधी | रु. | १,३८,००० |
| ३. ठेवी | रु. | १३,१४,००० |
| ४. खेळते भांडवल | रु. | १७,६६,००० |
| ५. गुंतवणूक | रु. | १,५५,००० |
| ६. जागा व इमारत | रु. | १,१०,००० |
| ७. कर्जे | रु. | ९,९८,०००० |
| ८. ३०-६-१९६८ चा नफा | रु. | ४१,५०० |

ग्रामीण भागात सन १९४७ साली स्थापन झालेली व सन १९६४ मध्ये स्वतःची वास्तू असलेली वाळवा तालुक्यांतील अग्रेसर बँक. या बँकेत आकर्षक व्याजाचे दराने ठेवी स्वीकारल्या जातात. सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार केले जातात. आणि लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशनचे सर्व प्रकारचे हप्ते स्वीकारले जातात.

बाळातात्या चौगुले, चेअरमन

शंकर महादेव पाटील, मॅनेजर — एन्. ए. रुकडे, मॅनेजिंग डायरेक्टर



शहराचं बाह्य सौंदर्य समृद्ध फळाफुलांच्या बगीचांनी वाढतं,
पण शहराच्या अंतर्गत सौंदर्याला गरज असते, समृद्ध आरोग्याची !
आणि त्यासाठी आवश्यकता आहे, भरपूर पाणीपुरवठ्याची, उत्तम ड्रेनेज व्यवस्थेची !!

♣ ♣ ♣

पाण्याच्या पाईप लाईन्स, ड्रेनेज लाईन्स आणि खोदकाम ही आमची स्पेशॅलिटी आहे. अशा सुव्यवस्थित आणि भक्कम कामांसाठी आम्ही मशहूर आहोत.

## एस्. के. कुसाळकर,

गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर.

शिवाजीनगर, वडार कॉलनी, कॉर्पोरेशन चाळ, रुम नं. १९६, पुणे १६.

ह्या मासिकाच ४० हजार वर्गणीदार होते. एंजिनिअरिंग आणि तंत्रशास्त्र ह्या विषयांवरील कोठल्याही नियतकालिकाचा खप १९६६ मध्ये ३ हजारांपेक्षा केव्हाही अधिक नव्हता. शास्त्रीय विषयांवरील नियतकालिकांपैकी निम्मी मासिक स्वरूपांत निघत असत. एक चतुर्थांश नियतकालिके तिमाही होती. शास्त्रीय विषयांवरील साप्ताहिकांचा सरासरी खप सर्वात जास्त म्हणजे ६ हजार होता. शास्त्रीय विषयांवरील सर्व म्हणजे १० साप्ताहिके शेती आणि पशुसंवर्धन ह्या विषयांना वाहिलेली होती. शास्त्रीय मासिके आणि पाक्षिके ह्यांचा सरासरी खप २,२०० इतका होता. अशी नियतकालिके कमी अंतराने प्रसिद्ध होऊ लागल्यास त्यांचा खप पडतो असे दिसते. तिमाही नियतकालिकांचा सरासरी खप १,३०० पेक्षाही कमी होता.

बहुतेक भारतीय भाषांतून वैद्यक आणि आरोग्य ह्या विषयांवरील शास्त्रीय नियतकालिके अधिक संख्येने दिसून आली. मराठी, मल्याळम आणि कानडी ह्या भाषांतून शेती आणि पशुसंवर्धन ह्या क्षेत्रांतील नियतकालिके इतर क्षेत्रांतील नियतकालिकांपेक्षा अधिक दिसून आली. बऱ्याच भारतीय भाषांतून शास्त्रीय विषयाची गोडी लावण्यासाठी अगर तांत्रिक विषयांची माहिती देण्यासाठी एकही नियतकालिक नाही. शास्त्रीय विषयांच्या नियतकालिकांचा जास्तीत जास्त सरासरी खप २ हजारांपेक्षाही कमी आहे. मल्याळम भाषेतील हा सरासरी खप ४ हजार इतका आहे. केवळ शास्त्रीय विषयांना वाहिलेली नियतकालिके सोडली तर काही साहित्यिक आणि सांस्कृतिक नियतकालिके शास्त्रीय विषयांवरील सोपे सोपे लेख प्रसिद्ध करीत असतात. मल्याळम भाषेत निघणारे 'सचित्र मातृभूमि' हे साप्ताहिक विशेष उल्लेखनीय आहे. 'धर्मयुग' आणि 'हिंदुस्थान' ही हिंदी भाषेतील साप्ताहिकेही शास्त्रीय विषयांवर अधिक भर देऊ लागली आहेत. भारतीय भाषांत शास्त्रीय विषयांची लोकप्रियता वाढविण्याची गरज अगदी उघड आहे. भारतीय भाषांतून शास्त्रीय विषयांवर लिखाण करणाऱ्या लेखकांनी ह्या दृष्टीने संघटित प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. खाली दिलेल्या कोष्टकातून शास्त्रीय नियतकालिकांविषयीची आकडेवार माहिती ग्रथित केली आहे.

निरनिराळ्या भाषांमधून निघणारी शास्त्रीय नियतकालिके

| भाषा | शास्त्रीय नियतकालिकांची संख्या | एकूण नियतकालिकांची संख्या | एकूण संख्येशी टक्केवारी% |
|---|---|---|---|
| इंग्लिश | ३१३ | १,७७० | १७.७ |
| हिंदी | ७० | १,७३८ | ४.० |
| बंगाली | २३ | ५३३ | ४.३ |
| तामीळ | २३ | ३५४ | ६.५ |
| उर्दू | २२ | ६९५ | ३.२ |


संपतस् इंजिनिअरिंग सर्व्हिसेस
— इंडस्ट्रिअल इस्टेट, सांगली —

तार : शुगरकेमि. टेलि. ऑफिस : ७८७. निवास : ७८४

खालील इंजिनिअरिंग मालासाठी आमची आठवण ठेवा :—

साखर, पेपर, पल्प आणि रासायनिक कारखान्यासाठी इंडस्ट्रिअल कन्व्हेअर चेन्स.

साखर मशिनरीचे सुटे भाग, ट्रॅश प्लेट्स, वॉशर्स, पिन्स, बुशिंग्ज, वेइंग ब्रिजेससाठी नाइफ एजेस, कपलिंगज्, कप्लिंग बोल्ट्स, पुलिंग्ज व बेअरिंग्ज काढण्यासाठी युनिव्हर्सल अॅडजेस्टेबल पुलर्स, गिअर्स आणि बेअरिंग्ज्–३", ६", ९", १२", १८" साईज्.

आम्ही वरील उत्पादन करतो; त्याचप्रमाणे मशीन जॉब्स, प्रेस जॉब्स, एम्बॉसिंग, इत्यादी कामे काटेकोर बजावतो.



शास्त्रज्ञ डॉ. प्रफुल्लचंद्र राय यांनी सर्टिफिकेट दिलेले रुचकर आणि स्वादिष्ट



मुखशुद्धीसाठी

चमन

चिमूटभर तोंडात टाकताच मुख सुगंधमय होते.

बाटली किंमत रु. १.२५

याच्या सेवनाने तहान भागून आवाज सुलतो; करिता वक्ते, गवई, नटनटी, वगैरे लोकांना अत्यंत उपयोगी आहे. चमन तोंडात टाकताच लाळेबरोबर मिश्र होऊन श्वास सुगंधित होतो. लहान-थोरांस, तसेच गरोदर स्त्रियांनाही उपयुक्त.

इंग्लिश औषधे आणि अत्तरे बनविणार

स्टार कंपनी, बेळगाव

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर

फोन : ऑफिस— ३६०२ नारेचा पत्ता : ' उद्योगबँक '
मॅनेजर— ४४३१ स्थापना : सन १९४९
पोस्ट बॉक्स नं.— १४०

**मुख्य कचेरी :** २९–३०, रविवार पेठ, सोलापूर

**शाखा :** (१) नाथ चौक, पंढरपूर, फोन नं. ११०
(२) सदर बझार, सोलापूर. फोन नं. २५५१

**३०-९-१९६८ ची आर्थिक परिस्थिती.**

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ७५,००,००० |
| खपलेले भांडवल | रु. | ४३,२२,००० |
| राखीव व इतर निधी | रु. | १२,४२,००० |
| ठेवी | रु. | ३१,४१,००० |
| गुंतवणूक | रु. | १३,८५,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,२१,१५,००० |

आपल्या शाखांनिशी विणकर सहकारी संस्था व औद्योगिक संस्था यांच्या सेवेत सदैव सिद्ध

**सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय.**

रा. आ. कुलकर्णी बी. ए. — मॅनेजर
गंगाधरपंत सि. कुचन — चेअरमन

**भारतातील सर्व प्रथम स्थापित व महाराष्ट्रातील**
**– एकमेव औद्योगिक सहकारी बँक –**

## सोलापूर नागरी औद्योगिक सहकारी बँक नियमित

५२, साखर पेठ, सोलापूर-२

स्थापना १९६५ ] [ फोन नं ४३२२
[ तार नागरीबँक

| | | |
|---|---|---|
| वसूल भाग भांडवल | रु. | २,१०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५९,४४३ |
| ठेवी | रु. | ७,८२,०३५ |
| एकूण खेळते भांडवल | रु. | २१,९८,०४३ |

( १ ) चालू ठेव द. सा. द शे. १%
( २ ) सेव्हिंज बँक ठेव द. सा. द. शे. ४%
( ३ ) संक्षेप ठेव द. सा. द. शे. ४½%
( ४ ) मुदत ठेवीवर आकर्षक व्याजाचे दर मुदतीप्रमाणे ५½% पासून ८%

आमच्या बँकेत लहान-मोठ्या ठेवी ठेवून छोट्या उद्योग-धंद्यांना सक्रिय पाठिंबा देण्यास मदत करा !

याशिवाय सर्व तऱ्हेची बँकिंगची कामे करण्यात येतात. जास्त माहितीसाठी चौकशी करा.

व्यं. रा. दंडी, — मॅनेजर
सि. म. आडप, — चेअरमन

## सोलापूर शहरातील नागरी सहकारी बँक
## दि लक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि. सोलापूर

( स्थापना ६–६–१९२९ )

**हेड ऑफीस** – ३६९ द. कसबा. फोन नं. ४३७४

**शाखा** – साखरपेठ, फोन नं. ३९४२ ( २ ) अक्कलकोट, ६३

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५,००,०००-०० |
| वसूल भांडवल | रु. | २,३३,२६०-०० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,४२,४३४-८९ |
| ठेवी | रु. | २८,८६,१३९-३० |
| एकूण खेळते भांडवल | रु. | ३४,११,९००-०० |

डिव्हिडंड सन १९६७–६८ सालाकरिता ७½ टक्के प्रमाणे.

**आकर्षक दराने ठेवी स्वीकारल्या जातात.**

सोने चांदीच्या जिनसांच्या, व्यापारी मालाच्या व मुदत ठेव व गव्हर्मेंट सिक्यु. तारणावर सभासदांना कर्जे देण्याची सोय केली आहे.

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

( १ ) श्री. सि. आ. अच्युगरळा ऑ. मॅ. डायरेक्टर, ( २ ) श्री. ग. रा. बाळी, ( ३ ) श्री. ग. रा. खडकीकर, ( ४ ) श्री. मा. ह. कोंतम, ( ५ ) श्री. कृ. गो. जानकर, ( ६ ) श्री. ना. वि. दुदगीकर, ( ७ ) श्री. सा. ह. साळुंके, ( ८ ) श्री. ति. बा. भोळा.

कृ. ल. सिद्धम, मॅनेजर. वा. द. आराध्ये, प्रेसिडेंट.



| | | | |
|---|---|---|---|
| मराठा | १९ | ३३८ | ५·२ |
| गुजराती | १४ | २९९ | ४·७ |
| मल्याळम् | १३ | २१८ | ६·० |
| तेलगू | १३ | २६२ | ५·० |
| कानडी | १० | २०४ | ४·९ |
| पंजाबी | ७ | १६६ | ४·२ |
| इतर | ३ | २५७ | १·२ |
| द्विभाषी | ६३ | ५९५ | १०·६ |
| विविध भाषी | १४ | १५४ | ९·१ |
| एकूण | ७०७ | ७,६३३ | ९·३ |

खपाचे आकडे

| भाषा | शास्त्रीय नियतकालिकांची संख्या | एकूण खप (०००) | सरासरी खप (०००) |
|---|---|---|---|
| इंग्लिश | ३१३ | ७७६ | २·५ |
| तामीळ | २३ | ६२ | २·७ |
| मल्याळम् | १३ | ५५ | ४·२ |
| उर्दू | २३ | ४६ | २·१ |
| मराठी | १९ | ३० | १·६ |
| बंगाली | २३ | २४ | १·० |
| गुजराती | १४ | २३ | १·६ |
| तेलगू | १३ | १६ | १·२ |
| पंजाबी | ७ | ९ | १·३ |
| एकूण | ७०७ | १३१६ | १·९ |

### गांधीजींना अभिप्रेत असलेला भारत

गरीबातल्या गरीबांनाही ह्या देशाबद्दल आत्मीयता वाटावी, त्याच्या घडणीमध्ये त्यांच्या हितास प्राधान्य मिळावे, समाजात वरिष्ठ आणि कनिष्ठ असे वर्ग असू नयेत; सर्व जाती-जमातींचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र नांदावे, असा भारत निर्माण करण्यासाठी मी सतत झटत राहीन. ” —गांधीजी

---

### स्त्रियावरील संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियेस दांपत्याची संमती हवी

संततिप्रतिबंधाची स्त्रियावर शस्त्रक्रिया (ट्यूबेक्टोमी) करण्यापूर्वी ठराविक फॉर्मवर पती आणि पत्नी ह्या दोघांचीही लेखी संमती घेण्यात यावी; पुरुषावरील शस्त्रक्रियेसाठी (व्हॅसेक्टोमी) पत्नीची संमती असल्याचे पतीने लिहून दिले तरी पुरे, असे मध्यवर्ती आरोग्य-कुटुंबनियोजन खात्याने राज्य सरकारांना कळविले आहे.

---

### ४०० वर्षांपूर्वीच गोव्याचे रहिवासी 'मराठे' होते

सालसेट तालुक्यातील कनकोलिम येथील सेंट फ्रॅन्सिस चॅपल जवळ सापडलेल्या एका प्राचीन शिलालेखात गोव्याच्या रहिवाशांचा उल्लेख 'मराठे' असा केलेला आढळून आला आहे. हा शिलालेख १५७९ सालाचा आहे.


आमच्या भागीदारांस, ठेवीदारांस व हितचिंतकांस ही दिवाळी व नूतन वर्ष आनंदाचे, भरभराटीचे व सुखसमृद्धीचे जावो.

## बँकेने सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय प्रगतीचे सूचक आकडे

| | लक्ष रु. |
|---|---|
| अधिकृत भाग भांडवल | १५०·०० |
| वसूल भाग भांडवल | ८०·५१ |
| गंगाजळी व इतर निधी | ४२·६९ |
| ठेवी | ६५७·७२ |
| कर्जे | ४८२·३३ |
| खेळते भांडवल | ८५४·२३ |

: शाखा ३१ :

दि. ना. कायदे
कार्यकारी संचालक

शि. म. काळे
अध्यक्ष

## पूना डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लक्ष्मी रोड, पुणे २.

## एअर इंडिआत जरुरीपेक्षा खूप अधिक माणसे

जगातील कोठल्याही विमान वाहतूक कंपनीपेक्षा एअर इंडिआ इंटरनॅशनलमध्ये जरुरीपेक्षा खूप अधिक नोकर आहेत. १९६७ साली ह्या कंपनीत ९ विमाने होती आणि ७,५६० नोकर होते. म्हणजे प्रत्येक विमानामागे८४०नोकर असे प्रमाण पडते. जगातील १८३ विमान कंपन्यांत हे प्रमाण सर्वात अधिक आहे. १९६५-६६ साली तर हे प्रमाण अधिकच होते. त्या वर्षी कंपनीजवळ ७ विमाने होती आणि नोकरांची संख्या ७,११० होती. म्हणजे दर विमानामागे १,०१५ नोकर असे प्रमाण पडले. १९५७ पासून नोकरांच्या संख्येत दुपटीपेक्षा अधिक वाढ झाली आहे; पण, विमाने मात्र ९ च राहिली आहेत. भारताच्या खालोखाल प्रत्येक विमानामागील नोकरांचे प्रमाण पाकिस्तान इंटरनॅशनलचे आहे. पाकिस्तान इंटरनॅशनलची २६ विमाने आहेत आणि प्रत्येक विमानामागे नोकरांचे प्रमाण ४७१ आहे. ब्रिटिश ओव्हरसीज एअरवेज आणि क्वॉंटास एअरवेजचे हे प्रमाण अनुक्रमे ४४२ व ४२८ आहे. बी ओ ए सीची ४५ क्वॉंटासची २४ विमाने आहेत. काही कंपन्यांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

| कंपनी | प्रत्येक विमानामागे नोकरांची संख्या | विमानांची संख्या |
|---|---|---|
| भारत | ८४० | ९ |
| एअर कॅनडा | १५६ | १०१ |
| एअर फ्रान्स | ३२४ | ७९ |
| एअर न्यूझीलँड | ३८६ | ६ |
| ॲलिटालिआ | १७५ | ५९ |
| जपान एअरलाइन्स | २५७ | ४१ |
| लुफ्टहंसा | २३९ | ७५ |
| पॅन अमेरिकन | २२७ | १५९ |
| ट्रून्स वर्ल्ड | २१९ | १७३ |
| थाय एअरवेज | २५२ | ५ |

---

## प्राचीन कलासंपन्न देवळांची पुन्हा उभारणी

इजिप्तमध्ये आस्वान येथे बांधण्यात येत असलेल्या धरणांच्या पाण्याची पातळी वाढून न्युबिआच्या वाळवंटांतील दोन प्राचीन देवळे बुडून जाण्याचा धोका उत्पन्न झाला होता. प्राचीन मिसर संस्कृतीचा हा ठेवा वाचविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सांस्कृतिक विभागाने अनेक देशांकडून मदत मिळवून दगडात कोरलेली ही देवळे अक्षरशः तेथून उचलून उंच जागी पुन्हा उभारली आहेत. नव्याने उभारल्या देवळांचा उद्घाटन समारंभ झाला त्या वेळी ४० देशांचे प्रतिनिधी हजर होते. इजिप्तचा ईश्वरांश समजला जाणारा राजा रामेसस दुसरा ह्याच्या स्मृतीसाठी ती बांधण्यात आली आहेत. देवळात राजाचे दोन प्रचंड पुतळे आहेत. शिल्पकृती कापून नव्या जागी उभारण्यासाठी ३.६ कोटी अथवा २७ कोटी रुपये खर्च आला.

जॉन डी. रॉकफेलरजवळ त्याच्या मित्राने तक्रार केली, "मी एका व्यापारी मित्राला ५० हजार रु. उसने दिले, पण ते परत मिळाले नाहीत." रॉकफेलरने विचारले, "त्याच्यावर दावा का लावीत नाहीस?"

"ते पैसे त्याला मिळाल्याची पोच घेण्याचे राहून गेले."

"मग त्याला पत्र पाठवून १ लाख रुपये बाकी आहेत, त्याचा तगादा लाव"

"पण माझे फक्त ५० हजार रु. च येणे आहेत."

"बरोबर आहे. तोच तुला ते उलट टपाली लिहील आणि तुला आपोआपच पावती मिळेल."

× × ×

एका विशिष्ट पद्धतीच्या बुकाचा शेवट नेहमीच दुःखदायक असतो—ते म्हणजे चेकबुक.

× × ×

बॉस सेक्रेटरीला उद्देशून म्हणाला, "त्या मेमोवर अतिशय गुप्त असे लिही; कचेरीतील प्रत्येकाने तो मेमो समग्र वाचायला हवा."

× × ×


बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांचे
दीपावली शुभचिंतन !

भांडवलदारी व समाजवादी अर्थव्यवस्था यांचा सुवर्णमध्य सांधणाऱ्या सहकारी अर्थव्यवस्थेच्या पायावर आधारलेली व 'विना सहकार नहि उद्धार' या ध्येयाने प्रेरित झालेली बेळगांव शहरांतील प्रगतिपर सहकारी बँक

दि मराठा को-ऑपरेटिव्ह क्रेडिट बँक लि., बेळगांव

स्थापना : १९४२ फोन नं. : ५३५

बँक गेली २६ वर्षे सहकारी तत्त्वावर कार्य करीत असून सध्या बँकेची आर्थिक परिस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | रु. २,८१,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. ४,७१,००० |
| ठेवी | रु. ३९,३६,००० |
| इन्व्हेस्टमेंटस् | रु. २१,८७,००० |
| एकूण खेळत भांडवल | रु. ४८,५०,००० |

बँकेने सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार हाताळून या भागातील समाजाची आर्थिक घडी सुस्थीर करण्याचा प्रयत्न चालविला आहे.

या बँकेला प्रारंभापासून "अ" वर्ग ऑडिट शेरा मिळत आला आहे. विशेष माहितीसाठी बँकेच्या कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधावा ही विनंती. गोविंदराव मघोजीराव दळवी, चेअरमन.

तारेचा पत्ता
" मॉर्गेज "

मुख्य कार्यालय दूरध्वनी क. २६१४९७
उप-कार्यालय दूरध्वनी क. २५३५२७

# मुंबई राज्य सहकारी भू-तारण बँक लि., मुंबई

जे. के. बिल्डिंग, २ रा माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

## महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका

ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेटस्, इलेक्ट्रिक मोटर्स; तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६७ अखेर बँकेने वाटलेल्या कर्जापोटी रु. ५६ कोटी येणे आहेत.

| श्री. रा. गो. गोखले | श्री. ये. स. बोरगांवकर | श्री. नी. आ. कल्याणी |
|---|---|---|
| व्यवस्थापक | कार्यकारी संचालक | अध्यक्ष |

# दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

( हेड ऑफिस : महात्मा गांधी रोड, मुंबई )

## " सेंट्रल " ला

## *तुमचे बचत केंद्र करा.*

### पुण्यातील कचेऱ्या

मुख्य कचेरी
महात्मा गांधी रोड–पुणे कँप

- लक्ष्मी रोड, पुणे शहर
- डेक्कन जिमखाना, पुणे-४
- भवानी पेठ, पुणे-२
- टिळक रोड, पुणे-९
- स्वार गेट, पुणे-९
- पिंपरी, पुणे-१८

आमची पुणे कँप मुख्य कचेरी एअर कंडिशण्ड असून सेफ डिपॉझिट व्हॉल्टने सुसज्ज आहे.
टिळक रोड, डेक्कन जिमखाना आणि स्वारगेट कचेऱ्यांतही लॉकर्स उपलब्ध आहेत.

| एस. आर. टिपणीस, | व्ही. सी. पटेल |
|---|---|
| चीफ एजंट ( पुणे विभाग ) | चेअरमन |




हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व
'दुर्गाविलास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.